# मिरा भाईदर महानगरपालिका

## वार्षिक अहवाल

## सन 2016-17

# वार्षिक जमा खर्चाचा लेखापरीक्षण अहवाल
# (1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017)

सन 2016-17 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण श्री. एन. डी. पुरो, पथक प्रमुख लेखापरीक्षण अधिकारी सेवाकरार दि. 05-01-2021 ते दि. 11-06-2021) यांच्या पथकाकडुन करण्यात आले आहे. पथकामध्ये खालील अधिकारी / कर्मचारी समाविष्ठ आहेत.

1. श्री कांतीनाथ विष्णु संखे, लेखापरिक्षण अधिकारी, सेवाकरार
2. श्री. मधुकर सुर्वे, लेखापरिक्षण अधिकारी, सेवाकरार

लेखापरीक्षण पथकाने सादर केलेल्या वार्षिक अहवालाचे पुर्नविलोकन श्रीमती.मंजिरी डिमेलो, उपमुख्य लेखापरीक्षक यांनी केले असुन अंतिमीकरण श्री.दिग्विजय चव्हाण, मुख्य लेखापरीक्षक यांनी केले आहे.

**लेखापरीक्षणाची कार्यकक्षा**

प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे खर्चाच्या बाबींचे पुर्व लेखापरीक्षण करण्यात येते व जमा बाबींचे पश्चात (उत्तर) लेखापरीक्षण करण्यात येते. प्रस्तुत सन 2016-2017 या अर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले विविध विभागाने सादर केलेल्या अभिलेख्यांची तपासणी करुन तयार करण्यात आला आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यामुळे जमा रक्कमेचे रोकडवही व चलनाव्दारे जवळजवळ 60% पडताळणी करण्यात आली असुन चलनाची 40% पडताळणी केलेली आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्ग तसेच कोविड-19 या साथीच्या रोगामुळे (लॉकडाऊन) असल्याने लेखापरीक्षणास विलंब झालेला आहे.

सन 2016-2017 या लेखापरीक्षण अहवालाच्या कालावधी मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त यांचा कार्यकाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पद | कालावधी |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. अच्युत हांगे (आयुक्त ) | 21-02-2015 ते 16-08-2016 |
| 2. | मा.डॉ. नरेश गिते (आयुक्त ) | 16-08-2016 ते 06-02-2018 |

**अस्विकृत प्रमाणपत्र (Dleclaimer)**

1) सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत असलेले विविध विभागाने सन 2016-2017 या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.
2) जी माहिती/अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता/ अपहार/ अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाही.

# अनुक्रमाणिका
## वार्षिक अहवाल 2016-17

| अ.क्र. | विभागाचे नांव | आक्षेप क्रमांक | आक्षेप संख्या |
|---|---|---|---|
| 1 | भांडार विभाग | 1.1 ते 1.8 | 8 |
| 2 | आस्थापना विभाग | 2.1 ते 2.23 | 23 |
| 3 | जाहिरात विभाग | 3.1 ते 3.6 | 6 |
| 4 | परवाना विभाग | 4.1 ते 4.5 | 5 |
| 5 | बाजार विभाग | 5.1 ते 5.3 | 3 |
| 6 | लेखा विभाग | 6.1 ते 6.9 | 9 |
| 7 | वाहन विभाग | 7.1 व 7.2 | 2 |
| 8 | वैद्यकीय विभाग | 8.1 ते 8.10 | 10 |
| 9 | अग्निशमन विभाग | 9.1 ते 9.25 | 25 |
| 10 | जन्म-मृत्यू विभाग | 10.1 ते 10.4 | 4 |
| 11 | पाणी पुरवठा विभाग | 11.1 ते 11.20 | 20 |
| 12 | सार्व. बांधकाम विभाग | 12.1 ते 12.3 | 3 |
| 13 | वाचनालय विभाग | 13.1 ते 13.4 | 4 |
| 14 | नगररचना विभाग | 14.1 | 1 |
| 15 | कर निर्धारण व संकलन विभाग | 15.1 ते 15.19 | 19 |
| 16 | क्रिडा विभाग | 16.1 | 1 |
| 17 | शिक्षण विभाग | 17-1 ते 17.14 | 14 |
| 18 | पशुसंवर्धन विभाग | 18.1 | 1 |
| 19 | समाजकल्याण | 19.1 | 1 |
| 20 | अतिक्रमण विभाग | 20.1 ते 20.5 | 5 |
| 21 | विवाह नोंदणी विभाग | 21.1 | 1 |
| 22 | पे ॲण्ड पार्क | 22.1 ते 22.3 | 3 |
| 23 | मिळकत विभाग | 23.1 ते 23.3 | 3 |
| | | एकूण | 171 |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | परिछेद क्रम. | विषय | आक्षेपाधीन /वसुलीपात्र रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 1.1 | तांत्रिक दृष्टया अपात्र निविदाधारकास वर्ष २०१६-१७ करीता,बोर्ड बॅनर छपाईचे कंत्राट दिल्या बाबत. | |
| 2 | 1.2 | वर्ष २०१६-१७ करीता स्टेशनरी छपाई करीता नवीन निविदाच्या अंतिमी करणास विलंब झाल्याने,दि.१/०४/२०१६ ते ३/२०१७ या कालावधीमध्ये मनपा आयुक्त यांच्या मंजुरीने केलेल्या रु.४३.८२ लाख रक्कमेच्या खर्चा बाबत.. | |
| 3 | 1.3 | भांडार विभाग पावती पुस्तक साठा नोंदवही (नमुना १) मधील अनियमितता बाबत... | |
| 4 | 1.4 | पावती पुस्तकांच्या लेखापालनामधील गंभीर अनियमितता बाबत.. | |
| 5 | 1.5 | भांडार विभागाची सन २०१६-१७ ची स्टेशनरी खरेदी निविदा प्रक्रिया | |
| 6 | 1.6 | साठा नोदवही | |
| 7 | 1.7 | घरपट्टी कराची / पाणी पट्टी कराची कोरी पावती पुस्तके रद्द केल्याबाबत... | |
| 8 | 1.8 | भांडार विभागातील कार्यपध्दती मधील अनियमितता | |
| 9 | 2.1 | संगणक चालक तथा लिपिकांच्या पुरवठा करण्याबाबत दिलेल्या ठेक्या संदर्भात | |
| 10 | 2.2 | मागणी केल्यानुसार पात्र कर्मचा-याचा पुरवठा न केल्याने ठेकेदाराकडुन रु.२७०००/-दंड वसुल करण्याबाबत... | |
| 11 | 2.3 | गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांनी सादर केलेल्या बॅंक गॅरंटी बाबत.. | |
| 12 | 2.4 | गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांचे बरोबर केलेल्या करारामधील गंभीर अनियमितता बाबत... | |
| 13 | 2.5 | संगणक चालक तथा लिपिक पुरवठाकारास केलेल्या अधिदानची संपुर्ण देयके उपलब्ध करुन देण्याबाबत.. | |
| 14 | 2.6 | आस्थापानावरील पदांच्या तपशीला बाबत.. | |
| 15 | 2.7 | सेवा निवृत्ती लाभ | |
| 16 | 2.8 | भविष्य निर्वाह निधी | |
| 17 | 2.9 | भविष्य निर्वाह निधीमधील गुंतवणुकीबाबत.. | |
| 18 | 2.10 | सुरक्षा रक्षक पुरवठ्याच्या ठेक्यामधील अनियमितता बद्दल. | |
| 19 | 2.11 | वाढीव कुटूंब निवृत्ती वेतन | |
| 20 | 2.12 | निवृत्ती वेतनाचा अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करणेबाबत.. | |
| 21 | 2.13 | सेवापुस्तक नोंदीमधील अनियमितता. | |
| 22 | 2.14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेबाबत. | |
| 23 | 2.15 | नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत. | |

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | 2.16 | सेवापुस्तकांच्या वार्षिक पडताळणीबाबत. | |
| 25 | 2.17 | नामनिर्देशन पत्रांबाबत. | |
| 26 | 2.18 | <u>अनुज्ञेय नसताना कुटुंब निवृत्तीवेतनाचे प्रदान केलेबाबत</u>...... | 5,96,970.72 |
| 27 | 2.19 | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी व वैद्यकिय आरोग्य विभागातील कर्मचा-यांची EPF ची रक्कम कर्मचारी भविष्य निधी संगठण येथे जमा न केल्याबाबत.... | |
| 28 | 2.20 | भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान देय्यक रक्कमेपेक्षा बँक शाखेतून जादा प्रदान रक्कमेबाबत... | |
| 29 | 2.21 | कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी वर्गणी दराबाबत.... | |
| 30 | 2.22 | भविष्य निर्वाह निधीचे लेखा विवरणपत्र वर्गणीदारास पाठविले नसल्याबाबत.... | |
| 31 | 2.23 | भविष्य निर्वाह निधी ठेवीवरील प्राप्त व्याज रक्कम व वर्गणी धारकांना देय्य व्याज रक्कम हया मधील तफावती बाबत... | |
| 32 | 3.1 | रु. 63600/- इतक्या रकमेचा समावेश असलेले व प्राप्त झालेले 3 धनादेश बँकेमध्ये/कोषागारात जमा न केल्याबाबत, तसेच, लेखांकनामधील इतर अनियमितताबाबत... | |
| 33 | 3.2 | वर्ष 2016-17 मधील होर्डींग्ज परवाना फी/कर, थकीत रक्कम रु. 3,24,240/- वसूल न केल्याबाबत...<br>वसुलपात्र रक्कम रु. 3,24,240/- | 3,24,240 |
| 34 | 3.3 | दि. 31/03/2017 अखेर, थकीत असलेल्या जाहिरात कर रक्कम रु. 65.47 लाखाच्या वसूली संदर्भात. | 65.47 लाख |
| 35 | 3.4 | अनादरीत धनादेशामधील रकमेची वसूली केल्याबाबतचा तपशिल देण्याबाबत... | 6480 |
| 36 | 3.5 | लेखा विभाग तसेच जाहिरात विभाग यांच्या लेखा नोंदीमध्ये, प्रत्यक्ष जमा रकमेमध्ये फरक असल्याबाबत | |
| 37 | 3.6 | जाहिरात फी वसूली संदर्भातील अनियमितता. | |
| 38 | 4.1 | टेलीफोन बूथच्या क्षेत्रफळामध्ये आढळून आलेल्या नियमबाह्यतेबाबत... | |
| 39 | 4.2 | दि. 01/04/2005 पासून रेस्टॉरंट व बार चालू असल्याची कागदपत्रे दाखल करुनही परवाना फी ची वसूली सन-2014 पासून केल्याने, महापालिकेचे रु. 1,20,000/- इतक्या महसूलाचे नुकसान. हॉटेल गोवलकोंडा-रेस्टॉरंट व बार, उत्तन - प्रथम परवाना क्र. 973/2013-14, नुतनीकृत क्र. 543/2016-17.वसूल पात्र रक्कम रु. 1,20,000/- | 1,20,000 |
| 40 | 4.3 | वर्ष 2004-05 पासून कार्यरत असलेल्या 6 स्टील भांडी उत्पादन कारखान्यांना, वर्ष 2014-15 पासून परवाना दिल्याने, रु. 2.40 लाख परवाना शुल्काचे महसूली नुकसान.<br>वसूल पात्र रक्कम रु. 2,40,000/- | 2,40,000 |
| 41 | 4.4 | प्रथम परवाना देताना, सादर केलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत... नूतनीकृत परवाना क्र. 728/2014-15,<br>परवाना धारक - सॅमसन एंटरप्रायजेस | |
| 42 | 4.5 | परवाना विभाग कामकाजाबाबत | |
| 43 | 5.1 | बाजार फी वसूली ठेकेदारास दिलेल्या मुदतवाढी संबंधी. | |
| 44 | 5.2 | बाजार फी वसूली ठेकेदारास दिलेल्या मुदतवाढी संबंधी. | |

| | | | |
|---|---|---|---|
| 45 | 5.3 | वर्ष 2016-17 संबंधी लेखे, नोंदवह्या व अन्य कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत... | |
| 46 | 6.1 | स्टेट बँक ऑफ इंडिया खाते क्र. 10254419063 चे वर्ष 2016-17 संबंधी विवरणपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत... | |
| 47 | 6.2 | पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह लाभ कराची वसूली "भांडवली जमा" या शिर्षखाली दर्शविण्याबाबत. | |
| 48 | 6.3 | वर्ष 2016-17 अखेर विविध विभागांनी संकलित केलेल्या अनामत रकमा, वार्षिक जमा खर्चामध्ये दर्शविल्या नसल्याबाबत... | |
| 49 | 6.4 | **वित्त वर्ष 2016-17 मधील मालमत्ता कर रोकड वही नोंदी मधील अनियमितता बाबत.** | |
| 50 | 6.5 | **वित्त् वर्ष 2016-17 यावर्षाची साठा नोंदवही व पावती पुस्तके लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्या बाबत...** | |
| 51 | 6.6 | **वित्त् वर्ष 2016-17 यावर्षाचे देना बँक खाते क्र. 015711002321 या खात्यामध्ये जमा केलेले धनादेश परत आल्याबाबत व बँक स्लीपव्दारे बँकेत भरण्यात आलेल्या रोख रक्कम/ धनादेश बाबत...** | |
| 52 | 6.7 | **वित्त् वर्ष 2016-17 अखेर विविध कामासाठी घेण्यात आलेल्या रोख रु. 5488682/- अग्रीमाचे समायोजनेबाबत...** | |
| 53 | 6.8 | वित्त वर्षे 2016-2017 दुहेरी पध्दतीने लेखे ठेवणे बाबत....... | |
| 54 | 6.9 | आमदार निधी , खासदार निधी (16 वी लोकसभा) खासदार निधी (15 वी लोक सभा ), रस्ता निधी, रस्ता सुधारणा निधी , वृक्ष संवर्धन निधी, नागरी दालितवस्ती सुधारणा नोंदवही नमुना क्रमांक 11 बाबत.... | |
| 55 | 7.1 | महापालिकेच्या वाहनाना इंधनपुरवठा करण्याबाबतची मंजूरी कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत... | |
| 56 | 7.2 | मालमत्तेचे पुस्तक लेखा परीक्षणासाठी उपलब्ध न केल्याबाबत.. | |
| 57 | 8.1 | महानगरपालिका प्रशासनाकडून महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अधिनियमांची अंमलबजावणी करताना आढळून आलेल्या गंभीर अनियमितता बाबत | |
| 58 | 8.2 | सन 2015-16 या वर्षाच्या वापरासाठी वैध असलेल्या पावती पुस्तकांचा वापर 2016-17 मध्ये केल्याबाबत... | |
| 59 | 8.3 | रुग्ण वाहिकेच्या भाड्याची रक्कम रुपये ३२०/ कमी वसुली केल्या बाबत. वसूल पात्र रक्कम रु. 320/- | 320/- |
| 60 | 8.4 | महापालिकेच्या सर्वच रुग्ण वाहिका बाबतीत रुग्ण वाहिका भाड्याने दिल्यानंतर भाड्याची वसुली प्रवास संपतेवेळी तात्काळ न करता 6 दिवस ते 580 दिवसापेक्षा जास्त उशिराने केल्या बाबत. | |
| 61 | 8.5 | वाहन ठेकेदाराने सादर केलेली पी.पी.एफ., ए.एस. इ.एस.आय.सी. व अन्य कागदपत्रे लेखा परीक्षणासाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपलब्ध करण्या बाबत ... महापालिका आयुक्त यांचे दि. १९/११/२०१६ रोजीचे आदेश क्रमांक सा. प्र./ १३८९/२०१६. | |
| 62 | 8.6 | महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यातील तरतूदींची पूर्तताकरत नसल्याने, रुग्णालय परवाना नूतनीकरणास पात्र नसल्याचा अभिप्राय वैद्यकीय अधिकाऱ्यानी देवूनही, परवान्याचे नूतनीकरण केल्याबाबत...रवि सर्जिकल नर्सिंग होम, नोंदणी क्र. एम.एच/ टी.एच.एन./ एम.बी.एम.सी./ 2016-110. वसूलपात्र रक्कम रु. 6600/- | 6600/- |
| 63 | 8.7 | अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्र व तपासणी अहवालाशिवाय, रुग्णालयाचा परवाना नूतनीकरण केल्याने, रु. 7425/- इतक्या महसूलाचे नुकसान सुश्रुम हॉस्पीटल, नोंदणी क्र. एम.एच/टी.एच.एन./ एम.बी.एम.सी./2016-116. वसुलपात्र रक्कम रु. 7425/- | 7425/- |
| 64 | 8.8 | रुग्णालय परवाना नूतनीकरण थांबविण्याचे आदेश देऊनही, परवान्याचे नियमबाह्य नूतनीकरण. प्रियांशी हॉस्पीटल- एम.एच./टी.एच.एच./MBMC/2014-66. वसूलपात्र रक्कम रु. 7425/- | 7425/- |
| 65 | 8.9 | रुग्णालयाच्या सद्यःस्थितीचा अहवाल देणे संदर्भात | |
| 66 | 8.10 | मालमत्ता विभागाच्या नोंदीनुसार, निवासी, वापर असलेल्या इमारतीमध्ये रुग्णालयासाठी परवाना दिल्याबाबत. फातिमा मॅटर्निटी ॲण्ड जनरल हॉस्पिटल, नोंदणी क्रमांक MH/THN/ MBMC/2017-140. | |
| 67 | 9.1 | तपासणी फी व दाखला नुतनीकरण फी रु. 11550/- कमी वसुल केल्याबाबत... | |
| 68 | 9.2 | महापालिका क्षेत्रातील रुग्णालये/शुश्रुषागृहे यांना संस्थात्मक इमारती (ग), रुग्णालये, आरोग्यधाम व शुश्रुषागृहे (ग-1), या शिर्षाखाली आकारण्यात येत असलेल्या रु. 16500/- कॅपिटेशन फी ची अचूकता पडताळणी करण्याबाबत... मा. महासभा दि. 18/02/2012, ठराव क्र. 108. | |
| 69 | 9.3 | ना-हरकत दाखला देताना, प्रथम वर्षाची कॅपिटेशन फी घेतल्यानंतर, पुढील 2 वर्षाचे तपासणी शुल्क व ना-हरकत दाखला शुल्क वसूल न केल्याने, रु. 48950/- महसूलाचे नुकसान. | |
| 70 | 9.4 | महापालिका क्षेत्रातील रुग्णालये/शुश्रुषागृहे यांना अग्निशमन विभागाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र देताना, महासभेने दि.18/02/2012 रोजीच्या ठराव क्र. 114 नुसार वार्षिक फी वसूली न केल्याने रु. 260700/- इतक्या महसूलाचे नुकसान झालेबाबत महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी अधिनियमाअंतर्गत वैद्यकीय विभागाने नोंदणी केलेली 164 रुग्णालये. | |
| 71 | 9.5 | महासभेने दि. 18/02/2012 रोजीच्या ठराव क्र. 114 अन्वये, अग्निशमन विभागाकरिता, मंजूर केलेल्या विविध फी संदर्भात, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक कायद्यातील कलम 12(1)(ख), 2(3) मधील तरतुदीची पूर्तता केल्याबाबतची कागदपत्रे सादर करणेबाबत | |
| 72 | 9.6 | अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत... | |
| 73 | 9.7 | कॅपिटेशन फि आकारणी/वसूली मधील अनियमितता. | |
| 74 | 9.8 | कॅपिटेशन शुल्क वसूलीची पावती आढळून न आलेबाबत... | |
| 75 | 9.9 | अग्निशमन ना-हरकत दाखला नूतनिकरण न केलेबाबत... | |
| 76 | 9.10 | ना-हरकत दाखला नुतनिकरण न केलेबाबत... | |
| 77 | 9.11 | अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखला वार्षिक नुतनिकरण करणेबाबत... | |

| | | | |
|---|---|---|---|
| 78 | 9.12 | ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत... | |
| 79 | 9.13 | ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत | |
| 80 | 9.14 | अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत | |
| 81 | 9.15 | अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत | |
| 82 | 9.16 | अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत... | |
| 83 | 9.17 | कॅपिटेशन फि आकारणी/वसूली मधील अनियमितता. | |
| 84 | 9.18 | कॅपिटेशन शुल्क वसूलीची पावती अढळ न झालेबाबत | |
| 85 | 9.19 | अग्निशमन ना-हरकत दाखला नूतनिकरण न केलेबाबत... | |
| 86 | 9.20 | ना-हरकत दाखला नुतनिकरण न केलेबाबत... वसुलपात्र रक्कम रु.31,708/- | 31,708/- |
| 87 | 9.21 | अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखला वार्षिक नुतनिकरण करणेबाबत वसुलपात्र रक्कम रु.18,254 | 18,254 |
| 88 | 9.22 | ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत वसुलपात्र रक्कम रु.11,674/- | 11,674/- |
| 89 | 9.23 | ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत वसुलपात्र रक्कम रु.6,155/- | 6,155/- |
| 90 | 9.24 | अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत... वसुलपात्र रक्कम रु.30,950/- | 30,950/- |
| 91 | 9.25 | अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत... वसुलपात्र रक्कम रु.28,435/- | 28,435/- |
| 92 | 10.1 | जन्मतारखेचे प्रसूतितज्ञांचे प्रमाणपत्र अढळ न झालेबाबत | |
| 93 | 10.2 | मृत्यूची नोंद विलंबाने केलेबाबत | |
| 94 | 10.3 | जन्म-मृत्यू दाखला शुल्क रक्कम विसंगतीबाबत. वसूलपात्र रक्कम रु. 1220/- | 1220/- |
| 95 | 10.4 | जळाऊ लाकुड शुल्क भरणा मधील विसंगतीबाबत. | |
| 96 | 11.1 | पाणी पुरवठा विभागातील मागणी नोंदवही मधील अनियमितता. | |
| 97 | 11.2 | पाणी पुरवठा विभागातील अनियमितता मिटर रिडींगमध्ये मागील महिन्याचे रिडींग चलु महिन्यामध्ये दर्शविण्यात तफावत | |
| 98 | 11.3 | पाणी पुरवठा विभागातील अनियमितता. | |
| 99 | 11.4 | पाणी पुरवठा विभागामधील अनियमिततांची पूर्तता सादर करणेबाबत | |
| 100 | 11.5 | पाणी पुरवठा विभागामधील अनियमिततांची पूर्तता सादर करणेबाबत केंद्रनिहाय धनादेशाद्वारे वसूल रकमांच्या संदर्भात चलन फाईलमध्ये धनादेश यादी सादर न केल्याबाबत. | |
| 101 | 11.6 | धनादेशाद्वारे प्राप्त झालेल्या पाणीपट्टी रकमेची नोंद, विभागाच्या संकलन वही मध्ये तसेच लेखा विभागाच्या रोकड वही मध्ये नसल्याबाबत... | |
| 102 | 11.7 | धनादेशाद्वारे पाणीपट्टी वसुलीबाबत... | |
| 103 | 11.8 | पाणी पुरवठा विभागामधील अनियमितता... | |
| 104 | 11.9 | पाणी पुरवठा विभागातील धनादेशाद्वारे वसूलीचे धनादेश | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अनादरीत झालेबाबत | |
| 105 | 11.10 | पाणी पुरवठा विभागांतर्गत टँकर पाणीपुरवठा केंद्रामधील धनाकर्षाद्वारे जमा रकमेची रोखडवहीतील नोंद तफावतीबाबत... | |
| 106 | 11.11 | टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या फेऱ्यांचा धनाकर्षाद्वारे संकलीत केलेला महसूल रु. 251600/- बाबत... | |
| 107 | 11.12 | पाणी पुरवठा विभागामधील जमा रकमांची बँक विरणावरुन पडताळणी - 2016-17 | |
| 108 | 11.13 | महानगरपालिकेद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या खाजगी टँकर ठेकेदाराने टँकरच्या प्रत्यक्ष फेऱ्यापेक्षा जास्त फेऱ्यांची देयके सादर केल्याबाबत... | |
| 109 | 11.14 | पाणी पुरवठा विभागाने वर्ष 2016-17 वर्षामध्ये संकलित केलेला पाणीपट्टी महसूल व लेखाविभागाने वार्षिक जमाखर्चामध्ये दर्शविलेला प्रत्यक्ष महसूल यामध्ये तफावत असल्याबाबत | |
| 110 | 11.15 | महापालिकेच्या विविध पाणीटाकी हाऊसना वाणिज्यिक दराने वीज आकारणी असल्याबाबत... | |
| 111 | 11.16 | विद्युत देयकांचे अधिदान विलंबाने होत असल्याने विलंब आकार देय होत असल्याबाबत... | |
| 112 | 11.17 | विद्युत वापरामध्ये असाधारण वाढ झाल्याबाबत | |
| 113 | 11.18 | विद्युत मापके दिर्घ काळापासुन बंद असल्याबाबत | |
| 114 | 11.19 | सरासरी पॉवर फॅक्टरची पातळी मानकानुसार परिरक्षित न केल्याने मोठया प्रमाणात दंड रक्कम अदा करावा लागत असल्याबाबत... | |
| 115 | 11.20 | विद्युत मापके दिर्घ काळापासुन बंद असल्याबाबत | |
| 116 | 12.1 | विद्युत मापके दिर्घ काळापासुन बंद असल्याबाबत... | |
| 117 | 12.2 | पोटकिर्द जमा रक्कम व कॅश बुकात जमा रक्कम मधील तफावत बाबत.... | |
| 118 | 12.3 | मिरा भाईंदर महानगरपालिका बांधकाम विभागामार्फत वित्त वर्ष 2016-2017 मध्ये रस्ता खोदाई नुकसान भरपाई हया लेखाशिर्षाखाली जमा रक्कम ताळमेळ बाबत | |
| 119 | 13.1 | प्रलंबित ठेवी परताव्याबाबत... | |
| 120 | 13.2 | अनामत नोंदवहीमधील अनियमितताबाबत... | |
| 121 | 13.3 | वाचनालय विभागाने वर्ष 2016-17 मध्ये संकलित केलेला महसूल व लेखाविभागाने वार्षिक जमाखर्चामध्ये दर्शविलेला प्रत्यक्ष महसूल यामध्ये तफावत असल्याबाबत... | |
| 122 | 13.4 | महानगरपालिका वाचनालय मासिक वर्गणीची वसूली विलंबाने होत असल्याबाबत... | |
| 123 | 14.1 | महानगरपालिका वाचनालय मासिक वर्गणीची वसूली विलंबाने होत असल्याबाबत... | |
| 124 | 15.1 | हॉटेल सतीश एन्क्लेव्ह या इमारतीचे प्रथम करनिर्धारणाचा तपशिल सादर करण्याबाबत... | |
| 125 | 15.2 | मालमत्ता कर रोकडवही व एकत्रित चलनाव्दारे संकलन रक्कम | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | हया मधील फरकाबाबत... | |
| 126 | 15.3 | मालमत्ता कर संकलन वित्त वर्ष 2016-2017 मधील माहे मार्च 2017 हया महिन्याचे करापोटी प्राप्त रक्मांच्या नोंदीमधिल फरकाबाबत.... | |
| 127 | 15.4 | वित्त वर्ष 2016-2017 बँकेतून परत आलेल्या धनादेशामुळे महानगरपालिकचे रक्कम रु. 2842777/- आर्थिक नुकसानी बाबत......(प्रभाग क्र. 6 /वार्ड क्र. K) | 2842777/- |
| 128 | 15.5 | मालमत्ता कर संकलन एकत्रित चलन व रोखवही नोंदी मधील फरकाबाबत... | |
| 129 | 15.6 | मालमत्ता करापोटी प्राप्त झालेले धनादेश बँक खाती न वटल्याबाबत...... | |
| 130 | 15.7 | कनकिया प्रभागातील मालमत्ता कर संकलन रकमेमधील तफावती बाबत..... | |
| 131 | 15.8 | वित्त वर्ष 2016-2017 बँकेतून परत आलेल्या धनादेशामुळे महानगरपालिकचे रक्कम रु. 2240444 /- आर्थिक नुकसानी बाबत......(प्रभाग क्र. 6 /वार्ड क्र. F) | 2240444 /- |
| 132 | 15.9 | प्रभाग क्र. 6 (रसाज) प्रभागातील मालमत्ता कर संकलन रकमेच्या नोंदी मधील फरकाबाबत | |
| 133 | 15.10 | ऑन लाईन मालमत्ता कर संकलन स्टटेमेन्ट उपलब्धताबाबत ...... | |
| 134 | 15.11 | एकत्रित चलनाव्दारे संकलन रक्कम व मालमत्ता कर रोकडवही हया मधील जमा रक्कम मधील तफावत बाबत... | |
| 135 | 15.12 | मालमत्ता कराची तेरीज पत्रकातील थकीत मालमत्ता कराबाबत.... | |
| 136 | 15.13 | मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराची वसुलीबाबत.... | |
| 137 | 15.14 | - वित्त वर्ष 2016-2017 बँकेतून न वटलेले धनादेश परत आल्यामुळे महानगरपालिकचे रक्कम रु. 2105822 /- आर्थिक नुकसानी बाबत (प्रभाग क्र. 6 /वार्ड क्र. L) | 2105822 /- |
| 138 | 15.15 | वित्त वर्ष 2016-2017 बँकेतून न वटलेले धनादेश परत आल्यामुळे महानगरपालिकचे रक्कम रु. 1250327/- आर्थिक नुकसानी बाबत...... (प्रभाग क्र. 6 /वार्ड क्र. O) | 1250327/- |
| 139 | 15.16 | मालमत्ता कर संकलन रोख रक्कमेपेक्षा कमी रक्कम बँक खाती जमा केलेली असल्याबाबत..... | |
| 140 | 15.17 | मालमत्ता कराच्या समायोजन रक्कमेबाबत.... | |
| 141 | 15.18 | वित्त वर्ष 2016-2017 बँकेतून न वटलेले धनादेश परत आल्यामुळे महानगरपालिकचे रक्कम रु. 1220445/- आर्थिक नुकसानी बाबत...... | 1220445/- |
| 142 | 15.19 | वित्त वर्ष 2016-2017 न वटलेली धनादेश परत आल्यामुळे वसुल करावयाची दंडाची रक्कम रु. 131500/-बाबत.... | 131500/- |
| 143 | 16.1 | 2016-17 या आर्थिक वर्षाचे अभिलेख लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत... | |
| 144 | 17.1 | **वेतन अनुदान नोंद वही बाबत...** | |
| 145 | 17.2 | **भाविष्य निर्वाह निधी अभिलेख मधिल अनियमित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| 146 | 17.3 | भविष्य निर्वाह निधी वर्गणी दाराला वार्षिक हिशोबाचे विवरण पत्रक देणे बाबतची अनियमितता | |
| 147 | 17.4 | थकीत शाळा गृह भाडे बाबत... | 2,28,57,288/- |
| 148 | 17.5 | सेवा पुस्तक नोदी व दुय्यम सेवा पुस्तक बाबत | |
| 149 | 17.6 | आयकर रक्कम शासन भरणा बाबतचे चलन लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्या बाबत | |
| 150 | 17.7 | जादा प्रदान वेतनाबाबत... | 86400/- |
| 151 | 17.8 | जादा अनुदान रक्कम जमा बाबत... | |
| 152 | 17.9 | ताळमेळ बाबत.. | |
| 153 | 17.10 | जमा रक्कमे बाबत... | |
| 154 | 17.11 | व्यवसाय कर रक्कम शासन भरणा न केल्याबाबत | 7,02,500/- |
| 155 | 17.12 | प्रयोग शाळा तपासणी शुल्क अदा बाबत... | |
| 156 | 17.13 | जमा रकमांच्या तपशिलाची कॅश बूकामध्ये नोंद न केल्याबाबत | |
| 157 | 17.14 | जमा रकमेच्या तपशिला बाबत कॅश बुकात नोंद न केल्याबाबत.. | |
| 158 | 18.1 | भटक्या कुत्राच्या निर्बिजिकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण योजनेच्या थकित अनुदानाबाबत. | 2,30065 /- |
| 159 | 19.1 | क्रिडा विभागाचे अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नसलेबाबत. | |
| 160 | 20.1 | प्रभाग-3 मधील अनाधिकृत बांधकाम निष्कासन शुल्क थकबाकी बाबत... | |
| 161 | 20.2 | प्रभाग-3 मधील अनाधिकृत बांधकाम निष्कासन शुल्क थकबाकी बाबत... | |
| 162 | 20.3 | निष्कासन शुल्क वसुलीचीकार्यवाही न केल्याबाबत.... | |
| 163 | 20.4 | प्रभाग - 4 मधील अनधिकृत बाधकाम निष्कासन शुल्क थकबाकी बाबत. | 1,58,300/- |
| 164 | 20.5 | वित्त वर्ष 2016-17 चे लेखापरीक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करुन देणे बाबत. | |
| 165 | 21.1 | विवाह नोंदणी शुल्क रक्कम जमा नसल्या बाबत | |
| 166 | 22.1 | अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत बाबत... | |
| 167 | 22.2 | पे ॲन्ड पार्क वाहन तळाची थकित रक्कमे बाबत... | 30952/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 168 | 22.3 | आरक्षण क्र. 264 अे येथील वाहन तळ पे अॅन्ड पार्क ठेक्याबाबत... | |
| 169 | 23.1 | नमुदा नंबर 81 नोंद वही (मिळकत नोंद वही) मधील अनियमितता बाबत... | |
| 170 | 23.2 | मिळकती पासून मिळणा-या उत्पन्नाच्या मागणी / वसुली बाबत... | 20208558/- |
| 171 | 23.3 | थकित मिळकत भाडे रक्कमेबाबत... | 1816561/- |

# भांडार विभाग

## (2016-17)

**परिच्छेद क्र. १.१:- तांत्रिक दृष्टया अपात्र निविदाधारकास वर्ष २०१६-१७ करीता, बोर्ड बॅनर छपाईचे कंत्राट दिल्या बाबत.**

१) स्थायी समितीच्या दि.०९/०५/२०१७रोजीच्या मान्यते नुसार मे. बलदानिया डॉट कॉम यांना दिलेल्या बॅनर छपाई ठेक्यासंदर्भात विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या मंजुरीत कागदपत्राचे अवलोकन केले असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

अ) मे. बलदानिया डॉट कॉम यांनी निविदे सोबत दाखल केलेल्या तांत्रिक लिफाफया मधील कागदपत्रा नुसार मे. बलदानिया डॉट कॉम या मालकी हक्क स्वरुपातील संस्थेची मालकी श्रीमती वसंतबेन विनोदभाई बलदानिया यांचेकडे असुन सर्विस टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स शॉपस ॲण्ड एस्टॅबलीशमेन्ट, नोंदणी त्याच्याच नावे आहेत. तथापि विनोदभाई बलदानिया यांनी स्वतःचे पॅनकार्ड व आधार कार्डची छायापत्र दाखल करुन बलदानिया डॉट कॉमचे मालक असल्याचे दर्शवुन स्वतः सही करुन निविदा सादर केली आहे. तसेच भांडार विभागाने, दि. २७/१०/२०१६ रोजीच्या प्रस्तावामध्ये, विनोदभाई यांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्याचे दर्शवुन बलदानिया डॉट कॉम यांची तांत्रिक अर्हता पुर्ण होत असल्याचे नमुद केले व निविदा समितीच्या बैठकिस सदर निविदा ठेवण्यात आली. विभागाच्या शिफारसी नुसार निविदा समितीने आर्थिक लिफाफा उघडण्यास मान्यता देवुन अंतिमतः बलदानिया डॉट कॉम यांची निविदेमधील ४ बाबी पुरविण्यासाठी नेमणुक करण्यात आली.

ब) बलदानिया डॉट कॉम यांना दिलेल्या उपरोक्त कंत्राटाच्या करारनाम्याचे अवलोकन केले असता असे आढळुन आले कि, सदर कररारनाम्याच्या पहिल्या व शेवटच्या ओळी मध्ये करारनामा केलेला दिनांक नमुद न करता दिनांकाची जागा मोकळी ठेवण्यात आली आहे.त्यामुळे सदर कराराची अंमलबजावणी व समाप्ती कोणत्या तारखेस झाली याचा बोध होत नाही.

क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ व सुची "ड" मधील प्रकरण ५ मध्ये मनपा तर्फे, मनपा आयुक्तांनी कंत्राट कसे करावे याबाबतचे नियमन केले असुन नियम १ नुसार रु. ५००/- पेक्षा जास्त रक्कमेचा समावेश असलेले कंत्राट मनपाच्या मुद्रे सहित शिक्का मोर्तब करुन नियम २ मध्ये नमुद केल्या नुसार स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे न केलेले कंत्राट कलम ७४ (२) नुसार महापालिकेवर बंधनकारक राहु शकत नाही.

प्रस्तुत प्रकरणात बलदानिया डॉट कॉम यांचेशी करण्यात आलेले कंत्राट हे उपरोक्त नमुद कायदेशीर तरतूदी नुसार केल्याचे दिसुन येत नाही.

उपरोक्त अनियमितता दि.०२/०५/२०१९ रोजीच्या अर्धसमास क्र.९ अन्वये योग्य त्या कार्यवाहीसाठी विभागाकडे संदर्भित केली असुन विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र.१.२ :- वर्ष २०१६-१७ करीता स्टेशनरी छपाई करीता नवीन निविदाच्या अंतिमीकरणास विलंब झाल्याने,दि.१/०४/२०१६ ते ९/३/२०१७ या कालावधीमध्ये मनपा आयुक्त यांच्या मंजुरीने केलेल्या रु.४३.८२ लाख रक्कमेच्या खर्चा बाबत..

१) मनपा प्रशासनासाठी लागणारी स्टेशनरी व छपाई पुरविण्यासाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये मागविलेल्या निविदाचे अंतिमीकरण ३१/३/२०१७ रोजी आयुक्तांच्या मंजुरीने झाले त्यामुळे दि. १/४/२०१६ ते ९/३/२०१७ या कालावधीमध्ये भांडार विभागाने स्टेशनरी, बॅनर छपाई व तत्सम कामे, वर्ष २०१५-१६ मधील कंत्राटदराकडुन त्याच दराने करुन घेण्याचे प्रस्तावित करुन त्यास मनपा आयुक्तांची दि. २६/२/२०१६ रोजी मंजुरी घेण्यात आली. त्यानुसार भांडार विभागाच्या तरतुद नोंदवहीमधील नोंदी नुसार भांडार विभागाने, दि.०१/०४/२०१६ ते दि. ०९/०३/२०१७ या कालावधी मध्ये सदर बाबीसाठी ४३ कार्यादेश देवुन रु.४३,८१,७४१/- च्या खर्चाने स्टेशनरी खरेदी व छपाईची कामे करुन घेतली आहेत. सदर खर्चाच्या रक्कमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(क) अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही. तसेच नवीन निविदा न मागविता जुन्याच दराने खरेदी का करण्यात आली तसेच मागील दरामध्ये घट झाली आहे किंवा कसे याची खातरजमा विभागाने केल्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

२) सन २०१५-१६ मधील ठेकेदारास वर्ष २०१६-१७ मध्ये त्याच दराने काम देण्याबाबतचा करार करणे अनिवार्य असताना याबाबत कोणताही करार न करता खर्च केल्याने, सुची ड, प्रकरण ५ मधील नियम १(ब) मधील तरतुदींचे पालन झालेले नाही.

सदरबाब दि.०८/०५/२०१६ रोजीच्या अर्धसमास क्र.१० अन्वये विभागास कळविली असुन याबाबतचे अभिप्राय अप्राप्त आहेत.

## परिच्छेद क्र.१.३:- भांडार विभाग पावती पुस्तक साठा नोंदवही (नमुना १) मधील अनियमितता बाबत...

१) महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ च्या नियम ८ नुसार मनपा प्रशासनाने लेखा पुस्तके नोंदवहया इत्यादी वापरात आणण्यापुर्वी नोंदपुस्तका मधील एकुण पानांची संख्या त्या पुस्तकाच्या शेवटच्या पानावर, प्रत्यक्ष मोजणी नुसार लिखित स्वरुपात अधिकृत अधिका-याने प्रमाणित करणे अनिवार्य आहे.

२) भांडार विभागाने वर्ष २०१६-१७ मध्ये वापरात आणलेली पावती पुस्तके साठा नोदवही, वरील नियमा प्रमाणे प्रमाणित केलेली नाही. एवढेच नव्हे तर सदर नोंदवही मध्ये पृष्ट क्र.७९ नंतरच्या पृष्ठाला सलगपणे ८० क्रमांक न देता सदर पृष्ठ, क्रमांक विरहीत वापरण्यात आलेले आहे. व त्यापुढील पृष्ठास ८० क्रमांक दिलेला आहे. अशा प्रकारे सदर नोंदवहीमध्ये १०१ पाने असल्याचे प्रमाणित नकरता सदर पुस्तक वापरण्यात आले आहे.

३) सदर अप्रमाणित नोंदवही मधील पृ.क.३० व पृ.क.५९ वगळता वापरात आणलेल्या ८६ पृष्ठापैकी ८४ पृष्ठावर भांडार विभागाच्या कर्मचारी व अधिका-यांची कुठेही स्वांक्षरी नाही.

४) सदर साठाबहीतील पृ.क्र.९ ते २० पर्यतच्या ९५ नोंदीमध्ये शिल्लक पुस्तक संख्या मध्ये खाडाखोड केली आहे. तसेच पृ.क.१० वरील नोंदीनुसार प्रभाग ३१ यांना प्रथमतः १ पुस्तक दिल्याच्या नोंदीमध्ये खाडाखेड करुन २ पुस्तके दिल्याची नोद आहे. शिवाय पृष्ठ क्र.१२ वरील दि.२५/४/२०१६ रोजीच्या नोंदी नुसार लेखाविभागास प्रथमतः पु.क्र.८०८२ ते ८०८५ प्रमाणे ४ पुस्तके दिल्याचा नोंदीमध्ये फेरफार करुन पुस्तक क्र.८२ ते ८६ अशी ५ पुस्तके दिल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर खडाखोड कोणीही सांक्षाकित/स्वाक्षरीत केलेली नाही.

अशाच प्रकारे पृ.क्र.४६,५७,५९,६४,६६,६८,६९,७२व ७४ वर अनधिकृत बदल करण्यात आले आहेत.यासंदर्भात लेखा लेखनामध्ये दुरुस्त्या करण्याबाबत नियम क्र.१० मध्ये नमुद केलेली कार्यवाही करणे आवश्यक असताना भांडार विभागाने सदर प्रक्रिया न अवलंबल्यामुळे सदर नोदींची खातरजमा करता आली नाही.

उपरोक्त अनियमितता दि.१७/०५/२०१९ रोजीच्या अर्धसमास क्र.२१ अन्वये विभागाच्या निदर्शनास आणुन दिल्या आहेत. तथापि याबाबतचा कृती अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१.४ :- पावती पुस्तकांच्या लेखापालनामधील गंभीर अनियमितता बाबत..**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम ९ मध्ये महापालिकेने संग्रहित केलेली पैशात मुल्य असलेली सर्व जमा पावती पुस्तके व इतर नमुने यांचा हिशोब नमुना क्र.०१ मध्ये ठेवणे आवश्यक आहे. व त्याबाबत नियम ९(१) ते ९(८) मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तथापि भांडार विभागाने वर्ष २०१६-१७ साठी ठेवलेल्या पावती पुस्तक नोंद वहीचे अवलोकन केले असता खालील गंभीर अनियमितता आढळुन आल्या.

१) नियम क्र.९,४६ व १५२ नुसार पावती पुस्तक साठा नोंद वही नमुना १ मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तथापि भांडार विभागाने ठेवलेल्या वर्ष २०१६-१७ मधील नोदवहीचा मथळा "नमुना ९" असा नमुद केला आहे.शिवाय नमूना १ मध्ये एकुण २४ रकाने असून सर्व रकान्यामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि विभागाने ठेवलेलया नोंदवहीत केवळ १८ रकाने असुन त्यापैकी केवळ ८ रकान्यामध्ये माहिती भरली असुन उर्वरित रकाने नोंदी शिवाय कोरेच ठेवले आहेत.

२) नियम ९(२) प्रमाणे मुद्रणालयातून जमा पावती पुस्तके मिळताच पावती पुस्तकातील पावत्यांची संख्या तपासुन शेवटच्या पानावर लिखित स्वरुपात अधिकृत अधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.भांडार विभागातील काही उपलब्ध पुस्तकाची चाचणी तपासणी केली असता असे प्रमाणपत्र एकाही पावती पुस्तकावर साक्षांकित /प्रमाणित/स्वाक्षरीत केलेले नाही.

३) नियम ६ नूसार पावती पुस्तके क्रमांकानुसार दिली पाहिजेत व पावत्यांची संख्या सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे. नियम ५ नुसार प्रत्येक पावती पुस्तक दिल्याची नोंद योग्य तर्हेने साक्षांकित करणे आवश्यक आहे.तथापि भांडार विभागाच्या २०१६-१७ वर्षाच्या नोंद वहीमध्ये पावत्याची संख्या कुठेही नमुद केली नाही. शिवाय सदर नोंद वहीमधील एकुण ८६ पृष्ठा पैकी पृष्ठ क्रमांक ३० व ५९ वगळता उर्वरीत ८४ पृष्ठावर पावती पुस्तके प्राप्त झाल्याबाबतच्या व पावती पुस्तके विभागांना दिल्या बाबतच्या नोंदी भांडार विभागातील कार्यरत असलेल्या कुठल्याही कर्मचारी/अधिकारी यांनी स्वाक्षरीत व साक्षांकित केलेल्या नाहीत.

४) पावती साठा नोंदवहीच्या पृष्ठ क्र.१ वर घरपटट्टी विभागाची ७ पुस्तके, पृष्ठ क्र.५ वरील पाणी पटट्टी कराची ५० पुस्तके, पृष्ठ क्र.७ वरील पाणीपटटी बाबतची ३४७ पुस्तके, पृष्ठ क्र.३६ वरील १३५० कुपन, पृष्ठ क्र.३७ वरील १५० पुस्तके, पृष्ठ क्र.३८ वरील १३२०६ पुस्तके, पृष्ठ क्र.३९ वरील ३७५५ पुस्तके, ही सर्व पुस्तके रदद् केली असल्याच्या नोंदी पेन्सिलने घेतल्या असुन भांडार विभागातील कुठल्याही कर्मचारी/अधिकारी यांनी सदर नोंदी स्वाक्षरीत केलेल्या नाहीत.शिवाय सदर पावती पुस्तके नियम ९(७) प्रमाणे रदद केली आहेत किंवा कसे याची खातर जमा करता आली नाही.

५) वर्ष २०१५-१६ च्या साठा नोदवही मधील पृष्ठ क्रमांक ५४ वर दि.३१/०३/२०१६ रोजी अतिक्रमण दंड फी ची ४० पुस्तके शिल्लक असल्याची नोंद आहे.तसेच सदर नोंदवहीच्या पृष्ठ क्र.१०० वर जकात विभागाची २५ पुस्तके दि.३१/०३/२०१६ रोजी शिल्लक असल्याचे नमुद आहे.मात्र सदर शिल्लक पुस्तकाची नोंद वर्ष २०१६-१७ च्या साठा नोंद वहीमध्ये कुठेही आढळुन येत नाही.

६) वर्ष २०१६-१७ च्या साठा नोंद वहीमधील पृष्ठ क्र.८५ वर दि.३०/१२/२०१६ रोजी जाहिरात विभागा करीता १० पुस्तके मिळाल्याची व ती पुस्तके जाहिरात विभागास दिल्याची नोंद आहे.मात्र पुस्तके देणारा व घेणारा यांच्या सहया कुठेही आढळुन आल्या नाहीत.या नोंदीसमोर भांडार विभाग तसेच जाहिरात विभाग यांच्या प्रतिनिधीच्या स्वाक्षरी नसल्याने ती पुस्तके कोणाला देण्यात आली याची सत्यता पडताळता आली नाही.त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.८६ वर उद्यान विभागास पुस्तक क्र.११ ते १४ ही ४ पुस्तके दिल्याची नोंद आहे मात्र पुस्तके देणारा व घेणारा यांच्या सहया कुठेही आढळुन आल्या नाहीत.त्यामुळे सदर पावती पुस्तके अधिकृत व्यक्तीस देण्यात आली का? याबदद्ल साशंकता निर्माण होते.

उपरोक्त अनियमितताचा एकत्रितपणे विचार केल्यास पैश्यात मुल्य असलेल्या पावती पुस्तकाच्या नोंदी नियमबाहयरित्या घेतल्या असल्याने सदर मौल्यवान पावती पुस्तकांचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होत असल्याने भांडार विभागाने याबाबत योग्यती कार्यवाही त्वरीत करावी यासाठी सदर बाब दि.०८/०५/२०१९ रोजीच्या अर्धसमास क्र.१३ अन्वये कळविली असुन विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.

**परीच्छेद क्र.१.५ :- भांडार विभागाची सन २०१६-१७ ची स्टेशनरी खरेदी निविदा प्रक्रिया**

महानगरपालिके मधील भांडार विभागा कडुन सन २०१६-१७ या वर्षात स्टेशनरी खरेदीची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असता त्यामध्ये खालील बाबींचे दर पुर्वी प्राप्त दरा पेक्षा ब-याच चढया दराने प्राप्त झाले असताना सुध्दा सदरचे दर बाजार भावाची तुलना करता योग्य असल्याचे प्रमाणित करुन स्वीकारण्यात आलेले आहे.

| अ.क्र | बाबीचा तपशिल | पुर्वीचे दर | सन २०१६-१७ मधील प्राप्त व स्वीकृत दर |
|---|---|---|---|
| १ | स्टॅप पॅड इंक निली (१०० एम.एम.बॉटल कॅमल/कोरस) | रु.५०/- बॉक्स | रु.३६०/- प्र. बॉक्स |
| २ | प्लॉस्टीक कोटेड फाईल(प्रभात कंपनी) | रु.१८/- प्र. डझन | रु.२१०/- प्र. डझन |
| ३ | प्लॉस्टीक स्केल ११/२"X१२" (कॅमल कंपनी) | रु.१२/- प्र. डझन | रु.११८/- प्र. डझन |
| ४ | गोदरेज लॉक सात लिव्हर्स तीन चाव्यांचा सेट | रु.२७०/- प्र.नग | रु.३६८/- प्र.नग |
| ५ | टॉयलेट पेपर | रु.१०/- | रु.१४/- |
| ६ | प्लॉस्टीकचे नॅपकीन होल्डर | ७१/-प्र.नग | ९५/-प्र.नग |
| ७ | फायबर ग्लास प्लॉस्टीक मेजर टेप (३० मीटर) | १७०/- प्र.चौ.फुट | २७५/- प्र.चौ.फुट |
| ८ | फायबर ग्लास प्लास्टीकमेजर टेप (१५ मीटर) | १२०/- प्र.चौ.फुट | १६०/-प्र.चौ.फुट |

तरी उपरोक्त बाबी तसेच इतर स्वीकृत बाबीचे दर बाजार भावाच्या तुलनेने वाजवी असल्याचे नस्तीमध्ये बाजारभावाचे कुठलेही दराची कागदपत्रे उपलब्ध नसताना प्रमाणित करण्यात आले आहे. याबाबतचा खुलासा करण्याबाबत अर्धसमास क्र.८ दि.२५/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि विभागाकडुन अद्याप खुलासा अप्राप्त आहे. तरी सदर बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

## परीच्छेद क्र. १.६ :- साठा नोदवही

महानगरपालिकेतील विभागाव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका लेखा संहित १९७१ मध्ये विहित नमुन्यात नोंदवहया व अभिलेखे ठेवण्यात येतात.

त्यानुसार भांडार विभागाने सुध्दा लेखा संहिता मधील नियम क्र.१४२ मध्ये विहित केलेले नमुना क्र.१०९ ,नमुना क्र.११० व नमुना क्र.१११ नुसार साठा नोंदवहया ठेवणे आवश्यक आहे. तथापि सन २०१६-१७ मधील साठा नोंदवहया वरील पृष्ठावर नमुना क्र.४४ नमुद करुन उपरोक्त नमुन्या मधील रकान्यामध्ये काही बदल करुन साठा नोंदवहया ठेवण्यात आल्या आहेत.

तसेच भांडार विभागा कडील वस्तु इतर विभागाना देताना नियम क्र.१४२ (२) मध्ये नमुद विहित नमुना क्र.११२ प्रमाणे भांडार पुरविण्याचे आदेश प्राप्त न करता विभागा कडील मागणी पत्रानुसार वस्तु पुरविण्यात येतात.

भांडार विभागातील सन २०१६-१७ च्या साठा नोंदवहयामधील साठयामध्ये खालील बाबतीत साठा कमी /अधिक प्रमाणात आढळुन आला.

| अ.क्र | दिनांक | वस्तुचे नाव | नमुद प्रमाण | आवश्यक प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १८/०३/२०१७ | कार्यविवरण नोदवही | १६४ | २२४ |
| २ | २२/०२/२०१७ | झेरॉक्स पेपर (एफ.सी) | २७८ | २७३ |
| ३ | १६/०३/२०१७ | झेरॉक्स पेपर (ए/४) | ३५७ | ३५३ |

उपरोक्त प्रमाणे साठा नोदवहीमध्ये दुरुस्ती आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता १९७१ मधील नियम क्र.८ नुसार भांडार विभागाने नोंदवहया वापरण्यात आणण्यापुर्वी नोंदवही मधील एकुण पृष्ठांची संख्या त्या नोदवहीच्या शेवटच्या पृष्ठावर प्रत्यक्ष मोजणी नुसार लिखित स्वरुपात अधिकृत अधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. साठा नोंदवही मध्ये ब-याच नोंदीमध्ये खाडाखोड/उपरीलेखन दिसुन येत असल्याने त्याबाबत नियम क्र.१० नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक वितीय वर्षाच्या अखेरीस साठा नोंदवही प्रत्येक वस्तुच्या संदर्भात शेवटची शिल्लक दर्शवुन प्राधिकृत अधिका-यांच्या स्वाक्षरीने बंद करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमिततांचे निराकरण करण्याबाबत अर्धसमास क्र. २२ दि. २८/०५/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते तथापि अद्याप विभागाकडुन काहीही कळविण्यात आलेले नाही. तरी परीच्छेदामध्ये नमुद अनियमिततांचे निराकरण होणे आवश्यक आहे.

## परिच्छेद क्र. 1.7, घरपट्टी कराची / पाणी पट्टी कराची कोरी पावती पुस्तके रद्द केल्याबाबत...

वित्त वर्ष 2016-2017 करिता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भांडार विभागाचे लेखापरिक्षणात खालील नमुद केलेले कोरे पावती पुस्तके रद्द केलेली आहेत. हया बाबतचे तपशित खालील प्रमाणे

| अनु क्र. | पावतीपुस्तक विवरण | पावती पुस्तक क्रमांक | एकूण पावती पुस्तक संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | घरपट्टी कराची वसुली पावती पुस्तके | 14 ते 20 | 7 नग | नोंदवही क्र 91 पृष्ठ क्र. 1 वरील नोंदीनुसार रद्द केलेले आहे. |
| 2 | पाणी पट्टी कराची पावती पुस्तके | 2850 ते 2900 | 51 नग | नोंदवही क्र 91 पृष्ठ क्र. 5 नुसार पेन्सीलीने शेरा मारुन पावती पुस्तके रद्द केलेली आहेत. |
| 3 | पाणी पट्टी कराची पावती पुस्तके | 2254 ते 2600 | | नोंदवही क्र 91 पृष्ठ क्र. 7 नुसार पेन्सील नोंदीनुसार रद्द केलेली आहेत. |

हया बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. महाराष्ट्र नगरपारिषद लेखासंहिता 2011 नियम 268 अन्वये प्रातिकृत अधिकारी सुस्थितीत असलेल्या तथापि कालबाहय झालेल्या / खराब झालेल्या किंवा सुस्थितीत नसलेल्या अथवा ज्यांची मागणी अत्यल्प आहे. किंवा ज्याची मागणी अजिबात नाही. अशा वस्तुंची वेळोवेळी पडताळणी करुन प्रत्येक तिमाहीतुन किमान एकदा अशा वस्तुंबाबत काय कार्यवाही करावी या बाबतचा निर्णय या कामासाठी स्थापना केलेल्या समिती मार्फत घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न करता सदर कोरे पावती पुस्तके रद्द करण्यात आलेली आहेत.
2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 272 प्रमाणे अशा बाबीचे मुल्यांकनाचे समायोजन भांडार अधिकारी यांनी मुख्याधिकाऱ्याकडून येथोचित असताना अशी कार्यवाही न करता कोरे पावती पुस्तके नियम बाहय पणे रद्द केलेली आहेत.
3. सदर घरपट्टी कराची / पाणीपट्टी कराची कोरे पावती पुस्तके रद्द का केली? या बाबतचे कारण नमूद केलेले नाही.

**परिच्छेद क्र. 1.8:- भांडार विभागातील कार्यपध्दती मधील अनियमितता**

वित्त वर्ष 2016-2017 हया कालवधीच्या लेखापरिक्षणात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भांडार विभागाची पडताळणी केली असता खालील नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा वापर केलेला नसल्याचे निर्देशनास येते

भांडार विभागाच्या कार्यपध्दतीसाठी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 251 ते 274 प्रमाणे कार्य पध्दतीचा अवलंब करुन अभिलेखे नोदी ठेवणे आवश्यक आहे.

| अनु क्र. | नियम | तपशिल |
|---|---|---|
| 1. | 251 | खरेदी आदेशासह / मागणी पत्रानुसार प्राप्त वस्तुंचे चलन नुसार वितरण करणे. |
| 2. | 253 | नमुना नंबर 70 मध्ये साहित्य पावती नोंद घेणे. |
| 3. | 254 | मागणीपत्र सादर करणे. |
| 4. | 257 | साहित्य प्रदान शिफारस |
| 5. | 259 | भांडार पुरवठा आदेश नमुना नं. 72 मध्ये भांडार अधिका-यांनी देणे आवयश्क आहे. |
| 6. | 264 | साहित्य मागणी एक पत्र भांडारात ठेवणे. |
| 7. | 266 | नोंदवही प्रमाणे वस्तुसूचि प्रमाणित करणे. |
| 8. | 268 | कालबाहय / खराब वस्तुसूचि तयार करणे . |
| 9. | 270 | नमुना नंबर 64 मध्ये साहित्य मागणी करणे . |
| 10. | 274 | वर्षाच्या शेवटी नमुना नं. 73 मध्ये शिल्लक मालाचा / वस्तुंचा अहवाल पाठविणे. |

तरी या पुढे भांडार विभागात उल्लेखनिय नियमाप्रमाणे उचित नमुना नंबर मध्ये अभिलेखे ठेवण्याची दक्षता घेण्यात यावी.

# आस्थापना विभाग

**परिच्छेद क्र.२.१ :- संगणक चालक तथा लिपिकांच्या पुरवठा करण्याबाबत दिलेल्या ठेक्या संदर्भात**

स्थायी समितीच्या दि. १४/१०/२०१५ रोजीच्या ठराव क्र.९५ अन्वये, तसेच, दि.३०/११/२०१५ रोजी उभय पक्षामध्ये केलेल्या करारामधील अट क्र.०९ नुसार, महापालिकेच्या विविध विभागामध्ये मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांनी नेमणुक केलेल्या ८५ संगणक चालक तथा लिपिक या पदावर नेमलेल्या सर्व उमेदवारांची आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करणारी प्रमाणपत्रे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी करुनही विभागाने सदर प्रमाणपत्रे दिली नसल्याने, नेमणुक केलेल्या कर्मचा-यांच्या शैक्षणिक पात्रतेची पळताळणी करता आली नाही. यासंदर्भात सा.प्र विभागाने दि. २४/६/२०१६ रोजीच्या पत्रान्वये, २४ कर्मचारी शैक्षणिक दृष्टया अपात्र असल्याचे ठेकेदारास कळविले आहे. मात्र याबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आली यांचा तपशिल आढळुन आला नाही.

तसेच करारामधील अट क्र.२३ नुसार ८५ संगणकचालक तथा लिपिकांचे मासिक पगार,मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांनी कर्मचा-यांच्या ज्या बॅंकखात्यामध्ये जमा केले, त्याचा तपशिल सादर करण्याची मागणी दि.०८/०५/२०१६ रोजीच्या अर्धसमास क्र.१५ अन्वये विभागाकडे केली आहे, मात्र सदर तपशिल अद्याप अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र. २.२ :- मागणी केल्यानुसार पात्र कर्मचा-याचा पुरवठा न केल्याने ठेकेदाराकडुन रु.२७०००/-दंड कसुल करण्याबाबत...**

अ) महापालिकेच्या विविध विभागामध्ये, ठेकेदार मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांनी पुरवठा केलेल्या ८५ संगणक चालक तथा लिपिक यांचे संदर्भात उभय पक्षामध्ये दि.३०/११/२०१५ रोजी केलेल्या करारामधील अट क्र.२४ नुसार ठेकेदाराकडे मागणी केल्यानुसार संगणक चालक तथा लिपिकाचा पुरवठ न केल्यास प्रति दिन रुपये १५०/- प्रमाणे ठेकेदार दंड देण्यास पात्र राहिल.

आ) करारनाम्यातील अट क्र.९ मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणारे कर्मचारी पुरविणे आवश्यक असताना व तशी मागणी केली असताना ठेकेदाराने पुरवठा केलेल्या कर्मचा-यापैकी २४ कर्मचारी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करणारे नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आल्या नंतर, ही बाब ठेकदारास दि.२४/०६/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे दिसुन येते. सबब सदर कर्मचारी **"मागणी केल्या प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणारे नसल्यान"** दि.०३/१२/२०१५ ते दि.३१/०५/२०१६ या कालावधी करीता प्रतिदिन रु.१५०/- प्रमाणे रु.२७०००/- इतका दंड ठेकदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

इ) वर नमुद केल्याप्रमाणे २४ अपात्र उमेदवाराच्या नेमणुकी संदर्भात दि.०१/०१/२०१६ ते दि.३१/०५/२०१६ या कालावधी करीता प्रति महिना रु. २११७०/- प्रमाणे दिलेला पाच महिन्याचा पगार रु. २५.४०/-लाख व त्यावरील ठेकदाराचे ५% सेवाशुल्क,रु. १.२७/- लाख, असा एकुण रु. २६.६७/- लाख इतका केलेला खर्च निष्फळ झालेला आहे, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

उपरोक्त बाब दि.१७/०५/२०१९ रोजीच्या अर्धसमास क्र.१९ अन्वये विभागाच्या निदर्शनास आणुन दिली आहे. तथापि याबाबतचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.

**परिच्छेद क्र.२.३:- गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांनी सादर केलेल्या बॅक गॉरंटी बाबत..**

१) स्थायी समितीच्या दि.१४/१०/२०१५ रोजीच्या ठराव क.९५ अन्वये, तसेच दि.३०/११/२०१५ रोजी उभय पक्षामध्ये केलेल्या करारामधील अट क्र.२५ नुसार, दि.२०/१२/२०१६ ते दि.१९/१२/२०१७ या कंत्राट कालावधीच्या व्दितीय वर्षासाठी गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांनी सादर केलेली बॅक ग्यारंटी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

२) सदर कंत्राटाच्या अट क्र.२६ नुसार बॅक ग्यारंटीची मुदत, ठेका संपल्या नंतर पुढील ३ महिन्या करीता वैध ठेवणे अनिवार्य आहे. तथापि गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांनी दि.०५/०१/२०१८ रोजीच्या पत्रासोबत सादर केलेल्या बॅक ग्यारंटी क्रमांक बीवायडी/०१/२०१७-१८ दि.२२/१२/२०१७ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते कि, प्रस्तुत ठेका दि.०२/१२/२०१८ रोजी संपल्या नंतर बॅक गॉरंटी ०२/१२/२०१८ नंतर पुढील ३ महिन्यापर्यंत वैध ठेवणे आवश्यक असताना सदर बॅक ग्यारंटी केवळ ३१/१२/२०१८ पर्यतच वैध असल्याचे दिसुन येते.

३) प्रस्तुत ठेका कालावधी दि.०२/१२/२०१८ रोजी संपल्या नंतरही हा ठेका आजपर्यंत चालुच असल्याने वाढीव कालावधी करीता बॅक ग्यारंटी घेण्यात आली आहे किंवा कसे? त्याचा संपुर्ण तपशिल लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्याची मागणी दि.०८/०५/२०१९ रोजीच्या अर्धसमासा अन्वये संदर्भित करण्यात आली आहे. तथापि उत्तर अद्याप अप्राप्त आहे.

## परिच्छेद क्र.२.४ :- गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांचे बरोबर केलेल्या करारामधील गंभीर अनियमितता बाबत...

महापालिकेच्या विविध विभागामध्ये, ठेकेदार गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांनी पुरवठा केलेल्या ८५ संगणक तथा लिपिक यांचे संदर्भात उभय पक्षामध्ये दि.३०/११/२०१५ रोजी केलेल्या कराराचे अवलोकन केले असता खालील गंभीर त्रुटी आढळुन आल्या.

१) सदर करारनामावर मा. आयुक्त यांनी दि.३०/११/२०१५ रोजी स्वाक्षरी केली आहे. तथापि सदर करारनामा केल्याचा दिनांक नमुद न करता ती जागा रिकामी (Blank) ठेवण्यात आली आहे. त्यामुळे करारनामा सुरु झाल्याचा व समाप्तीचा दिनांक, यांचा बोध होत नाही.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ व अनुसुची "ड", प्रकरण ५ मधील नियम १(अ) मध्ये महापालिकेचे करार कसे करावेत याचे नियमन केले असुन महापालिका आयुक्तांनी केलेल्या करारावर महापालिकेची मुद्रा उमटवुन करारनाम्यावर स्थायी समितीच्या दोन सदस्यांची, तसेच, साक्षीदारांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि प्रस्तुत करार करताना सदर कायदेशीर तरतुदीचे पालन केले नसल्याने कलम ७४(२) नुसार सदर करार महापालिकेवर बंधनकारक होऊ शकत नाही.

३) विभागाच्या काही संदर्भानुसार, सदर करार दि.०२/१२/२०८ रोजी संपुष्टात आल्याचे नमुद केले आहे व त्याच करारातील अटी व शर्तीस अधीन राहुन सदर ठेकेदारास दि.०३/१२/२०१९ ते ३१/०१/२०१९ या कालावधी करीता महापालिकेच्या दि.१९/०१/२०१९ रोजीच्या ठराव क्र.१०८ अन्वये, त्याच अटी व शर्ती वर मुदतवाढ देण्यात आली आहे. तथापि या वाढीव कालावधीसाठी कोणताही लिखित करार केलेला दिसुन येत नाही. शिवाय उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसुन येते कि, सदर ठेका दि.३१/०१/२०१९ नंतरही अद्याप चालुच आहे. मात्र बॅंक हमीपत्राचे नुतनीकरण न केल्याने व त्याची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपली असल्याने महापालिकेचे आर्थिक हितसंबंध सांभाळण्यासाठी मुदत बाह्य झालेल्या बॅंक हमी पत्राऐवजी अट क्र.२५ नुसार रु.३ लाख ठेकदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमितता संबंधी योग्य ती कार्यवाही करुन अभिप्राय देण्यासाठी सदर बाब दि.१७/०५/२०१९ रोजीच्या अर्धसमास क्र.२० अन्वये विभागास कळविली आहे. तथापि विभागाचे उत्तर अद्याप अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.२.५ :- संगणक चालक तथा लिपिक पुरवठाकारास केलेल्या अधिदानची संपुर्ण देयके उपलब्ध करुन देण्याबाबत..**

महापालिकेच्या विविध विभागामध्ये मे.गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांनी पुरवठा केलेल्या ८५ संगणक चालक तथा लिपिक बाबत दि.०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीमध्ये त्यांना केलेल्या अधिदानाची संपुर्ण देयके लेखापरीक्षणासाठी सत्वर उपलब्ध करुन देण्यासाठी दि.०८/०५/२०१९ रोजीच्या अर्धसमास क्र.१७ अन्वये केलेल्या मागणीवर लेखा विभागाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे अधिदानाची अंतिम खातरजमा करता आली नाही.

**परिच्छेद क्र.२.६ :- आस्थापानावरील पदांच्या तपशीला बाबत..**

मनपा आस्थापनावर वर्ष २०१६-१७ करीता वर्ग १,२,३ व ४ अधिकारी/कर्मचा-याची मंजुर पद संख्या, तसेच, वेतन आहरीत केलेल्या अधिकारी/कर्मचारी याचा पदाचा तपशिल आणि पगारपत्रे इ.बाबी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी दि.०४/०६/२०१९ रोजीच्या अर्धसमास क्र.२६ अन्वये केली होती. तथापि,सा.प्र/ आस्थापना विभागाने याबाबत कोणतीही कार्यकृती केली नसल्याने पगार पत्रकामधील पदनिहाय अधिदानाची पडताळणी करता आली नाही.

## परीच्छेद क्र. २.७ :- सेवा निवृत्ती लाभ

महानगरपालिकेमधुन सन २०१६-१७ या वर्षात सेवा निवृत्त/निधन पावलेल्या कर्मचा-यांची सेवा निवृत्ती लाभांची प्रकरणे तपासली असता खालील प्रकरणामध्ये अंशराशीकरणाचा दर दि. २७/२/२००९ पासुन ४०% पर्यंत असताना पुर्वीच्या दराने अंशराशीकरण मंजुर करण्यात आले. तसेच रजा रोखीकरण मंजुर करताना महागाई भत्ता कमी दराने अनुज्ञेय केल्याने कमी प्रदान झाले आहे.

| अ.क्र | कर्मचा-यांचे नाव | अनियमिततेचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | श्री.भास्कर पाटील | स्थायी समिती ठरावा नुसार नेमणुक दिनांक १३/२/८९ तथापि सेवापुस्तकामध्ये दि.६/६/८८ प्रमाणे नोंद व त्यानुसार परीगणना महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रजा रोखीकरण रु.१०४६०/- ने कमी प्रदान करण्यात आले. |
| २ | श्री.जगन्नाथ चंदनशिवे | रजालेख्यामध्ये १७ दिवस अर्जित रजा शिल्लक दिसत असताना रजा रोखीकरणाचे प्रदान करण्यात आले नसल्याने रजा रोखीकरण रु.१३२३४/- अदा करणे आवश्यक आहे. |
| ३ | श्रीमती.सुप्रिया थोरात | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.२५७५/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| ४ | श्री.इलियास पाटील | महागाई भत्ता वाढीव दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१२६३०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| ५ | श्री.भरत कदम | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आश्यक असल्याने रु.३६८६/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| ६ | श्री.सुरेश परब | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.४४२७/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| ७ | श्री.बापु बागुल | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.८४६०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| ८ | श्रीमती.विश्व भारती चहांदे | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यकअसल्याने रु.२१८३०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| ९ | श्री.ब्राजीस स्वामीनाथन | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.४८८७/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| १० | श्री.बॉनी डिमेलो | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१२१४०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| ११ | श्री.पेरीयन मनिकम | महागाई भत्ता ११९ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रजा रोखीकरणाची रक्कम ७८ दिवसाप्रमाणे अदा करण्यात आली ती ७६ दिवसानुसार अदा करणे आवश्यक असलयाने रु.८९/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| १२ | श्री.मनी मनगटी | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१४९५/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| १३ | श्री.विनय कुमार सवळे | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.२१८०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| १४ | श्रीमती.निरु लाला | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.४०९/- ने कमी प्रदान झाले आहे. |

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | अनियमिततेचे स्वरुप |
|---|---|---|
| १५ | श्री.सयेकर आरसन | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.२७५४/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| १६ | श्री.नारायण दिवाडकर | महागाई निवृतीच्या वेळी असलेल्या अनुज्ञेय १३६ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१३११०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| १७ | श्री.गोविंद भोईर | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.२११८/- ने कमी प्रदान झाले आहे.. |
| १८ | श्री.दिलीप उघडे | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.४०५९/- ने कमी प्रदान झाले आहे.. |
| १९ | श्री.पुन्नस्वामी पुमालय | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१३९६/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २० | श्री.मंगेश पाटील | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१०८२/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २१ | श्री.त्रिभुवन सोलंकी | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.५९७/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २२ | श्री.वसंत राऊत | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.५३२५/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २३ | श्री.संजय गोखले | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१२७८०/- ने कमी प्रदान झाले आहे.. |
| २४ | श्री.रमेश लोट | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१२४८/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २५ | श्री.विजय पाटील | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१६९९८/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २६ | श्री.वसंत राणे | महागाई भत्ता १२५ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.११३३०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २७ | श्री.हरीश पाटील | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.१९७७०/- ने कमी प्रदान झाले आहे. |
| २८ | श्री. सैगन कोतन | महागाई भत्ता १३२ % दराने अदा करणे आवश्यक असल्याने रु.२७९४/- ने कमी प्रदान झाले आहे. |

उपरोक्त प्रकरणी रु. १९३८६३/- एवढया रक्कमेचे संबंधिताना कमी प्रदान झाल्याने प्रकरणांच्या आढावा घेऊन कमी प्रदानित रक्कम अदा करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर बाबत अर्धसमास क्र.०५ दि.१६/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आलेले होते. परंतु अद्याप विभागाकडुन प्रतिसाद मिळालेला नाही.

## परीच्छेद क्र.२.८ :- भविष्य निर्वाह निधी

महानगरापलिकेतील कर्मचा-यासाठी महाराष्ट्र सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ लागु असुन कर्मचा-यांचे लेखे महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता १९७१ मध्ये विहित नमुन्यात ठेवण्यात येतात. तथापि वर्ष २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठीचे लेखे लेखा संहितामधील नियम क्र.१३४ मध्ये विहित नमुन्यात (नमुना क्र.९८ व ९९) ठेवण्यात आलेले नाहीत. तसेच उक्त नियमामध्ये अपेक्षित असलेले लेखा विवरणपत्रसुध्दा कर्मचा-यांना देण्यात आलेले नाही.

सदर नोंदवहया अभावी महानगरपालिकेमध्ये कार्यरत कर्मचारी सन २०१६-१७ मध्ये सेवानिवृत व निधन पावलेल्या कर्मचा-यांचे लेखे तपासता आले नाहीत. निवृत/निधन पावलेल्या कर्मचा-यांच्या वारसांना अदा केलेली रक्कम व कार्यरत कर्मचा-यांच्या लेख्यामध्ये लेखांकीत करण्यात आलेली रक्कम त्या वर्षाच्या घोषित व्याज दराने परिगणीत करण्यात आल्याची शहानिशा करता आलेली नाही.

तथापि सन २०१६-१७ मध्ये निवृत्त व निधन पावलेल्या खालील कर्मचा-यांची प्रदानीत देयके तपासली असता दि.०१/०४/२०१६ ते दि.३०/०९/२०१६ पर्यंत ८.१% व दि.०१/१०/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ पर्यंत ८% भविष्य निर्वाह निधी व्याज दर असताना सरसकट ८.७% दराने व्याज आकारुन अंतिम प्रदान करण्यात आल्याचे दिसुन आले आहे. त्यामुळे रु.३१५२५/- एवढया रक्कमेचे अतिप्रदान झाले आहे.

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव | सेवानिवृती दिनांक | प्रमाणक क्रमांक | नियमित वर्गणी रक्कमेमधील अतिप्रदान | ६वा वेतन आयोगाच्या रक्कमेमधील अतिप्रदान(रु) | एकुण अतिप्रदान (रु) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सैगन कोतन | ३१/०८/२०१६ | ५४ | ६८६ | १६१ | ८४४ |
| २ | श्री. ब्राजीस स्वामीनाथन | ३१/७/२०१६ | ३३ | ३२८ | ७७ (कमी प्रदान) | २५१ |
| ३ | श्री. विश्व भारती चहादे | ३१/०७/२०१६ | ३२ | १२८७ | २४६ | १५३० |
| ४ | श्री.संजय गोखले | ३०/०६/२०१६ | २९ | १४४५ | २६८ | १७१३ |
| ५ | श्री.वसंत राऊत | ३०/०६/२०१६ | २८ | ३३९ | १२७ | ४६६ |
| ६ | श्री. सुरेश परब | ३०/०६/२०१६ | २७ | २४६ | ११७ | ३६३ |
| ७ | श्री. वसंत राणे | ३१/०५/२०१६ | २० | ५९२ | ६३ | ६५५ |
| ८ | श्रीम.निरु लाला | ३१/०५/२०१६ | १९ | १३२ | ५६ | १८८ |
| ९ | श्री. गोविंद भोईर | ३१/०५/२०१६ | १८ | १६५ | ५८ | २२३ |
| १० | श्री. त्रिभुवन सोलंकी | ३१/०५/२०१६ | १७ | ७९ | ६८ | १४७ |
| ११ | श्री. बी.टी.बागुल | ३१/०५/२०१६ | १६ | ४८४ | ९७ | ५८१ |
| १२ | श्री. जगन्नाथ चंदनशिवे | ३१/०५/२०१६ | १५ | २२९ | ४३ | २७२ |
| १३ | श्री. भास्कर पाटील | ३०/०४/२०१६ | १० | - | १०९ | १०९ |
| १४ | श्री. विश्यनाथ पाटील | २८/०२/२०१७ | ९१ | २४८७ | ५६६ | ३०५३ |
| १५ | श्रीम. विजया राजेद्र | २१/०६/२०१६ (मयत) | ८४ | १६० | ७५ | २३५ |

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव | सेवानिवृती दिनांक | प्रमाणक क्रमांक | नियमित वर्गणी रक्कमेमधील अतिप्रदान | ६वा वेतन आयोगाच्या रक्कमेमधील अतिप्रदान(रु) | एकुण अतिप्रदान (रु) |
|---|---|---|---|---|---|---|
| १६ | श्री. एलायस पाटील | ३१/०१/२०१६ | ८३ | ६१५ | ३६७ | ९८२ |
| १७ | श्री. नारायण दिवाडकर | ३१/०१/२०१७ | ८२ | १७३५ | ३८० | २११५ |
| १८ | श्री. सयेकर आरसन | ३१/१२/२०१६ | ७१ | १४८२ | ३२५ | १८०७ |
| १९ | श्री. विजय पाटील | ३१/१२/२०१६ | ७० | ५१० | १००८ | ६११८ |
| २० | श्री. मनी मनगटी | ३०/११/२०१६ | ६७ | ६८७ | १९७ | ८८१ |
| २१ | श्री.रमेश लोट | ३१/१०/२०१६ | ६४ | ५६५ | २१७ | ७८२ |
| २२ | श्री. विजयकुमार सवळे | ३१/१०/२०१६ | ६३ | ६०८ | २०९ | ८१७ |
| २३ | श्रीम. सुप्रिया थोरात | ३१/१०/२०१६ | ६२ | ११९३ | ४२४ | १६१७ |
| २४ | श्री. बॉनी डिमेलो | ३१/१०/२०१६ | ६१ | २७६३ | ४७६ | ३२३९ |
| २५ | श्री. हरी पाटील | ३०/०९/२०१६ | ५७ | १४६९ | ८३० | २२९९ |
| २६ | श्री. पुन्नस्वामी पुमालय | १३/०५/२०१६ | ५२ | १७२ | ६६ | २३८ |
| | एकुण | | | | | ३१५२५/- |

उपरोक्त बाबत आस्थापना विभागात अर्धसमास क्र.०४ दि.१५/०४/२०१९ व क्र.६ दि.२२/०४/२०१९ अन्वये खुलासा व आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविले असता अद्याप विभागा कडुन काहीही कळविण्यात आलेले नाही.

तरी आस्थापना विभागाने लेखा संहितेमध्ये विहिलनमुन्यात नोंदवहया ठेवणे आवश्यक असुन सन २०१६-१७ मध्ये शासनाने घोषित केलेल्या दराने भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेवर व्याज आकारुन कार्यरत कर्मचा-यांच्या लेख्यात सुधारणा व निवृत्त/निधन पावलेल्या कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतन /कुढुंब निवृती वेतनामधुन जादा प्रदान व्याजाच्या रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे.

**परीच्छेद क्र. २.९ :- भविष्य निर्वाह निधीमधील गुंतवणुकीबाबत..**

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाची नमुना क्र.१०० या नमुन्यातील भविष्य निर्वाह निधी दैनिक पुस्तक तपासले असता दि.३१/०३/२०१७ रोजी एफ.डी.रु.३०,५७,००,४२१/- व पोस्ट रु.३०९०/- अशी एकुण रु.३०,५७,०३,५११/- गुंतवणुक दर्शविण्यात आली आहे. तथापि या अनुषंगाने लेखा विभागा कडील गुंतवणुक नोंदवही तपासली असता भविष्य निर्वाह निधी अंतर्गत रु.३०,९९,७८,९७०/- ची गुंतवणुक केल्याचे दिसुन आले. त्यामुळे दोन्ही रक्कमांमध्ये रु.४२,७५,४५९/- एवढया रक्कमेची तफावत दिसुन येते. तसेच पोस्टातील गुंतवणुकीची कागदपत्रे सुध्दा उपलब्ध झाली नाहीत.

उपरोक्त तफावती बाबत विभागास अर्धसमास क्र.७.दि.२३/०४/२०१९ अन्वये विचारणा करण्यात आली होती. परंतु अद्याप कळविण्यात आलेले नाही.

तरी सदर तफावती बाबत खुलासा होणे आवश्यक आहे. सोबत गुंतवणुक विवरणपत्र जोडले आहे.

**परीच्छेद क्र. २.९ :- भविष्य निर्वाह निधीमधील गुंतवणुकीबाबत..**

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाची नमुना क्र.१०० या नमुन्यातील भविष्य निर्वाह निधी दैनिक पुस्तक तपासले असता दि.३१/०३/२०१७ रोजी एफ.डी.रु.३०,५७,००,४२१/- व पोस्ट रु.३०९०/- अशी एकुण रु.३०,५७,०३,५११/- गुंतवणुक दर्शविण्यात आली आहे. तथापि या अनुषंगाने लेखा विभागा कडील गुंतवणुक नोंदवही तपासली असता भविष्य निर्वाह निधी अंतर्गत रु.३०,९९,७८,९७०/- ची गुंतवणुक केल्याचे दिसुन आले. त्यामुळे दोन्ही रक्कमांमध्ये रु.४२,७५,४५९/- एवढया रक्कमेची तफावत दिसुन येते. तसेच पोस्टातील गुंतवणुकीची कागदपत्रे सुध्दा उपलब्ध झाली नाहीत.

उपरोक्त तफावती बाबत विभागास अर्धसमास क्र.७.दि.२३/०४/२०१९ अन्वये विचारणा करण्यात आली होती. परंतु अद्याप कळविण्यात आलेले नाही.

तरी सदर तफावती बाबत खुलासा होणे आवश्यक आहे. सोबत गुंतवणुक विवरणपत्र जोडले आहे.

परिच्छेद क्र. 2.10 :- सुरक्षा रक्षक पुरवठ्याच्या ठेक्यामधील अनियमितता बद्दल.

स्थायी समितीच्या दि. 09/06/2015 रोजीच्या ठराव क्र. 33 अन्वये, महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये 466 विनाहत्यारी सुरक्षा रक्षक पुरविण्याचा ठेका, लघुत्तम निविदाधारक मे. सैनिक ॲण्ड इंटेलिजंट सिक्युरिटी प्रा.लि., यांना देण्यात आला. याबाबत वर्ष 2016-17 संबंधी, विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर ठेक्यासंदर्भात खालील त्रृटी अढळून आल्या.

1) शासन निर्णय क्र. एसजीए/1506/प्र.क्र.92/का.5, दि. 08/11/2006 नुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून, सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच ज्या संस्था सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करणार नाहीत, अशा संस्थांचे जबाबदार अधिकारी दंडात्मक कार्यवाहीस पात्र असतील, असेही निर्देशित केले आहे. तथापी, महानगरपालिका प्रशासनाने सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्याने, या संदभात मा. मुंबई उच्च् न्यायालयामध्ये दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. 66/2013 च्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाने दि. 26/03/2014 रोजीच्या शासन पत्रानुसार, महापालिका प्रशासनास असे आदेशीत केले की, सुरक्षा रक्षक मंडळाकडे नव्याने विचारणा करुन आवश्यक संख्येएवढे सुरक्षा रक्षक पुरविण्याचे मंडळाने मान्य केल्यास, विद्यमान ठेकेदार, मे. सैनिक ॲण्ड इंटेलिजंट सिक्युरिटी प्रा.लि., यांचा दि. 10/05/2013 च्या पुढे 1 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर, महामंडळाचे सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तथापी, खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियम 1981, मधील तरतुदी, महानगरपालिकेस बंधनकारक नाहीत, या कारणास्तव महानगरपालिकेने दि. 25/11/2014 रोजीच्या ठराव क्र. 42 अन्वये, विद्यमान ठेकेदारस दि. 01/05/2014 ते दि. 30/04/2016 पर्यंत मुदतवाढ दिली व त्यानंतर जाहीर निविदेद्वारे सुरक्षा रक्षक नेमण्याचा निर्णय घेतला. तथापी, याबाबत नव्याने महाराष्ट्र शासनाचे आदेश प्राप्त करुन कार्यादेश देणे आवश्यक होते.

2) मा. आयुक्त यांनी दि. 19/11/2016 रोजीच्या आदेश क्र. सा.प्र./1389/2016 अन्वये असे निर्देशित केले होते की, सुरक्षा रक्षक पुरवठा तसेच अन्य ठेकेदारांची देयके तयार करण्यापूर्वी संबंधीत ठेकेदाराने शासनाचे कर, फी, देणी, उदा. सेवाकर, पी.एफ. ई.एस.आय.सी. वगैरे रकमांचा भरणा केल्याची चलने सादर केल्यानंतरच देयके तयार करण्यात यावीत. मा. आयुक्त यांच्या सदर आदेशास अनुसरुन मे. सैनिक ॲण्ड इंटेलिजंट सिक्युरिटी प्रा.लि., यांनी पुरवठा केलेच्या 466 सुरक्षा रक्षकांचे ई.एस.आय.सी., पी.एफ. तसेच इतर कर अदा केल्याबाबतची खातरजमा विभागाने करुन अनुपालन दर्शवावे.

3) पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस स्टेशन (वाहतूक विभाग) यांच्या दि. 04/06/2016 रोजीच्या पत्र क्र. 965/2016 नुसार, मे. सैनिक ॲण्ड इंटेलिजंट सिक्युरिटी प्रा.लि., यांनी मिरा भाईंदर विभागातील वाहतून नियमनाकरिता 50 ट्रॅफिक वॉर्डन पुरविण्याचे मान्य केले होते. तथापी, सदर ठेकेदार 50 वॉर्डन देण्यास समर्थ नसल्याने दैनंदिन कामाकरीता 50 पेक्षा कमी वार्डन पुरवित असल्याचे, तसेच, सदर वॉर्डनवर ठेकेदाराचे नियंत्रण नसल्याने, नेमलेले वॉर्डन कर्तव्यावर उशिराने येतात, लवकर निघून

जातात व कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा करत असल्याबाबत मा. महापालिका आयुक्तांना पोलीस विभागाने कळविले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने ठेकेदारावर कोणती दंडात्मक कार्यवाही करण्यात आली, याचा तपशील परीक्षणास उपलब्ध करुन देण्याची विनंती विभागास करण्यात आली आहे.

उपरोक्त अनियमितता बाबत तातडीने कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याची विनंती दि. 18/07/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 47 अन्वये केली असून, या सर्व बाबी संबंधिचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र.2.11 :- वाढीव कुटूंब निवृत्ती वेतन

महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम 1982 मधील नियम क्र.116 (4)(अ),(एक) नुसार कर्मचारी सेवेत असताना मुत्यु पावला तर त्यास मिळालेल्या अंतिम वेतनाच्या 50 टक्के रक्कम किंवा पोटनियम (2) अनुसार अनुज्ञेय असणा-या कुढुंब निवृत्ती वेतनाची दुप्पट रक्कम यापैकी जी कमी असेल अशी अनुज्ञेय रक्कम शासकीय कर्मचा-याच्या मुत्युच्या दिनांका नंतरच्या दिनांका पासुन सात वर्षाचा कालावधी किंवा मृत शासकीय कर्मचारी हयात राहीला असता तर तो त्या दिनांकास 65 वर्ष वयाचा झाला असता त्या दिनांका पर्यतच्या कालावधी यापैकी कमी असेल त्या कालावधीसाठी प्रदेय आहे व तद नंतर याच नियमांच्या पोटनियम (2) नुसार अनुज्ञेय कुढुंब निवृत्ती वेतन देय आहे. शासन निर्णय (वित्त विभाग ) क्र.सेनिवे1009/प्र.क्र.33/सेवा.4 दि.30/10/2009 नुसार दि 01/01/2006 पासुन संबंधित कर्मचा-यांच्या मुत्युच्या दिनांका नंतरच्या दिनांका पासुन 10 वर्षा पर्यत उच्च दराने कुटुंब निवृत्ती वेतनमिळेल व नंतर अंतिम मुळ वेतनाच्या 30 टक्के अशा एकरुप दराने अनुज्ञेय आहे.

तसेच शासकीय कर्मचा-याचा सेवा निवृत्ती नंतर मृत्यु झाल्यास उपरोक्त प्रमाणे निर्धारीत केलेले कुढुंब निवृत्ती वेतन सात वर्षाचा कालावधी किंवा सेवा निवृत्त मृत शासकीय कर्मचारी हयात राहिला असता तर ज्या दिनांकास तो 65 वर्ष वयाच्या झाला असता त्या दिनांका पर्यतचा कालावधी यापैकी कमी असेल त्या कालावधीसाठी प्रदेय होईल.

तरी आपल्या विभागाव्दारे उपरोक्त प्रमाणे दोन्ही परीस्थितीत सन 2016-17 या आर्थिक वर्षात कुढुंब निवृत्त वेतनाचा वाढीव दर कमी करुन मुळ दराने कुढुंब निवृत्ती वेतन प्रदान होणे आवश्यक असल्या प्रकरणी संबंधीताच्या कुढुंब निवृत्ती वेतन प्रकरणामध्ये बदल करण्यात आला किंवा

कसे? या बाबत प्रकरणासह लेखापरीक्षणास अवगत करण्यास अर्धसमास क्र. 23, दि. 03/06/2019 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्याप विभागाकडून कळविण्यात आलेले नाही.

तरी उपरोक्त प्रकरणी कुटुंब निवृत्ती वेतनाचा वाढीव दर कमी करुन मूळ दराने कुटूंब निवृत्ती वेतन अदा करणे आवश्यक असल्याच्या प्रकरणाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत लेखापरीक्षणास कळविणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 2.12 :- निवृत्ती वेतनाचा अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करणेबाबत..

शासन निर्णय वित्त विभाग क्र. नि अंक-1097/12/सेवा-4, दि. 26/05/1978 अन्वये अंशराशीकरणाच्या दिनांकापासून 15 वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर निवृत्ती वेतनाच्या 1/3 इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्याबाबतचा लाभ अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.नि.अंक 1003/83/सेवा-4, दि. 05/04/2003 अन्वये 15 वर्षांचा कालावधीच्या गणना करण्यासंबंधात खुलासा करण्यात आला आहे.

तरी उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने महानगरपालिकेतील ज्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अंशराशीकरण करुन ठोक रक्कम स्वीकारण्यात आली आहे. त्यापैकी ज्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांची सन 2016-17 मध्ये 15 वर्ष पूर्ण झाली आहेत त्यांचेबाबत निवृत्ती वेतनाच्या अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यात आला किंवा कसे? संबंधीतांच्या प्रकरणासह लेखापरीक्षणास कळविण्याबाबत अधसमास क्र. 24, दि. 03/06/2019 अन्वये विभागास कळविण्यात आले होते. तथापी अद्याप उत्तर अप्राप्त आहे.

तरी ज्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्तीनंतर 15 वर्ष पूर्ण झाली आहेत त्यांचेबाबत अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्याच्या कार्यवाहीबाबत अवगत करण्यात यावे.

परिच्छेद क्र. 2.13 :- सेवापुस्तक नोंदीमधील अनियमितता.

महानगरपालिकेतील काही निवडक कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके तपासली असता, त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) श्री. विनोद भोईर, लिपीक – श्री. भोईर यांच्या सेवापुस्तकामधील प्रथम पृष्ठावर विभाग प्रमुखाची स्वाक्षरी नसून वैद्यकीय तपासणी अहवाल नमूद नाही. सेवापडताळणीची अद्ययावत नोंद नाही. संगणक हाताळणी प्रशिक्षण केल्याची नोंद नाही. नामनिर्देशन पत्रे सेवापुस्तकात चिटकविण्यात आली नसून नामनिर्देशनाची सेवापुस्तकामध्ये नोंद उपलब्ध नाही. दि. 01/07/2017 व दि. 01/07/2018 रोजीची वेतनवाढ नोंद नाही. दि. 05/05/2006 ते दि. 12/05/2006 पर्यंत 8 दिवस अर्जित रजा रजाखात्यात खर्ची घालण्यात आली. तथापी, अर्जित रजा मंजूरीची नोंद नाही. दि. 01/01/2016 पासूनची रजा रजाखात्यात अद्याप जमा करण्यात आली नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंद साक्षांकीत नाहीत.

2) श्री. सुरेश साबळे, फायरमन – सेवापुस्तकामधील प्रथम पृष्ठावर विभाग प्रमुखाची स्वाक्षरी नाही. नेमणूक आदेशाची नोंद नाही. दि. 07/03/2014 ते दि. 19/03/2014 या कालावधीची 13 दिवस अर्जित रजेची दोन वेळा नोंद करण्यात आली असून रजालेख्यामध्ये सुद्धा दोन वेळा खर्ची टाकण्यात आली आहे. दि. 05/05/2015 ते दि. 13/05/2015 पर्यंत 9 दिवस अर्जित रजा, दि. 22/03/2015 ते दि. 08/04/2015 पर्यंत 18 दिवस अर्जित रजा, दि. 22/08/2015 ते दि. 24/08/2015 पर्यंत 3 दिवस अर्जित रजा, दि. 04/09/2015 ते दि. 09/09/2015 पर्यंत 6 दिवस अर्जित रजा, दि. 16/12/2015 ते दि. 22/12/2015 पर्यंत 7 दिवस परावर्तीत रजा, दि. 12/05/2016 ते दि. 25/05/2016 पर्यंत 13 दिवस अर्जित रजा, दि. 04/12/2016 ते दि. 13/12/2016 पर्यंत 10 दिवस अर्जित रजा, दि. 05/05/2017 ते दि. 17/05/2017 पर्यंत 13 दिवस अर्जित रजा, दि. 25/11/2017 ते दि. 05/12/2017 पर्यंत 11 दिवस अर्जित रजा , दि. 16/12/2016 ते दि. 20/12/2016 पर्यंत 5 दिवस परावर्तीत रजा व दि. 08/12/2017 ते दि. 20/12/2017 पर्यंत 13 दिवस अर्जित रजा , रजा लेख्यामध्ये खर्ची दर्शविण्यात आली आहे. तथापी, रजा मंजूरी आदेशाची नोंद सेवापुस्तकामध्ये नाही. सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशनपत्रे चिकटविण्यात आली नसून नामनिर्देशनाची नोंद सुद्धा सेवापुस्तकामध्ये नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत.

3) श्री. राजेश भोईर, लिपीक – सेवापुस्तकामध्ये नेमणूक आदेशाची नोंद नाही. दि. 01/07/2017 व दि. 01/07/2018 च्या वेतनवाढी नोंदी नाहीत. दि. 01/07/2016 पासून रजा लेख्यात रजा जमा करण्यात आलेली नाही. संगणक हाताळणी परीक्षेची नोंद नाही. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही. सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशनपत्रे चिकटविण्यात आलेली नाहीत. नामनिर्देशनाची नोंद सुद्धा नाही. दि. 07/11/1994 ते दि. 11/11/1994 पर्यंत 5 दिवस परावर्तीत रजा खर्ची टाकण्यात आली आहे. परंतु रजा मंजुरी आदेशाची नोंद नाही. दि. 12/05/1997 ते दि. 21/05/1997 पर्यंत 10 दिवस अर्जित रजा मंजूरी असतांना रजा लेख्यात मात्र 20 दिवस खर्ची टाकण्यात आली. दि. 03/05/2006 ते दि. 20/05/2006 पर्यंत 18 दिवस अर्जित रजा रजालेख्यात खतविण्यात आली परंतु रजा मंजुरी आदेशाची नोंद नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंद साक्षांकीत नाहीत.

4) श्री. निळकंठ म्हात्रे, वाहनचालक –दि. 01/07/2016 पासून वेतनवाढी नोंदी नाहीत. दि. 1/07/2001 ते दि. 31/12/2001 व दि. 01/01/2011 ते दि. 30/06/2011 या कालावधीची 15+15 दिवस अर्जित रजा रजालेख्यात जमा करणे आवश्यक आहे. दि. 06/10/2002 ते दि. 19/10/2002 पर्यंत 14 दिवस अर्जित रजा रजालेख्यात खर्ची टाकण्यात आली. परंतु सदर रजा मंजूरी आदेशाची नोंद नाही. दि. 22/03/2005 ते दि. 27/03/2005 पर्यंत 6 दिवस अर्जित रजा मंजूरीची नोंद आहे. परंतु सदरची रजा, रजालेख्यामध्ये खर्ची टाकण्यात आलेली नाही. दि. 30/12/2008 ते दि. 06/01/2009 पर्यंत 08 दिवस अर्जित रजा खर्ची टाकणे आवश्यक असतांना 07 दिवस खर्ची टाकण्यात आली

आहे. दि. 01/01/2016 पासून रजा, रजाखात्यात दर्शविण्यात आलेल्या नाहीत. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत. सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशन पत्रे चिटकविण्यात आलेली नाहीत. नामनिर्देशनाची नोंद सुद्धा नाही.

5) श्रीम. अनिता कांबळे, दूरध्वनी सहाय्यक – दि. 23/03/2007 ते दि. 27/04/2007 पर्यंत 36 दिवस अर्जित रजा मंजूरीची नोंद असतांना रजा लेख्यामध्ये मात्र 5 दिवस अर्जित रजा खर्ची टाकण्यात आली आहे. रजालेख्यामध्ये दि. 23/04/2015 ते दि. 30/04/2015 पर्यंत 08 दिवस अर्जित रजा खर्ची टाकण्यात आली. तथापी, रजा मंजूरी आदेशाची नोंद नाही. दि. 23/12/2016 ते दि. 27/12/2016 पर्यंत 5 दिवस अर्जित रजा, दि. 01/05/2017 ते दि. 06/05/2017 पर्यंत 6 दिवस अर्जित रजा, दि. 19/05/2017 ते दि. 31/05/2017 पर्यंत 13 दिवस अर्जित रजा, दि. 23/10/2017 ते दि. 27/10/2017 पर्यंत 5 दिवस अर्जित रजा व दि. 14/05/2018 ते दि. 28/05/2018 पर्यंत 15 दिवस अर्जित रजा खर्ची टाकण्यात आली आहे. परंतु सदर रजा मंजूरीच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये नाहीत. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत. दि. 15/03/2004 ते दि. 30/06/2004 या कालावधीची रजा, रजा लेख्यामध्ये 9 दिवस जमा करणे आवश्यक असतांना 11 दिवस जमा करण्यात आली. सेवा पुस्तकामध्ये नामनिर्देशन पत्रे चिटकविण्यात आली नसून नामनिर्देशनाची नोंद सुद्धा नाही.

6) श्री. रमेश पवार, शिपाई – सेवापुस्तकामध्ये वैद्यकीय तपासणी अहवालाची नोंद नाही. दि. 01/07/2017 पासून वेतनवाढी नोंदी नाहीत. दि. 01/07/2008 ते दि. 31/12/2008 या सहामाही कालावधीतील 15 दिवस अर्जित रजा, रजालेख्यात जमा केल्यास 190 दिवस शिल्लक दर्शविणे आवश्यक असतांना 185 दिवस दर्शविण्यात आली. तसेच त्यामधून दि. 02/12/2008 ते दि. 31/12/2008 या कालावधीची 30 दिवस अर्जित रजा खर्ची टाकल्यास 160 दिवस रजा शिल्लक असणे आवश्यक आहे. दि. 15/07/2008 ते दि. 18/07/2008 पर्यंत 4 दिवस अर्जित रजा खर्ची टाकण्यात आली. परंतु रजा मंजुरी आदेशाची नोंद नाही. दि. 24/07/2009 ते दि. 23/09/2009 पर्यंत 62 दिवस वैद्यकीय रजा मंजूर असल्याने या कालावधीची परावर्तीत रजा खर्ची घालून पुन्हा दि. 24/07/2009 ते दि. 21/08/2009 पर्यंत 29 दिवस अर्जित रजा खर्ची टाकरण्यात आली. दि. 19/03/2013 ते दि. 22/03/2013 पर्यंत 4 दिवस अर्जित रजा व दि. 03/02/2016 ते दि. 06/02/2016 पर्यंत 4 दिवस अर्जित रजा, रजालेख्यात खर्ची टाकण्यात आली. तथापी, रजा मंजूरी आदेशाची नोंद नाही. तसेच दि. 1/01/2017 पासून रजा लेख्यामध्ये रजा जमा करण्यात आलेल्या नाहीत. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत. नामनिर्देशनाची नोंद नाही.

7) श्री. दत्तु वेहळे, शिपाई – सेवापुस्तकामध्ये नेमणूक आदेशाची नोंद नाही. दि. 01/07/2005 ते दि. 31/12/2005 या सहा महिन्यांची 15 दिवस अर्जित रजा जमा केल्यावर 249 दिवस अर्जित रजा शिल्लक राहणे आवश्यक असतांना 255 दिवस दर्शविण्यात आली आहे. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत. नामनिर्देशनाची नोंद नाही

8) श्री. रमेश भोये – सेवापुस्तकामध्ये दि. 01/07/2017 व दि. 01/07/2018 च्या वेतनवाढ नोंदी नाहीत. दि. 23/03/2015 ते दि. 25/03/2015, दि. 21/05/2015 ते दि. 03/06/2015, दि. 08/07/2015 ते दि. 09/07/2015, दि. 25/06/2015 ते दि. 30/06/2015, दि. 01/06/2017 ते दि. 15/06/2017 व दि. 25/10/2017 ते दि. 06/11/2017 पर्यंतची अर्जित रजा, रजालेख्यात खर्ची टाकण्यात आली. तथापी, रजा मंजूरी आदेशाची नोंद नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंद साक्षांकीत नाहीत. नामनिर्देशनाची नोंद नाही.

9) श्री. स्वप्नील सावंत, सहा. आयुक्त – सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर विभाग प्रमुख्याची स्वाक्षरी व वैद्यकीय अहवाल नमुद नाही. नेमणूकीच्या आदेशाची नोंद नाही. जात पडताळणी नोंद नाही. संगणक हाताळणी प्रशिक्षण उत्तीर्णतेची नोंद नाही. दि. 01/07/2017 पासून वेतनवाढ नोंद नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाही. नामनिर्देशनाची नोंद नाही.

10) श्री. नविनकुमार तांडेल, मुकादम – सेवापुस्तकामध्ये जातपडताळणीची नोंद नाही. दि. 01/07/2018 ची वेतनवाढ नोंद नाही. दि. 07/08/2015 ते दि. 14/08/2015 पर्यंत 8 दिवस, दि. 15/12/2015 ते दि. 28/12/2015 पर्यंत 14 दिवस व दि. 09/12/2016 ते दि. 12/12/2016 पर्यंत 4 दिवस अर्जित रजा, रजालेख्यामध्ये खर्ची टाकरण्यात आली. परंतु रजा मंजूरी आदेशाची नोंद नाही. सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशनपत्रे चिटकविण्यात आली नसून नामनिर्देशनाची नोंद सुद्धा नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत.

11) श्री. चेतन म्हात्रे, कनिष्ठ अभियंता – सेवापुस्तकामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही. दि. 01/07/2016 पासून वेतनवाढ नोंद नाही. दि. 18/05/2015 ते दि. 22/05/2015 पर्यंत 05 दिवस व दि. 28/04/2017 ते दि. 26/05/2017 पर्यंत 29 दिवस अर्जित रजा, रजालेख्यात खर्ची टाकण्यात आली. परंतु रजा मंजुरी आदेशाची नोंद नाही. सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशनपत्रे चिकटविण्यात आली नसून नामनिर्देशनाची नोंद सुद्धा नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत.

12) श्री. नरेंद्र चव्हाण, प्रभाग अधिकारी – सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशनपत्रे चिकटविण्यात आली नसून नामनिर्देशनाची नोंद सुद्धा नाही. सेवापुस्तकामधील बऱ्याच नोंदी साक्षांकीत नाहीत.

उपरोक्त प्रमाणे इतर कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकामध्ये सुद्धा वरील अनियमितता असण्याची शक्यता असल्याने उपरोक्त व इतर कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांमधील अनियमिततांचे निराकरण होणे आवश्यक असल्याने अर्धसमास क्र. 44, दि. 16/07/2019 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्याप निराकरण केल्याचे कळविण्यात आले नसल्याने तात्काळ निराकरण होणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 2.14 :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेबाबत.

शासन निर्णय क्र. सकानि-2007/प्र.क्र.176/2007/नवि-6, दि. 22/10/2008 नुसार नगरपालिका/ महानगरपालिकेतील सफाई कामगारांची सेवा 25 वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे. अशा कामगारांचे विशिष्ट स्वरुपाचे काम विचारात घेवून अशा कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्यांच्या पात्र वारसांना मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत विषयांकित योजनेअंतर्गत निर्णय घेण्यात आला आहे.

उपरोक्त आवास योजनेअंतर्गत तरतुद करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत लेखापरीक्षणास अवगत करण्याबाबत अर्धसमास क्र. 45, दि. 17/07/2019 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्याप कळविण्यात आले नसल्याने विषयांकित योजनेबाबतच्या कार्यवाहीबाबत अवगत करण्यात यावे.

परिच्छेद क्र. 2.15 :- नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत.

शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो-1005/126/सेवा-4, दि. 31/10/2005 नुसार दि. 01 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान योजना अंमलात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो-1007/18/सेवा-4, दि. 07 जुलै, 2007 अन्वये परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेच्या अंमल बजावणीसाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तरी उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र. 8 ते 23 पर्यंत दिलेल्या तरतुदी नुसार विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील व त्या अनुषंगाने सन 2016-17 या वित्तीय वर्षामध्ये केलेल्या प्रकरणांचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास क्र. 46, दि. 18/07/2019 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्याप कार्यवाहीचा तपशील कळविण्यात न आल्याने तपशील कळविणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. 2.16 :-  सेवापुस्तकांच्या वार्षिक पडताळणीबाबत.**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम 45 नुसार सेवापुस्तकांची प्रत्येक कार्यालयात दरवर्षी मे महिन्यात कार्यालय प्रमुखाकडून पडताळणी करणे आवश्यक आहे. सेवापुस्तकामधील नोंदी अचुक आहेत याबाबत कार्यालय प्रमुखाचे समाधान झाले तर असा अधिकारी "मागील वित्तीय वर्षाच्या अखेर पर्यंत सेवेची पडताळणी वेतन देयकावरुन व अभिलेखावरुन केली आहे." अशा आशयाचे प्रमाणपत्र स्वतःचे सहीने नोंदवेल अशी तरतूद आहे. तथापी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाची सन 2016-17 या वर्षात वार्षिक पडताळणी न झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांची वार्षिक पडताळणी करुन तसे प्रमाणित करुन अनुपालन सादर करण्याबाबत अर्धसमास क्र. 50, दि. 19/07/2019 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्याप विभागाकडून काहीही कळविण्यात न आल्याने उपरोक्तप्रमाणे अनुपालन होणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 2.17 :- नामनिर्देशन पत्रांबाबत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चे कलम 115 नुसार सेवा निवृत्ती उपदान/मृत्यू उपदान मिळण्याचा हक्क असलेल्या कायम कर्मचाऱ्यांकडून प्रकरण परत्वे नमुना 1 किंवा नमुना 2 मध्ये नामनिर्देशन पत्रे भरुन घेणे बाबतची तरतूद आहे.

वित्तीय वर्ष 2016-17 चे लेखापरीक्षण करतांना महानगरपालिकेमधील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांमध्ये उपरोक्त नियमाच्या तरतुदीनुसार नामनिर्देशन पत्रे चिकटविण्यात आली नसून तशी नोंद सुद्धा पुस्तकामध्ये घेतली नसल्याचे निदर्शनास आले.

उक्त नियमानुसार नामनिर्देशन पत्रे भरुन सेवा पुस्तकामध्ये चिकटविण्यात व त्यांची नोंद सेवापुस्तकात घेण्यात न आल्याने कर्मचाऱ्याच्या आकस्मात मृत्यूप्रसंगी त्यांच्या पश्चात वारसांना देणी देण्यात अडचणी उदभवतात व लाभ मिळण्यास उशीर होतो. तरी याबाबत विभागाने नामनिर्देशनाबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील कलम 115 नुसार कार्यवाही करुन अनुपालन सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 53, दि. 22/07/2019 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु विभागाने अद्याप काहीही कळविले नसल्याने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. 2.18 <u>अनुज्ञेय नसताना कुटुंब निवृत्तीवेतनाचे प्रदान केलेबाबत</u>......**

श्री. जयराम वेल्यन, सफाई कामगार पदावर असतांना दि.12/02/2008 रोजी मयत झाले असून त्यांची पत्नी श्रीमती भारतमणी 15/02/2008 रोजी मयत झाल्या आहेत. त्यांच्या पश्चात वारस त्यांचा एक मुलगा कु.विजयन जयराम वेल्यन असून त्याची जन्मतारीख दि.26/09/1992 अशी आहे. कर्मचा-याच्या निधनानंतर देय होणारे कुटूंब निवृत्ती वेतन त्यांचा वारस मुलगा कु.विजयन यांना मंजूर करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी अभिप्राय खालीलप्रमाणे -

1. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन) 1982 मधील नियम 116(5)(दोन)मधील तरतूदीनुसार कुटूंब निवृत्ती वेतन धारक मयत कर्मचा-याचा मुलगा असेल तर त्याला वयाच्या 21 वर्षापर्यंत कुटूंब निवृत्ती वेतन अनुज्ञेय आहे. सदर प्रकरणी कुटूंब निवृत्ती वेतन धारक (मयत कर्मचा-याचा मुलगा) कु.विजयन याची जन्मतारीख दि.26/09/1992 अशी असून त्याला दि.25/09/2013 रोजी वयाची 21 वर्षे पूर्ण झालेली आहेत. सबब संदर्भीय तरतूदीनुसार दि.26/09/2013 पासून श्री.विजयन (मयत कर्मचा-याचा मुलगा) यांना कुटूंब निवृत्ती वेतनाचे प्रदान अनुज्ञेय नाही. तथापि कै.जयरामन वेल्यन /श्रीम.विजयन जयरामन वेल्यन वारस पत्नी या नावाने कुटूंब निवृत्ती वेतनाचे प्रदान अदयाप होत असल्याचे अभिलेखावरून निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी अर्धसमास क्रमांक 14/03-02-2021 अन्वये खुलासा मागविण्यांत आला असून खुलासा अप्राप्त आहे.

प्रकरणी माहे फेब्रुवारी,2021 पासून निवृत्ती वेतन बंद करण्यांत आलेले असून दि.25/02/2013 ते माहे जानेवारी,2021 दरम्यानच्या कालावधीमध्ये नियमबाहय अदा केलेली निवृत्ती वेतनाची **रक्कम रु 5,96,970.72** वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशाप्रकारे इतर प्रकरणे आहेत का ? याबाबत आस्थापना विभागाने तपासणी करुन अनुपालन सादर करावे.

**( वसुलपात्र रक्कम रू. 5,96,970.72)**

परिच्छेद क्र. (2.19) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी व वैद्यकिय आरोग्य विभागातील कर्मचा-यांची EPF ची रक्कम कर्मचारी भविष्य निधी संगठण येथे जमा न केल्याबाबत....

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर आरोग्य विभागातील ठोक मानधनावर 27 कर्मचारी कार्यरत असलेल्या बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर 2014 ते मार्च 2018 हया कालावधीत कर्मचारी भविष्य निधी रक्कम संगठण येथे माहे. ऑगस्ट 2021 अखेर पर्यंत जमा केलेली नसल्याचे दिसुन येते.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कर्मचारी भविष्य 1952 नियम -19 उपनियम (3)(क)(ख) भारत सरकार राजपत्र दिनांक 08-01-2011 नुसार लागू केलेले आहे.

2. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संगठण श्रममंत्रालय भारत सरकार यांचे संदर्भिय पत्र क्र. MH/PF/KND/21365/7A-Comp-II / दिनांक 10-10-2016 अन्वये उद्योग व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन यांचे दिनांक 01-06-2016 चे अर्धशासकीय पत्रानुसार बाहय यंत्रणे मार्फत नियुक्त केलेल्या / कार्यरत असलेल्या कर्मचारी /कामगार हयांना समाजिक सुरक्षेअतंर्गत फायदे देणे बाबत कामगारांना EPF योजना 1952 अतंर्गत फायदे देण्याची कार्यवाही करणेबाबत सूचित केलेले आहे.

असे असतानाही सदर कार्यरत 27 कर्मऱ्यांचे माह. मार्च 2018 अखेर पर्यंतची मासिक पगाराच्या देय्यकातून कपात केलेली कर्मचारी हिस्सा रक्कम व कार्यालयाची हिस्सा रक्कम संगठण येथे माहे.ऑगस्ट 2021 पर्यंत जमा केलेली नाही. तरी याबाबत पूर्ततासह अनुपालन दर्शवावे.

## परि छेद क्र. (2.20) :- भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान देय्यक रक्कमेपेक्षा बँक शाखेतून जादा प्रदान रक्कमेबाबत...

मिरा भाईदर महानगरपालिका मधील कर्मचारी श्री. लक्ष्मण हरि फर्डे हयाचे भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान रक्कम प्रमाणक क्र. 25 दि. 01-06-2017 धनादेश क्र. 680927 प्रमाणे रक्कम रु. 306277/- अशी नमूद आहे. व त्याप्रमाणे कॅशबुक मध्ये प्रमाणक निहाय रक्कम रु. 306277/- अशी नमूद केलेली आहे. तथापि बँक पासबुक प्रमाणे खात्यातून श्री. लक्ष्मण हरि फर्डे हयांचे खाती रक्कम रु. 308277/- हस्तांतरीत केलेली दिसुन येत आहे. त्यामुळे 2000/- रु. जादा रक्कम बँक खाते मधून प्रदान केलेली आहे.हया बाबत अर्धसमास पत्र क्र. 213 दि. 23-08-2021 व्दारे सदर जादा प्रदान रक्कम वसुली झाली किंवा कसे हया बाबत माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणे बाबत सूचित केलेले होते. तथापि हया बाबत लेखापरिक्षणास माहिती उपलब्ध झालेली नाही.

तरी जादा प्रदान रक्कम रु. 2000/- संबधिता कडुन वसुल करुन भविष्य निर्वाह निधी खत्यात जमा करुन पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र. ( 2.21 ):- कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी वर्गणी दराबाबत....

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे वित्त वर्ष -2017-2018 करिता अभिलेखांची पडताळणी केली असता काही कर्मऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीची वर्गणी नियमापेक्षा कमी दराने वेतनातून वसुली केलेली आहे. असे निर्देशनास येते.याबाबत निवडक उदाहरणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पद | वेतन (मुळ वेतन + ग्रेड पे) | GPF कपात रक्कम | 6% प्रमाणे आवश्यक हिस्सा रक्कम | कमी कपात रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. नरेंद्र चव्हाण | प्रशासन अधिकारी | 19030 | 1000 | 1142 | 142 |
| 2. | श्री. राजेंद्र आर. राऊत | लिपिक | 18600 | 1000 | 1116 | 116 |
| 3. | श्री. विनोद भोईर | लिपिक | 18290 | 1000 | 1097 | 97 |
| 4. | श्रीम. लतिका शिंदे | लिपिक | 18600 | 1000 | 1116 | 116 |
| 5. | श्री. माणिक अे. जाधव | लिपिक | 20610 | 1000 | 1237 | 237 |
| 6. | श्री. मनोज पाटील | लिपिक | 16210 | 700 | 973 | 273 |
| 7. | श्री. प्रदिप एन. पाटील | लिपिक | 17580 | 1000 | 1055 | 55 |
| 8. | श्री. हसंराज मेश्राम | उद्यान अधिक्षक | 18180 | 700 | 1090 | 390 |
| 9. | श्री. गजानन पवार | वाहन चालक | 11930 | 700 | 716 | 16 |
| 10. | श्री. संजय डी. पाटील | लिपिक | 19200 | 1000 | 1140 | 140 |
| 11. | श्री. केशव फोफारेकर | वरिष्ठ लिपिक | 18520 | 1000 | 1111 | 111 |
| 12. | श्री. सतिश तांडेल | कनिष्ठ अभियंता | 2195 | 1000 | 1317 | 317 |
| 13. | श्री. यशवतराव देशमुख सदाशिव | कनिष्ठ अभियंता | 21500 | 1000 | 1290 | 290 |
| 14. | श्री. सचिन एस पाटील | कनिष्ठ अभियंता | 18560 | 1000 | 1113 | 113 |
| 15 | श्री.श्रीकृष्ण सदाशिव मोहिते | कनिष्ठ अभियंता | 21500 | 1000 | 1290 | 290 |
| 16. | श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता | 31490 | 1000 | 1890 | 890 |

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नियम 8(ब) नुसार भविष्य निर्वाह निधी वर्गणीचे दर हे 6% रकमेपेक्षा कमी नसावी अथवा त्यांच्या एकूण वित्तलब्धीच्या जास्त नसावी तथापि काही नाममात्र कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणी 6% रकमेपेक्षा कमी दराने वर्गणी कपात केलेली दिसून येते तरी याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच संपूर्ण कर्म-याचे भविष्य निर्वाह निधी अभिलेखांची पडताळणी करुन वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

परिच्छेद क्र. (2.22 ):- भविष्य निर्वाह निधीचे लेखा विवरणपत्र वर्गणीदारास पाठविले नसल्याबाबत....

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वित्त वर्ष 2017-2018 हया कालावधीचे कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधिचे अभिलेख लेखपरिक्षणास पडताळणी केली असता भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदारांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 36 प्रमाणे पाठविणे आवश्यक आहे. जेणे करुन वर्गणीदार कर्मचारी 36(1) (अ/ब)36(2) व 36(3) (1 ते 5) प्रमाणे उचित कार्यवाही करणे शक्य होईल याबाबत अर्धसमास पत्र क्र. 213 दि. 23-08-2021 नुसार कार्यवाही बाबत माहिती अवगत करणे बाबत सूचित केलेल होते तथापि हया बाबत माहिती उपलब्ध झालेली नसल्याने हया बाबतची धारणा निश्चिती झालेली नाही.

परिच्छेद क्र. (2.23) :-भविष्य निर्वाह निधी ठेवीवरील प्राप्त व्याज रक्कम व वर्गणी धारकांना देय्य व्याज रक्कम हया मधील तफावती बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील कार्यरत कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 वर्गणी दारांच्या वेतनातून कपात होणारी भविष्य निर्वाह निधी रक्कम गुंतवणुक पोटी वित्त वर्ष 2017-2018 करिता किती व्याजाची रक्कम प्राप्त झालेली आहे. व भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांना वित्त वर्ष 2017-2018 करिता शासनाने निर्धारित केलेल्या व्याज दराने एकूण किती व्याजाची रक्कम देय्य आहे. त्यानुसार प्राप्त होणारी व्याज रक्कम व देणे असलेली व्याज रक्कम या मधील तफावत बाबत अर्धसमास पत्र क्र. 213 दि. 2/08/2021 नुसार अवगत करणे बाबत सूचित केलेले होते तथापि हया बाबत माहिती लेखापरिक्षणास अवगत न झाल्याने मत्ता / दयित्व बाबत लेखापरिक्षणास अभिप्राय नोंदविता येत नाहीत.

# जाहिरात विभाग

## (2016-17)

परिच्छेद क्र. 3.1 :- रु. 63600/- इतक्या रकमेचा समावेश असलेले व प्राप्त झालेले 3 धनादेश बँकेमध्ये/कोषागारात जमा न केल्याबाबत, तसेच, लेखांकनामधील इतर अनियमितताबाबत...

सन 2016-17 या अर्थिक वर्षामधील जाहिरात महसूलाचे चाचणी लेखा परीक्षण करतेवेळी खालील अनियमितता आढळून आल्या.

1) जाहिरात विभागाने सन 2016-17 मध्ये जाहिरात शुल्क वसूलीसाठी वापरलेली मुद्रीत पावती पुस्तके, वसूलीची पोटकीर्द (नमुना 78) मधील नोंदी, तसेच, संकलित केलेली रक्कम बँकेमध्ये/कार्यालयामध्ये जमा करण्यासाठी वापरलेली चलने, यांची चाचणी पडताळणी केली असता, खाली नमूद केलेल्या 3 प्रकरणामध्ये रु. 63600/- रकमेचा समावेश असलेले व विभागास प्राप्त झालेले धनादेश, संबंधित संकलक लिपीक/अधिकारी यांनी बँकेत जमा केल्याबाबतचा तपशिल, पोटकीर्द, चलन/लेखा विभागाकडील नोंदी आढळून आला नाही.

तपशिल

| अ. क्र. | पावती क्रमांक दिनांक | जमा कर्त्यांचे नांव | रक्कम | धनादेश तपशील |
|---|---|---|---|---|
| 1. | 15226 28/11/2016 | वसई विकास बँक | 7200/- | 000536 11/12/2016 (Vasai Vikas Bank) |
| 2. | 14705 21/03/2017 | सिनेलाईन इंडिया | 54000/- | 14708 20/03/2017 (Axis Bank) |
| 3. | 14706 21/03/2017 | हसमुख रॉय कंपनी | 2400/- | 007727 (HDFC Bank) |

2) जाहिरात विभाग, जाहिरात फी/कर वसूल करण्यासाठी वापरत असलेल्या पावती पुस्तकाचा नमुना, महाराष्ट्र लेखासंहिता करीता नियम 1971 मधील कोणत्या 'नमुना' व नियमानुसार छापलेला आहे. याचा उल्लेख पावत्यावर दिला नसून, पावत्यामधील छापील तपशिल, सदर लेखासंहिता मधील नमुन्याशी मिळता/जुळता नाही.

3) विभागास प्राप्त झालेला महसूल, बँकेमध्ये/लेखा विभागामध्ये जमा करण्यासाठी नियम 78, 84, 86, 90, 96, 106 अनुसार, नमुना नं. 3 असा छापील क्रमांक असलेल्या चलनाचा वापर केला जात आहे. तथापी, महाराष्ट्र लेखा संहिता 1971 मध्ये, 'नमुना 3' मध्ये कोणतेही चलन नसून, नमुना 3 हा क्षतिपूर्ती बंधपूर्ती नमुना असल्याने, विभाग चुकीच्या नमुना क्रमांकांचे चलन वापरत असल्याचे दिसून येते.

4) बँकेत/कार्यालयात पैसे जमा करण्यासाठी नमुना क्रमांक 13 नुसार चलनाचा वापर करणे आवश्यक असून चलनामध्ये संकलीत रकमांचा तपशिल संकलक लिपीकाने नमूद केल्यानंतर त्याची पडताळणी, पावत्याच्या प्रतिलिपीशी वरिष्ठाने करुन, तसे प्रमाणपत्र चलनामध्ये देणे आवश्यक आहे. तथापी, सदर बाबीची पूर्तता केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र लेखा संहिता 1971 मधील नियम 12, तसेच नियम क्र. 78(1) नुसार, महापालिकेकडे येणाऱ्या सर्व पैशाची, तसेच, करांची रक्कम जमा करण्यास आली की, मुद्रीत पावती पुस्तकातून, दुहेरी कार्बन

घालून केलेली प्रतिलिपी पावती योग्य स्वाक्षरी व दिनांक घालून जमाकर्त्यास देवून, मूळ पावती प्रत कार्यालयात दप्तरी ठेवली पाहिजे.

तथापी, जाहिरात विभाग उपरोक्त नियमांचे उघडपणे उल्लंघन करुन, मूळ पवती संबंधित जमाकर्त्यास देत असून कार्बन प्रतिलिपी पावती, कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर बाब ही नियमबाह्यता आहे.

6) याशिवाय, जाहिरात महसूलाच्या वसूली करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुद्रित पावतीकातील प्रतिलिपी पावती देताना अशा पावत्यावर, जाहिरात विभागाचा संकलक लिपीक पावतीवर सही न करताच व रेव्हेन्यू स्टँप न लावताच पावती देत असल्याचे खाली नमूद उपलब्ध मुळ व प्रतिलिपी पावत्यावरुन दिसून येते.

| अ.क्र. | पावती क्रमांक/दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | 14505<br>24/01/2017 | 567042/- | मुळ पावती व प्रतिलिपी पावती मुद्रित पुस्तकामध्ये असून दोन्ही पावत्यावर कोणाचीही स्वाक्षरी नाही. |
| 2. | 14506<br>24/01/2017 | 20000/- | |
| 3. | 14508<br>09/02/2017 | 70880/- | |
| 4. | 14509<br>09/02/2017 | 70880/- | |
| 5. | 14510<br>09/02/2017 | 70880/- | |
| 6. | 14511<br>09/02/2017 | 221810/- | |

उपरोक्त अनियमितता बाबत तातडीने कार्यवाही करुन त्याबाबत अनुपालन अहवाल सादर करण्याची विनंती, दि. 02/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 57 अन्वये केली असून, विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 3.2 :- वर्ष 2016-17 मधील होर्डींग्ज परवाना फी/कर, थकीत रक्कम रु. 3,24,240/- वसूल न केल्याबाबत...

वसुलपात्र रक्कम रु. 3,24,240/-

जाहिरात विभागाने वर्ष 2016-17 करिता ठेवलेल्या जाहिरात नोंदवहीचे (नमुना 57) अवलोकन केले असता, खालील गंभीर अनियमितता आढळून आल्या.

1) महाराष्ट्र लेखा संहिता 1971 मधील नियम 86(1) अनुसार, जाहिरातीवरील कर वसूली नोंदणीकामी जाहिरातीची नोंद वही (Register of Advertisement) नमुना 57 मध्ये ठेवणे, तसेच, नियम 86(2) प्रमाणे कराची मागणी नोंदवही (Demand Register of tax on Advertisement) नमुना 58 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. सदर मागणी नोंदवही, नियम 76 मध्ये विहित केलेल्या पद्धतीनुसार ठेवणे आवश्यक आहे. शिवाय, जाहिरात कर स्वीकारताना, नमुना क्र 49 मध्ये असलेली पावती (कार्बन घातलेली दुय्यम प्रत) करदात्यास देणे आवश्यक आहे. जाहिरात विभागाने, जाहिरात नोंदवही नमुना 57 मध्ये ठेवली आहे. तथापी, सदर वहीमधील, 15 स्तंभापैकी, स्तंभ क्र. 4, 5, 7, 8, 9, 10, 11, 12 या स्तंभामध्ये आवश्यक तपशिल नमूद केलेला नाही. शिवाय सदर नोंदवहीमधील स्तंभ 15 मध्ये तसेच इतर कोणत्याही पृष्ठावर प्राधिकृत अधिकाऱ्यानी कुठेही स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे, सदर नोंदवहीमधील नोंदीची खातरजमा करता आली नाही.
2) विभागाने, मागणी नोंदवही स्वतंत्र ठेवली नसून नमुना 57 मध्येच, मागील थकबाकी, वसूली व शिल्लक थकबाकी असा तपशिल दिला आहे. तथापी, यबाबतच्या नोंदी पेन्सीलने घेतल्या असून या तपशिलासमोर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी नसल्याने तपशिलाच्या सत्यतेची खातरजमा करता आली नाही.
3) जाहिरात नोंदवही मधील अनुक्रमांक 1, 10, 15, 29, 32, 34, 36, 37, 39, 40, 43, 45, 46, 47, 49, 50, 57, 59, 65, 66, 67, 71, 72, 73, 75, 77, 79, 84, 87, 89, 90, 94, 98, 99 व 116 वर नोंद केलेल्या जाहिरात परवाना समोर 'रद्द' असा शेरा नमूद केला आहे. तथापी, सदर शेरा स्वाक्षरीत केला नाहीच शिवाय, रद्दीकरणासंबंधी घेण्यात आलेल्या मंजूरीचा किंवा इतर कोणताही तपशिल नमूद केला नसल्याने, या सर्व रद्द प्रकरणाचा संपूर्ण तपशिल लेखा परीक्षणास सादर करण्यात यावा.
4) जाहिरात कर नोंदवहीमधील तपशिलानुसार, सोबत जोडलेल्या विवरण पत्रकामध्ये नमूद केलेल्या 11 प्रकरणामधील थकीत रक्कम रु. 3,24,240/- वसूल झाली किंवा कसे? या तपशिलाची नोंद असल्याने, सदर रकमेच्या वसूलीचा तपशिल सादर करण्यात यावा.

थकबाकी दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | नोंदवहीतील अनुक्रमांक | एजन्सी नांव | होर्डींग्ज स्थळ | आकारमान | पासून-पर्यंत | थकबाकी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | महाशक्ती पब्लीकेशन | मिरारोड | 10X20 | दि. 27/02/2016 ते दि. 27/02/2017 | 6720 |
| 2 | 3 | महाशक्ती पब्लीकेशन | मिरारोड | 10X20 | दि. 27/02/2016 ते दि. 27/02/2017 | 6720 |
| 3 | 4 | महाशक्ती पब्लीकेशन | मिरारोड | 10X20 | दि. 27/02/2016 ते दि. 27/02/2017 | 6720 |
| 4 | 5 | महाशक्ती पब्लीकेशन | भाईंदर | 10X20 | दि. 27/02/2016 ते दि. 27/02/2017 | 6720 |

| अ. क्र. | नोंदवहीतील अनुक्रमांक | एजन्सी नांव | होर्डींग्ज स्थळ | आकारमान | पासून-पर्यंत | थकबाकी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 6 | महाशक्ती पब्लीकेशन | भाईंदर | 10X20 | दि. 27/02/2016 ते दि. 27/02/2017 | 6720 |
| 6 | 44 | मुद्रा आर्टस् | वरसावे गांव | 60X20 | -- | 50400 |
| 7 | 48 | एशियन ॲडक | | 60X20 | दि.25/09/2016 ते दि. 24/09/2017 | 33600 |
| 8 | 56 | मुद्रा आर्टस् | मिरारोड | 20X30 | -- | 25200 |
| 9 | 63-64 | आऊट डोअर लिंक्स् | भाईंदर | 40X20 | दि. 02/05/2016 ते दि. 01/05/2017 | 33600 |
| | | | | 40X20 | | 33600 |
| 10 | 74 | एशियन ॲडक | भाईंदर | 40X20 | दि. 06/11/2016 ते दि. 05/11/2017 | 33600 |
| 11 | 83 | गुजू ॲडक | मिरारोड | 40X20 | दि. 12/01/2016 ते दि. 11/01/2017 | 80640 |
| | | | एकुण | | | 3,24,240/- |

5) कर वसूलीसाठी नमूना क्र. 49 नुसार पावती पुस्तक न वापरता, महाराष्ट्र लेखा संहितेमध्ये नमुना समाविष्ठ नसलेल्या पावती पुस्तकाचा वापर, जाहिरात कर वसुलीसाठी केला जात आहे.

6) नियम 86(4) नुसार, कार्बनचा वापर करुन तयार केलेली दुय्यम प्रत करदात्यास न देता मूळ प्रत देण्यात येते व कार्बन प्रत जतन करण्यात येते.

7) पावती पुस्तकामध्ये अनेक करदात्याकडून वसूल केलेल्या रकमेच्या मूळ पावत्यासह कार्बन प्रती ही ठेवण्यात आलेल्या आहेत.

8) रु. 5000/- रकमेपेक्षा जास्त रकमेच्या अनेक जमा पावत्यावर रेव्हेन्यू स्टँप लावला नसल्याचे आढळून आले आहे.

उपरोक्त अनियमितता बाबत योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल त्वरित सादर करण्याबाबत दि. 11/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 79 अन्वये कळविले असून विभागाकडून याबाबत अहवाल अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 3.3 :- दि. 31/03/2017 अखेर, थकीत असलेल्या जाहिरात कर रक्कम रु. 65.47 लाखाच्या वसूली संदर्भात.

जाहिरात विभागाने वर्ष 2016-17 मध्ये, जाहिरात कर वसूली संदर्भात ठेवलेल्या लेखांची तपासणी केली असता, दि. 31/03/2017 पर्यंत, जाहिरात कर रकमेची थकबाकी रु. 65,46,939/- इतकी असून त्या रकमेमध्ये, दि. 01/04/2016 पूर्वीची थकबाकी रु. 53,73,169/- (82%) असल्याचे दिसून येते.

सबब, संपूर्ण थकबाकी रु. 65,46,939/- वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली, याचा तपशिल, थकबाकीच्या सद्य:स्थितीसहीत सादर करण्याबाबत दि. 18/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 84 अन्वये कळविले असून याबाब अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 3.4 :- अनादरीत धनादेशामधील रकमेची वसूली केल्याबाबतचा तपशिल देण्याबाबत...

वर्ष 2016-17 मध्ये, हॉटेल रॉकस्टार यानी दि. 09/02/2017 रोजीच्या पावती क्र. 14480 अन्वये, जमा केलेला धनादेश क्र. 02118, (रक्कम रु. 6480/- आय.डी.बी.आय.बँक) न वटल्यामुळे विभागाकडे परत आल्याची नोंद जाहिरात विभागाच्या, चेक रिटर्न स्टेंटमेंट मध्ये आहे.

सबब, सदर अनादर झालेल्या धनादेशातील रकमेची वसूली केल्याबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास देण्याबाबत दि. 18/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 82 अन्वये कळविले असून, त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

वसूलपात्र रक्कम रु. 6480/-

परिच्छेद क्र. 3.5 :- लेखा विभाग तसेच जाहिरात विभाग यांच्या लेखा नोंदीमध्ये, प्रत्यक्ष जमा रकमेमध्ये फरक असल्याबाबत.

वर्ष 2016-17 मध्ये, जाहिरात विभागाने, जाहिरात/होर्डींग्ज, कर जमाबाबत ठेवलेल्या नोंदी नुसार, जाहिरात कर/इतर जाहिराती वरील कर व होर्डिंग्ज/फलक या पासून प्रत्यक्ष जमा झालेल्या महसूल रु. 372.62 लाख असा दर्शविण्यात आला आहे.

तथापी, लेखा विभागाने वर्ष 2016-17 च्या वार्षिक जमा खर्चामध्ये या बाबीपासून मिळालेला प्रत्यक्ष महसूल रु. 378.96 लाख (जाहिरात कर रु. 174.40 लाख + होर्डिंग्ज रु. 204.56 लाख) असा दर्शविलेला आहे.

सबब, दोन्ही विभागाच्या नोंदीमध्ये असलेल्या फरक रु. 6.34 लाख कोणत्या बाबीमुळे आलेला आहे, याचा खुलासा करण्याबाबत दि. 18/04/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 82 अन्वये कळविले असून, त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 3.6 :- जाहिरात फी वसूली संदर्भातील अनियमितता.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 मधील कलम 245 मध्ये निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तरतूदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन 2016-17 मध्ये जाहिरात शुल्क संबंधीतांकडून वसूल केले आहे. सदर वर्षाचे निवडक महाचे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) जाहिरात फी पावती क्र. 14388, दि. 18/11/2016 अन्वये एस.ए. रेसिडन्सी (शुभ आरंभ रेसिडन्सी) एस.के.स्टोन, मिरा भाईंदर मार्ग, मिरारोड (पूर्व) यांचेकडून दुकानावर जाहिरात फी रु. 37500/- वसूल केली आहे. या संदर्भात अभिप्राय -

अ) पावतीच्या दोन्ही प्रतीवर वसूली लिपीकाची स्वाक्षरी नाही.

ब) प्रदात्याची प्रत त्यांना देवून स्थळप्रतीवर पावती प्राप्त झाल्याची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

क) रोखशाखेकडे रक्कम वर्ग करावयाच्या चलनावर वसूली धनादेशाने नमूद आहे. मात्र, धनादेश नोंदवहीमध्ये सदर रकमेच्या धनादेशाचा उल्लेख नाही. सबब सदरचा भरणा धनादेशाने केला आहे किंवा कसे? अभिलेखावरुन पडताळणी करुन अनुपालन सादर करावे.

2) जाहिरात फी पावती क्र. 15232, दि. 09/12/2016 अन्वये मे.श्री.डी. एंटरप्रायझेस यांचेकडून धनादेश क्र. 943444 द्वारे रक्कम रु. 9936/- वसूल केली आहे. या संदर्भात अभिप्राय -

अ) पावतीवर वसूली लिपीकांची स्वाक्षरी नाही.

ब) सदर धनादेशाची नोंद धनादेश नोंदवहीमध्ये अढळ होत नाही.

क) धनादेश नोंदवही क्र. 2 मध्ये पृष्ठ क्र. 2316 अढळ झाले नाही.

3) खाली दर्शविलेली वसूली धनादेशाद्वारे करण्यात आली असल्याचे नमुद आहे. मात्र सदरच्या नोंदी धनादेश नोंदवहीमध्ये अढळ होत नाही.

| अ.क्र. | दिनांक | पावती क्रमांक | प्रदात्याचे नांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 23/02/2017 | 14532 | हॉटेल साईराज | 2400/- | |
| 2 | 23/02/2017 | 14533 | शितल कलेक्शन | 2400/- | |
| 3 | 23/02/2017 | 14534 | रेड मोमेंट | 2400/- | |
| 4 | 23/02/2017 | 14535 | स्टार डिजीटल | 1200/- | |

उपरोक्त नमूद अनियमिततांसंदर्भात अभिलेखावरुन पडताळणी करुन पूर्तता अहवाल लेखा परीक्षणास सादर करण्याबाबत विभागास दि. 11/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 80 अन्वये कळविले असून याबाबतचा तपशिल अद्याप अप्राप्त आहे.

# परवाना विभाग

## (2016-17)

परिच्छेद क्र. 4.1 :- टेलीफोन बूथच्या क्षेत्रफळामध्ये आढळून आलेल्या नियमबाह्यतेबाबत...

1. तत्कालीन मुख्याधिकारी, मिरा भाईंदर नगरपरिषद, यांनी नियोजन व विकास समितीच्या ठराव क्र. 24 दि. 30/06/1997 नुसार, श्रीम. स्नेहलता नलावडे, यांना भाईंदर (प.), स्टेशन रोड क्षेत्रात, '6X4' आकाराचा टेलीफोन बुथ चालु करण्यासाठी, दि. 30/08/1997 रोजीचे पत्र क्र. नपा/ एनओसी/373/ 4653/1997-98 अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते. तथापी, उपलब्ध कागदपत्रानुसार, वर्ष 2006-07 ते वर्ष 2017-18 पर्यंत सदर बुथचा परवाना नूतनीकरण करतेवेळी टेलीफोन बूथचे क्षेत्रफळ '4X4' असे गृहीत धरुन त्यानुसार फी वसूली करण्यात आली होती. मात्र वर्ष 2017-18 च्या नूतनीकृत परवानामध्ये सदर बूथचे क्षेत्रफळ पुन्हा '4X6' असे नमूद करण्यात आले मात्र भुईभाडे वसूली '4X4' आकारमानाप्रमाणे करण्यात आली.
2. तथापी, वर्ष 2018-19 या कालावधीकरिता परवाना नूतनीकरण करताना, सदर बूथचे क्षेत्रफळ पुन्हा '4X6' असे परवाना क्र. 2016/2018-19 दि. 30/04/2018 मध्ये नमूद करण्यात आले मात्र भुईभाडे आकारणी '4X4' या क्षेत्रफळाची करण्यात आली.

    उपरोक्त तपशिल विचारात घेतल्यास, बूथ चालकाने वर्ष 1997 मधील परवान्याप्रमाणे '4X6' आकारमानाचा बूथ उभारणी केला असल्यास, भुईभाडे वसूली त्या क्षेत्रफळानुसार करणे आवश्यक आहे. या बाबीची खातरजमा करण्यासाठी, सदर बूथचे क्षेत्रफळ किती आहे, याची प्रत्यक्ष तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.
3. महासभेच्या दि. 03/08/2005 रोजीच्या ठराव क्र. 34 अन्वये टेलीफोन बूथचे क्षेत्रफळ '4X4' असे मर्यादित ठेवण्यात आले आहे. तथापी, वर्ष 2018-19 मध्ये परवाना विभागाने नव्याने दिलेल्या तसेच नूतनीकृत परवान्यामध्ये टेलीफोन बूथचे क्षेत्रफळ '4X6' असावे, असे नमूद करण्यात आले असून सदर बाब महासभेने मंजूर केलेल्या ठरावामधील नियमाशी विसंगत आहे.

उपरोक्त अनियमितता बाबत योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल लेखा परीक्षणास सादर करण्यासाठी, सदर बाब दि. 22/07/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 52 अन्वये विभागास कळविली असून, याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 4.2 :- दि. 01/04/2005 पासून रेस्टॉरंट व बार चालू असल्याची कागदपत्रे दाखल करुनही परवाना फी ची वसूली सन-2014 पासून केल्याने, महापालिकेचे रु. 1,20,000/- इतक्या महसूलाचे नुकसान.
हॉटेल गोवलकोंडा-रेस्टॉरंट व बार, उत्तन - प्रथम परवाना क्र. 973/2013-14, नुतनीकृत क्र. 543/2016-17.
वसूल पात्र रक्कम रु. 1,20,000/-

1) महानगरपालिकेच्या उत्तन विभागामधील हॉटेल गोवळकोंडा-रेस्टॉरंट व बार, याचे मालक श्री. सिडनी जे. परेरा यांनी, त्यांचे सदरहू हॉटेल दि. 01/04/2005 पासून कार्यरत असल्याबाबतचे, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1984 अंतर्गत देण्यात आलेले प्रमाणपत्र क्र. 21293, तसेच, जिल्हा अधिकारी, ठाणे यांनी परदेशी बनावटीच्या दारु विक्रीचा हॉटेल व्यवसाय चालविण्याकरीता दिलेला परवाना क्र. FL III/1402/2005-06, इत्यादी पुरावे, हॉटेल परवाना मागणीसाठी दाखल केले. तथापी, परवाना विभागाने, सदर हॉटेल मालकास, प्रथम परवाना क्र. 0466, दि. 03/02/2014 रोजी देताना, सदर हॉटेल सन-2005 पासून चालू असल्याची बाब विचारात न घेता, दि. 23/01/2014 ते दि. 22/01/2017 या तीन वर्षाकरीता रु. 5,000/- प्रतिवर्ष प्रमाणे परवाना फी वसूल केली.
2) हॉटेल मालकाने सादर केलेल्या कागदपत्रानुसार, सदर हॉटेल दि. 01/04/2005 ते दि. 21/01/2014 या कालावधीमध्ये महाराष्ट्र महापालिका, अधिनियमातील तरतूदी नुसार, हॉटेल परवाना न घेताच अवैधरित्या चालू असल्याने, सदर कालावधीची रु. 15,000/- प्रतिवर्ष प्रमाणे परवाना फी रु. 1,20,000/- वसूल करणे आवश्यक असल्याने, याबाबत योग्य ती कार्यवाही करुन फी वसूलीबाबतचा, अनुपालन अहवाल त्वरित सादर करण्याची विनंती दि. 02/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 58 अन्वये केली असून, याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 4.3 :- वर्ष 2004-05 पासून कार्यरत असलेल्या 6 स्टील भांडी उत्पादन कारखान्यांना, वर्ष 2014-15 पासून परवाना दिल्याने, रु. 2.40 लाख परवाना शुल्काचे महसूली नुकसान.
वसूल पात्र रक्कम रु. 2,40,000/-

1) भाईंदर (प.) येथील टोडी इंडस्ट्रीयल इस्टेट, या इमारतीमधील, पहिल्या माळ्यावरील गाळा क्र. K-1, K-2 व L-4 आणि दुसऱ्या माळ्यावरील गाळा क्र. K-1, K-2 व L-4 या सहा गाळ्यांचे मालक, जनक भलारिया, यांनी सदरहु गाळ्यामध्ये, 'भलारिया मेटल कॉफ्ट' या नावाने स्टील भांडी उत्पादन करण्याचा कारखाना चालविण्यासाठी, सादर केलेले नकाशे, कारखाना नोंदणी, कारखाने परवाना (Factory Permit) विभागाने दि. 30/07/2004 रोजी मंजूर केले व वर्ष 2012 पर्यंत परवाना क्र. 102294 देण्यात आला. सदर परवाना दि. 01/01/2013 पासून नूतनीकरण करुन, नूतनीकृत परवाना क्र. 102295 देण्यात आल्याचे परवाना क्र. 102295 च्या प्रतीवरील तपशिलानुसार दिसून येते. सदर तपशिल विचारात घेतल्यास उपरोक्त 6 कारखाने वर्ष 2004-05 पासून कार्यरत असल्याचे स्पष्ट होते. तथापि, परवना विभागाने, सदर 6 कारखान्यास, वर्ष 2014-15 पासून परवाना फी वसूल करुन, परवाना दिल्याने, वर्ष 2005-06 ते सन 2013-14 या 8 वर्षांसाठी प्रतिवर्ष रु. 5000/- प्रमाणे, 6 कारखान्याचे एकत्रित परवाना शुल्क रु. 2,40,000/- वसूल न केल्याने, महापालिकेच्या महसूलाचे नुकसान झाले आहे.
2) प्रस्तुत 6 कारखान्याना देण्यात आलेला परवाना, महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम 386 अन्वये दिल्याची 'छापील नोंद' सर्व परवान्यावर नमूद केली आहे. सदर कारखाना परवाने, कलम 313 मधील तरतूदीनुसार देणे आवश्यक असल्याने, परवान्यावर नमूद केलेला छापील तपशिल चुकीचा आहे असे लेखा परीक्षणाचे मत आहे.
3) महापालिकेकडून उपरोक्त परवाने प्राप्तीसाठी अर्जदार भलारिया यांनी, मालमत्ता कराचे देयक, वीज बील व महाराष्ट्र शासनाचा कारखाना चालविण्याचा परवाना सादर केला आहे. तथापि, अर्जदाराने, सादर केलेल्या वीज बीलामधील तपशिलानुसार, उपरोक्त 6 गाळ्यामध्ये, वर्ष 2016 मध्ये स्टील भांडी बनविण्याचे कारखाने नसून खालील प्रकारचे कारखाने चालविण्यात येत असल्याचे दिसून येतात, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | गाळा क्रमांक | वीज बील दिनांक | कारखान्याचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | K-2 पहिला मजला | 04/06/2016 | ओमेगा पेन्ट्स |
| 2. | K-1 पहिला मजला | 30/06/2016 | रॅमको इंडस्ट्रीज |
| 3. | L-4 पहिला मजला | 07/07/2016 | जायको पेन्ट्स |
| 4. | K-2 दुसरा मजला | 30/06/2016 | ओमेगो पेन्ट्स |
| 5. | K-1 दुसरा मजला | 30/06/2016 | रॅमकोज इंडस्ट्री |
| 6. | L-4 दुसरा मजला | 07/07/2016 | जायको पेन्ट्स |

उपरोक्त नमूद माहे जून/जुलै-2016 च्या वीज बीलातील अद्यावत तपशिलानुसार सर्व 6 गाळ्यांमध्ये भांडी उत्पादनांचा उद्योग चालत नसताना, परवाना विभागाने दिलेले परवाने चुकीच्या उत्पादनासाठी व चुकीच्या संस्थेस दिल्याचे सकृतीदर्शनी दिसून येते.

उपरोक्त सर्व अनियमिततांची पडताळणी/खातरजमा करुन, याबाबतचा अहवाल लेखा परिक्षणास तातडीने सादर करण्याची मागणी दि. 06/08/2019 च्या अर्धसमास क्र. 59 अन्वये केली असून, याबाबतचा कार्यकृती अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 4.4 :- प्रथम परवाना देताना, सादर केलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत...

नूतनीकृत परवाना क्र. 728/2014-15,
परवाना धारक - सॅमसन एंटरप्रायजेस

1. मे. सॅमसन एंटरप्रायजेस यांना, मौजे-डोंगरी येथे, बर्फ उत्पादनासाठी देण्यात आलेल्या प्रथम परवाना बाबतची सर्व कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याची विनंती विभागास करण्यात आली.
2. परवाना क्र. 728/2014-15 चे नूतनीकरण करताना, परवाना धारकाने शेत जमिनीशी संबंधित असलेला 7/12, दाखल केला असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. शेत जमिनीचा सदर 7/12, बर्फ उत्पादन कारखाना चालविण्याची परवाना घेण्यासाठी, ग्राह्य पुरावा म्हणून स्विकारार्ह आहे का? याची खातरजमा करुन अभिप्राय देण्याची विनंती विभागास करण्यात आली.
3. बर्फ उत्पादनासाठी, कारखाना इमारत, औद्योगिक विद्युत पुरवठा, विद्युत मोटर्स, तसेच कारखाना अधिनियम 1948 अंतर्गत नोंदणी व परवानगी आवश्यक असल्यास अशी परवानगी अर्जदाराने प्राप्त केली आहे का? याची खातरजमा करुन अभिप्राय देण्याची विनंती विभागास करण्यात आली.
4. बर्फ उत्पादन हा व्यवसाय, कारखाने या सदरात येत असेल तर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अंतर्गत कलम 313 अन्वये, परवाना देणे आवश्यक आहे. असे लेखा परीक्षणाचे मत असल्याने, सदर संपूर्ण बाबींची पडताळणी करुन याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्याची विनंती, दि. 07/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 62 अन्वये केली असून याबाबतचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 4.5 :- परवाना विभाग कामकाजाबाबत...

महानगरपालिकेतील परवाना विभागाची सन 2016-17 या संपूर्ण वित्तीय वर्षाची महसूल (244 चलन) तपासणी करतांना खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्र. 102 (2) अन्वये विहीत नमुना क्र. 76 मध्ये नोंदवही ठेवण्यात न आल्याचे निदर्शनास आले आहे.
2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, मधील कलम 313 अन्वये कारखाना परवाना, कलम 383 अन्वये दूध व दुग्धजन्य पदार्थ व कलम 376 अन्वये व्यवसाय व अन्य बाबीकरिता स्वतंत्र परवाने देणे आवश्यक आहे. तथापि, परवाना विभागाने, कलम 386 चा संदर्भ देवून, सर्वच बाबीना एकच परवाना नमुना वापरात आणल्यामुळे, सदर बाब उपरोक्त नियमातील तरतूदीशी विसंगत आहे, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.
3) दि. 18/07/2016 रोजी रु. 32760/- एवढी रक्कम जमा करणे आवश्यक असतांना रु. 32260/- जमा करण्यात आल्याने रु. 500/- कमी जमा करण्यात आली.
4) दि. 19/08/2016 व दि. 16/09/2016 रोजीचे चलन प्राप्त झाले नाही.
5) दि. 07/12/2016 व दि. 08/12/2016 ची नमुना क्र. 78 मधील पोटकीर्द लिहिण्यात आली नाही.
6) दि. 20/04/2016 रोजी पावती क्र. 807382 ही रु. 1000/- एवढ्या रक्कमेची असतांना नमुना क्र. 78 मध्ये रु. 250/- ने नोंद घेण्यात आल्याने रु. 750/- चा कमी भरणा झाला आहे.
7) दि. 20/04/2016 रोजी पावती क्र. 807394 ही रु. 7000/- एवढ्या रक्कमेची असतांना नमुना क्र. 78 मध्ये रु. 1000/- ची नोंद घेण्यात आल्याने रु. 6000/- चा कमी भरणा झाला आहे.
8) रोखपालाकडील रोखडवही मध्ये दि. 04/10/2016 रोजी रु. 1420/- व दि. 15/10/2016 रोजी रु. 16000/- ने भरणा कमी जमा झाल्याचे दिसून येत आहे.
9) नमुना नं. 2 मधील सर्वसाधारण पावत्यांवर **"केवळ सन 2015-16 करिता वैध"** असा शिक्का मारण्यात आला आहे. तथापी, सदर पावत्यांचा वापर सन 2016-17 करिता करण्यात आला आहे.

तरी उपरोक्त अनियमिततांचे निराकरण करण्यात येऊन लेखापरीक्षणास अवगत करण्याबाबत अर्धसमास क्र. 95 दि. 26/09/2019 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्याप कळविण्यात आलेले नाही.

तरी उपरोक्त अनियमिततांचे निराकरण करण्यात यावे.

# बाजार विभाग

## (2016-17)

परिच्छेद क्र. 5.1 :- बाजार फी वसूली ठेकेदारास दिलेल्या मुदतवाढी संबंधी.

1) दि. 28/09/2015 ते दि. 27/09/2016 या कालावधीमध्ये भाईंदर (प.) बाजार फी वसूलीचा, श्री. किरण नरहरी चेऊलकर यांना, स्थायी समितीच्या दि. 14/08/2015 रोजीच्या ठराव क्र. 56 अन्वये, देण्यात आलेल्या ठेक्याची मुदत संपल्यानंतर, दि. 28/09/2016 पासून, पुढील कालावधीचा ठेका अंतिम होईपर्यंतच्या कालावधी करिता, श्री. किरण चेऊलकर यांना, महापालिका आयुक्त यांच्या दि. 01/10/2016 रोजीच्या मंजूरीने मुदतवाढ देण्यात आली. तथापी, सदर वाढीव कालावधीसाठी करारनामा केल्याचे अढळून आले नाही.

2) महानगरपालिका अधिनियमातील कलम 332(ब) अन्वये, 1 वर्षापर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी बाजार फी वसूलीचा ठेका, स्थायी समितीच्या मंजूरीने देणे आवश्यक असल्याने, वाढीव कालावधीच्या ठेक्यास स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक असतांना विभागाने योग्य ती कार्यवाही केल्याचे, उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून आले नाही.

3) वाढीव कालावधीकरिता, ठेकेदाराकडून घेतलेल्या सुरक्षा अनामत रकमेचा तपशील देण्यात आला नाही.

4) सदर ठेकेदारास, ठेका कालावधीमध्ये देण्यात आलेली कुपन्स, ठेकेदारानी वापरलेली कुपन्स व ठेका संपल्यानंतर परत केलेली कुपन्स याचा तपशील देण्यात देण्यात आला नाही.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल लेखा परीक्षणासाठी त्वरित सादर करण्याची मागणी दि. 21/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 72 अन्वये केली आहे. तथापी, विभागाकडून या बाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 5.2 :- बाजार फी वसूली ठेकेदारास दिलेल्या मुदतवाढी संबंधी.

1) दि. 05/12/2015 ते दि. 04/12/2016 या कालावधीमध्ये भाईंदर (पूर्व) बाजार फी वसूलीचा, श्री. जावेद अब्बास रजा यांना, स्थायी समितीच्या दि. 14/10/2015 रोजीच्या ठराव क्र. 88 अन्वये, देण्यात आलेल्या ठेक्याची मुदत संपल्यानंतर, दि. 05/12/2016 पासून, पुढील कालावधीचा ठेका अंतिम होईपर्यंतच्या कालावधी करिता, श्री. जावेद अब्बास रजा यांना, महापालिका आयुक्त यांच्या दि. 17/12/2016 रोजीच्या मंजूरीने मुदतवाढ देण्यात आली. तथापी, सदर वाढीव कालावधीसाठी करारनामा केल्याचे अढळून आले नाही.
2) महानगरपालिका अधिनियमातील कलम 332(ब) अन्वये, 1 वर्षापर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी बाजार फी वसूलीचा ठेका, स्थायी समितीच्या मंजूरीने देणे आवश्यक असल्याने, वाढीव कालावधीच्या ठेक्यास स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तथापी, विभागाने याबाबत योग्य ती कार्यवाही केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन अढळून आले नाही.
3) वाढीव कालावधीकरिता, ठेकेदाराकडून घेतलेल्या सुरक्षा अनामत रकमेचा तपशील देण्यात आला नाही.
4) सदर ठेकेदारास, ठेका कालावधीमध्ये देण्यात आलेली कुपन्स, ठेकेदारानी वापरलेली कुपन्स व ठेका संपल्यानंतर परत केलेली कुपन्स याचा तपशील देण्यात आला नाही.
5) श्री. जावेद अब्बास रजा यांनी बाजार हप्त्याची रक्कम, दि. 15/06/2016 रोजीचा धनादेश क्र. 29 अन्वये रु. 3 लाख व दि. 06/07/2016 रोजीच्या धनादेश क्र. 27 अन्वये रु. 11,65,051/- जमा केली तथापी, सदर दोन्ही धनादेश 'अपुरा निधी' या कारणास्तव अनादर झाले. त्यामुळे विभागाने धनादेशाच्या दिनांकापासून ते अनादर झालेले धनादेश, विभागास प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीकरिता 18% व्याजाची मागणी, ठेकेदाराकडून केलेली आहे. तथापी, करारनामा मधील अट क्र. 17 नुसार, अनादरीत धनादेशाची रक्कम वसूल होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत, व्याज आकारणी तसेच दंड आकारणी करणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने सदर अटीचे पालन केलेले दिसून आले नाही. सबब, सदर दोन्ही अनादरीत धनादेशामधील रकमांची वसूली केल्याबाबतचा तपशील, तसेच, व्याज व दंड वसूलीचा तपशील लेखा परीक्षणास सादर करण्याची विनंती करण्यात आली. या संदर्भात दि. 21/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 73 अन्वये, उपरोक्त बाबी विभागास कळवूनही याबाबत विभागाकडून कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

परिच्छेद क्र. 5.3 :- वर्ष 2016-17 संबंधी लेखे, नोंदवह्या व अन्य कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत...

बाजार विभागाशी संबंधीत, खाली नमूद केलेले लेखे, नोंदवह्या लेखापरीक्षणासाठी सत्वर उपलब्ध करुन देण्याची विनंती दि. 21/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 74 अन्वये करण्यात आली होती. तथापी, विभाग प्रमुखानी याबाबत कोणतीही पूर्तता न केल्याने बाजार विभागाच्या महसूल लेख्यांची खातरजमा करता आली नाही.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| 1. | मागणी नोंदवही | 2016-17 |
| 2. | पावती पुस्तके | 2016-17 |
| 3. | चलन्स | 2016-17 |
| 4. | पोटकीर्द | 2016-17 |
| 5. | बँक विवरणपत्र | 2016-17 |
| 6. | अनादर धनादेश नोंदवही | 2016-17 |
| 7. | अनामत नोंदवही | 2016-17 |
| 8. | पावती पुस्तके/कुपन्स साठा नोंदवही | 2016-17 |

# लेखा विभाग

## (2016-17)

परिच्छेद क्र. 6.1 :- स्टेट बँक ऑफ इंडिया खाते क्र. 10254419063 चे वर्ष 2016-17 संबंधी विवरणपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत...

लेखा परीक्षण विभागातर्फे अर्थिक वर्ष 2016-17 या अर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाने स्टेट बँक ऑफ इंडिया खाते क्र. 10254419063 मध्ये जमा केलेल्या महसूलाची पडताळणी करणेकामी, सदर बँक खात्याचे विवरण पत्र (Bank Statement) व रोखडवही लेखापरीक्षणासाठी त्वरीत उपलब्ध करुन देण्याची मागणी दि. 13/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 67 अन्वये करण्यात आली. तथापी, विभागाने सदर विवरणपत्र न दिल्याने, जाहिरात विभागाने संकलित केलेल्या व बँकमध्ये जमा केलेच्या महसूलाची पडताळणी करता आली नाही.

परिच्छेद क्र. 6.2 :- पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह लाभ कराची वसूली "भांडवली जमा" या शिर्षाखाली दर्शविण्याबाबत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 129 (अ अ) नुसार, पाणी पुरवठ्याच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामावर केलेला किंवा करावयाचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागविण्यासाठी, महानगरपालिकेस आवश्यक वाटेल एवढ्या, त्या कामाच्या करायोग्य मुल्याच्या, टक्केवारीने आकारावयाची, "पाणी पुरवठा लाभ कर" या नावाने ओळखली जाणारी अतिरिक्त पाणीपट्टी आणि कलम 129 (ब ब) नुसार, मलमूत्र किंवा कचरा गोळा करण्यासाठी आकारावयाचा "मलप्रवाह सुविधा लाभ कर" वसूल करण्याचे अधिकार महानगरपालिकेस दिले आहेत. त्यानुसार, वर्ष 2016-17 च्या वार्षिक जमाखर्चा मधील नोंदीनुसार, "पाणी पुरवठा लाभ कर" रु. 15.93 लाख व "मलप्रवाह सुविधा लाभ कर" रु. 1718.74 लाखाची प्रत्यक्ष वसूली झाल्याची नोंद "महसूली जमा" या शिर्षामध्ये दर्शविली आहे.

2) उपरोक्त नमूद कलम 129 (अ अ) व (ब ब) मधील वैधानिक तरतुदी विचारात घेता पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह लाभ कर, या पासून मिळणारी रक्कम केवळ भांडवली कामासाठी वापरण्याचे निर्देशित केले असल्याने, "भांडवली जमा" या शिर्षाखाली दर्शवून, सदर महसूलाचा विनियोग केवळ भांडवली खर्चासाठी करणे उचीत होईल अशी लेखापरीक्षणाची धारणा आहे. याबाबत विभागाचे अभिप्राय दि. 29/01/2020 रोजीच्या अ.स.क्र. 136 अन्वये मागविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 6.3 :- वर्ष 2016-17 अखेर विविध विभागांनी संकलित केलेल्या अनामत रकमा, वार्षिक जमा खर्चामध्ये दर्शविल्या नसल्याबाबत...

1) लेखा विभागाने वर्ष 2016-17 करिता ठेवलेल्या अनामत खाते रोकडवही मधील नोंदीचे अवलोकन केले असता, महानगरपालिकेचे विविध विभाग जसे की, बांधकाम, लेखा, नगर रचना, प्रभाग कार्यालये, भांडार, वृक्ष संवर्धन इ. विभाग अनामत रकमांची वसूली करतात. त्याच्या नोंदी लेखा विभाग इसारा/सुरक्षा अनामत खाते रोकडवही नमुना 11 मध्ये घेत असल्याचे दिसून येते, त्यानुसार दि. 31/03/2017 अखेर, निव्वळ अनामत (परतावा वजा जाता) रक्कम रु. 44,21,04547.28 शिल्लक असल्याचे स्पष्ट होते. तथापी, लेखा विभागाच्या वर्ष 2016-17 या वर्षाच्या जमा खर्चामध्ये, पाणी पुरवठा विभागाची ठेव रक्कम रु. 0.68 लाख (कोड नं. 3710) वगळता, अन्य कोणतीही रक्कम "अनामत" या लेखाशिर्षाखाली जमा खर्चामध्ये दर्शविल्याचे आढळून आले नाही. परिणामत: उर्वरित रु. 4420.37 लाख इतकी अनामत रक्कम लेखा बाह्य असल्याचे सकृत दर्शनी दिसून आले.

2) विभागाने स्विकारलेल्या अनामत रकमा, "महापालिकेचे दायित्व" या सदरात येते. तथापी, पाणी पुरवठा विभागाची अनामत रक्कम रु. 0.68 लाख वार्षिक जमा खर्चामध्ये "महसूली जमा" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात आली आहे.

3) विभागाने इसारा/सुरक्षा अनामत नोंदीसाठी स्वतंत्र रोकडवही नमुना क्र. 11, [नियम 31 (1) ] मध्ये ठेवली आहे. तथापी, महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता नियम 1971 मधील नियम 190 नुसार, रोखीत मिळालेल्या व परत केलेल्या सर्व ठेवींची नोंद "नमुना 147" मध्ये ठेवणे अनिवार्य आहे. शिवाय, सद्याच्या नमुना 11 नुसार ठेवलेल्या रोकड वहीच्या मथळ्यामध्ये चुकीने नियम 32 (1) ऐवजी नियम 31 (1) दर्शविलेला असल्याचे दिसून येते.

सबब, उपरोक्त बाबी संबंधी योग्य ती कार्यवाही करुन, त्याबाबतचा अनुपालन अहवाल देणेबाबत, अर्धसमास क्र. 138 दि. 29/01/2020 अन्वये कळविले असून, याबाबत विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.6.4 - वित्त वर्ष 2016-17 मधील मालमत्ता कर रोकड वही नोंदी मधील अनियमितता बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका लेखा विभाग अंतर्गत मालमत्ता कर संकलन वित्त वर्ष सन 2016-17 करिता निवडक महिन्यांच्या रोकड वहीची तपासणी केली असता मालमत्ता कर जमा नोंद दि. 01-01-2017 ते दि. 31-01-2017 हया कालावधी करिता एकत्रित जमा कराची एकच नोंद एकत्रितपणे नोंदविलेली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता सन 2011 मधील नियम 49 अन्वये सर्वसाधारण रोकडवहीत नोंदी समयानुक्रमे रोजच्या रोज करणे आवश्यक आहे. तसेच नियम 51 अन्वये प्रत्येक रोकड वही रोखपालाच्या सहीनिशी रोजच्या रोज बंद करुन रोजच्या रोज जमा खर्च ताळमेळ घेणे आवश्यक आहे. व त्यानंतर लेखाप्रमुखाकडून त्याची पडताळणी करुन स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. हया बाबतअर्धसमास क्र. 199 दि. 15-06-2021 व्दारे खुलास मागविण्यात आला होता.

अनुपालन अप्राप्त

## परिच्छेद क्र- 6.5:- वित्त् वर्ष 2016-17 यावर्षाची साठा नोंदवही व पावती पुस्तके लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्या बाबत...

भांडार विभागाकडून प्रत्येक विभागासाठी किरकोळ पावती पुस्तके छापून पूरवठा करण्यात येतात. प्रत्येक विभागाने प्राप्त झालेल्या पावती पुस्तकाची नोंद साठा नोंदवही मध्ये घेऊन त्याप्रमाणे पावती पुस्तकाचे वाटप आपल्या विभागात करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे पावती पुस्तकांची अदयावत नोंद लेखा विभामातील कर्मचाऱ्या नाव व सहीसह साठा नोंदवही मध्ये नोंदविणे आवश्यक आहे.

भांडार विभागाकडुन पुरवठा करण्यात आलेला पावती पुस्तकांचे साठा नोंदवही लेखा विभागात ठेवण्यात आली असल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र नगर परिषद लेखा सहिता 2011 मधील नियम 250 अन्वये नमुना नं. 21 मध्ये नोंद ठेवण्यात आलेली नाही.

भांडार विभागाकडुन लेखा विभागास वित वर्ष 2016-17 मध्ये पूरवठा करण्यात आलेल्या एकूण 88 पावती पुस्तका पैकी 30 पावती पुस्तके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. त्यांचा तपशिल पूढील प्रमाणे

| अ.क्र. | दिनांक | पूस्तक क्रमांक | एकूण पावती पूस्तके |
|---|---|---|---|
| 1. | 27-05-2016 | 8126 ते 8130 | 5 |
| 2. | 08-06-2016 | 8141 ते 8145 | 5 |
| 3. | 18-06-2016 | 8156 ते 8160 | 5 |
| 4. | 17-10-2016 | 8270 | 1 |
| 5. | 21-10-2016 | 8282 ते 8284 | 3 |
| 6. | 21-12-2016 | 8355 ते 8354 | 7 |
| 7. | 30-03-2017 | 8450 ते 8453 | 4 |
| | | एकूण | 30 |

सदर पावती पुस्तके लेखापरिक्षणास का उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही व तसेच साठा नोंदवही महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियमाप्रमाणे ठेवण्यात आलेली नाही. या बाबतचा खुलासा दोन दिवसात लेखापरिक्षणास सादर करण्यात यावा.यासाठी अर्धसमास क्र. 200 दि. 22-06-2021 रोजी देण्यात आला होता.

अनुपालन अप्राप्त

**परीच्छेद क्र.6.6 - वित्त् वर्ष 2016-17 यावर्षाचे देना बँक खाते क्र. 015711002321 या खात्यामध्ये जमा केलेले धनादेश परत आल्याबाबत व बँक स्लीपव्दारे बँकेत भरण्यात आलेल्या रोख रक्कम/ धनादेश बाबत...**

नगररचना विभागाकडुन छाननी शुल्क विकास आकार, भोगवटा दाखला इत्यादीचे शुल्क लेखा विभागामार्फत पावतीव्दारे जमा करुन देना बँक खाते क्र. 015711002321 मध्ये भरणा केला जातो.

पावती पुस्तके पोटकिर्दे चलन बँक स्लीप व बँक स्टेटमेंट विवरणपत्राचे लेखापरिक्षण करताना खालील तक्त्यात नमूद केलेले धनादेश न वटल्याने परत आलेले आहेत.

| अ.क्र. | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | 1208201 | 16-08-2016 | 6201770 |
| 2. | 375289 | 30-07-2016 | 484246 |
| 3. | 702651 | 01-06-2016 | 388391 |
| 4. | 702658 | 01-06-2016 | 943170 |
| 5. | 702659 | 01-06-2016 | 700000 |
| | | एकूण | 8717577 |

धनादेश न वटल्यामुळे परत आल्याची धनादेश नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच न वटलेल्या धनादेशाची रक्कम (महसूल) वसुल झाल्याचे लेखापरिक्षणात आढळुन आलेले नाही. लेखासंहिता 2011 नियम 98 प्रमाणे धनादेश वटवण्यास नाकारले गेले आहेत. अशा धनादेशांचे बँककडुन आढावा घेवून निर्गमित केलेली पावती रद्द करण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर करदात्याकडुन अशा रक्कमेची मागणी करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

तरी वरील त्रुटी बाबत योग्य तो खुलासा दोन दिवसात लेखापरिक्षणास सादर करण्यासाठी अर्धसमास क्र. 201 दि.23-06-2021 नुसार देण्यात आला होता.

अनुपालन अप्राप्त

## परीच्छेद क्र.6.7 - वित्त् वर्ष 2016-17 अखेर विविध कामासाठी घेण्यात आलेल्या रोख रु. 5488682/- अग्रीमाचे समायोजनेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांना निरनिराळया कामासाठी त्यांच्या विभागाच्या कार्यक्रमानुसार वेळोवेळी अग्रीम दिल्याने दिसुन येते. लेखा शाखेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 189 नुसार क्र. 147 मध्ये ठेवलेल्या अग्रीम नोंदवहीची लेखापरिक्षण करताना खालील त्रुटी आढळुन आल्या.

सदर अग्रीम नोदवहीची तपासणी करता सन 1993-94 पासून अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात आलेली अग्रीम रक्कमांचे मार्च 2017 अखेर पर्यंत रक्कम रु. 5488682/- चे समायोजन झालेली नाही त्याचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रात नमुद केला आहे.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 189 नुसार अग्रीमाची वसुली तात्काळ करावयाची आहे. अग्रीम दिल्याचा तारखेपासुन तीन महिन्याचा आत करावयाची आहे. तसेच पाहिले अग्रीम दिल्यानंतर त्याचे वसुली झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देत नाही. असे असताना मनपा वैदकीय अधिकारी, उद्यान अधिक्षक आरोग्य अधिकारी, आरोग्य अधिकारी सार्वजनिक निवडणूक अधिकारी, स्थानिक संख्या कर अधिकारी यांना वारंवार अग्रीम दिल्याचे दिसून येते अग्रीम घेतलेल्या अधिका-या मधील प्रति नियुक्तीचे अधिकारी मुळ सेवेत परत गेले आहेत. परंतु त्याचे नावावर दर्शविण्यात आलेली अग्रीम सन 1193-94 / ते माहे. 31 मार्च 2017 पर्यंत समायोजन केलेली नाही. सेवा निवृत्त व मयत कर्मचा-यांच्या नांवावर देखील अग्रीम दिसुन येते. याबाबतील अग्रीमाची वसुली/ समायोजन कसे करता येईल याबाबत लेखा परिक्षणास खुलासा सादर करावा.
2. महाराष्ट्र नगरपारिषद लेखा संहिता 2011 नियम 244 अन्वये अग्रीमाचे समायोजन 90 दिवसाच्या आत न झाल्यास 90 दिवसापेक्षा अधिक कालावधी साठी अग्रीम रक्कम समायोजन
करण्याबाबत संबधित अधिका-याने कार्यवाही करणे आवश्यक आहे (नोव्हे.2014 पासुन दिलेल्या
अग्रीम संबधी कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. याबाबत अर्धसमास क्र. 202 दि. 28-06-2021 व्दारे खुलासा मागविण्यात आला असुन अनुपालन अप्राप्त आहे.

# विवरणपत्र

| 31 मार्च 2017 पर्यंत समायोजन न झालेले अग्रिम | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | नाव | ठेवीचा तपशिल | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम |
| १ | श्री. चारुदत्त नाईक | सर्वेक्षण अग्रिम | - | ०१/०४/१९९३ | १०,००० |
| २ | श्री. सुरेश सोनसळे | बांधकाम विभाग | | ११/०१/१९९५ | २,००० |
| ३ | श्री. सचिन जुवेकर | पाणी | ४०९ | १०/०६/१९९४ | १०,००० |
| ४ | श्री. सुरेश सोनसळे | अग्रिम | | १०/०७/१९९५ | २५,००० |
| ५ | श्री. सुरेश सोनसळे | अग्रिम | | १८/०८/१९९५ | १५,००० |
| ६ | कै. श्री सुधाकर राणे | पाणी | २१८ | २१/०५/१९९६ | १०,००० |
| ७ | कै. श्री सुधाकर राणे | पाणी | ७०५ | ०६/०८/१९९६ | १०,००० |
| ८ | श्री. शंकर कुलकर्णी | क्रिडा | ८८१ | १४/१२/१९९६ | १४,७७३ |
| ९ | श्री. यशवंत भालेराव | निवडणुक अग्रिम | २६० | १५/०७/२००२ | १०,००० |
| १० | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १२४५ | २६/१०/२००७ | ३,४८,७५० |
| ११ | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १२६६ | ०१/११/२००७ | २,८४,९६९ |
| १२ | डॉ. नंदकिशोर लहाने | जागतिक क्षयरोग | २३२२ | २५/०३/२००८ | १५,००० |
| १३ | श्री. बाळू विंगीयन | वैद्यकिय अग्रिम | ५२ | ०४/०५/२००९ | ६०,००० |
| १४ | शिक्षण मंडळ | शिक्षणदिन अग्रिम | ५०३ | १५/०९/२०१० | ९०,००० |
| १५ | डॉ. बी.डी. चकोर | पल्स पोलिओ | ६११ | १५/१०/२०१० | १,५६,७८० |
| १६ | डॉ. बी.डी. चकोर | रुग्नालय खरेदी | ६५८ | २६/१०/२०१० | ५०,००० |
| १७ | डॉ. बी.डी. चकोर | पल्स पोलिओ | ७४८ | ३०/१०/२०१० | १,५७,२६० |
| १८ | डॉ. बी.डी. चकोर | पल्स पोलिओ | ९३८ | २४/११/२०१० | १,५७,०५० |
| १९ | डॉ. नंदकिशोर लहाने | आरोग्य कार्यक्रम | ११२२ | २४/१२/२०१० | ३०,००० |
| २० | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | १३०८ | ३१/०१/२०११ | १,६३,८३० |
| २१ | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | १३६१ | १५/०२/२०११ | १,६१,४३० |
| २२ | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | १४१५ | २३/०२/२०११ | ९,००० |
| २३ | डॉ. प्रिया सुजित लडके | पल्स पोलिओ | १९४७ | ३१/०३/२०११ | १,६३,८६० |
| २४ | श्री. नागेश इश्कर | जागतिक पर्यावरण दिन | १६७ | २४/०५/२०११ | २५,००० |
| २५ | श्री. हंसराज मेश्राम | जागतिक पर्यावरण दिन | १६८ | २४/०५/२०११ | २५,००० |
| २६ | मुख्य वैद्य अधिकारी | पल्स पोलिओ | २१७ | २७/०५/२०११ | १,६२,३३० |
| २७ | श्री. राजकुमार घरत | बिनतारी प्रवास खर्च | ५०४ | २१/०७/२०११ | २०,००० |
| २८ | श्री. वासुदेव शिरवळकर | निवडणुक अग्रिम | २१४८ | २०/०३/२०१२ | ५०,००० |
| २९ | डॉ. प्रमोद पडवळ | रुग्नालय कपडे धुलाई | २२७२ | २७/०३/२०१२ | २०,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | प्र.मुख्य वैद्य. अधिकारी | आरोग्य कार्यक्रम | २२७३ | २७/०३/२०१२ | १०,००० |
| ३१ | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | ३० | २७/०३/१२ | १,७९,७०० |
| ३२ | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | ३६ | २१/०४/२०१२ | २,७९,७०० |
| ३३ | श्री. अविनाश जाधव | आपातकालीन | १४८ | २१/०५/२०१२ | ५०,००० |
| ३४ | श्री. दादासाहेब खेत्रे | आपत्कालीन | १४९ | २१/०५/२०१२ | ५०,००० |
| ३५ | श्री. चंद्रकांत बोरसे | आपत्कालीन | १५० | २१/०५/२०१२ | ५०,००० |
| ३६ | श्री. हंसराज मेश्राम | जागतिक पर्यावरण दिन | १७५ | २९/०५/२०१२ | १०,००० |
| ३७ | कै. श्री. सय्यद अजहर मोदी | वैद्यकिय अग्रिम | २३९ | ०८/०६/२०१२ | १,५०,००० |
| ३८ | श्री. प्रशांत केसरीनाथ पाटील | निवडणुक अग्रिम | २५३ | १९/०६/२०१२ | ५,००० |
| ३९ | श्री. दिलिप जगदाळे | निवडणुक अग्रिम | ४४० | १७/०७/२०१२ | ५०,००० |
| ४० | श्री. प्रशांत पाटील | निवडणुक अग्रिम | ४४४ | १७/०७/२०१२ | २५,००० |
| ४१ | श्रीम. लॉरेटा घाडगे | निवडणुक भत्ता वाटप | ६०२ | ०६/०८/२०१२ | २,२०० |
| ४२ | श्री. दिपक सावंत | निवडणुक अग्रिम | ६१२ | १३/०८/२०१२ | ५,२५,००० |
| ४३ | श्री. अनिल राठोड | डास नियंत्रण | ७२३ | १०/०९/२०१२ | ४०,००० |
| ४४ | डॉ. प्रमोद पडवळ | रुग्नालय फर्निचर | ७५१ | १७/०९/२०१२ | १,९९,६६९ |
| ४५ | श्री. प्रशांत पाटील | सर्व धर्मिय उस्तव | ९१२ | १८/१०/२०१२ | २५,००० |
| ४६ | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १०४१ | ०९/११/२०१२ | २,११,२८० |
| ४७ | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १०४२ | ०९/११/२०१२ | २,११,२८० |
| ४८ | श्री.प्रकाश पाटील | वाहन दुरुस्ती | १२९१ | २१/१२/२०१२ | १४,५८२ |
| ४९ | डॉ. प्रमोद पडवळ | वाहन दुरुस्ती | १३४२ | ३१/१०/२०१३ | ६,२०० |
| ५० | श्री. रामचंद्र आसोदेकर | पोस्टेज खर्च | १४६२ | ३०/०१/२०१३ | ६,३७५ |
| ५१ | श्री. धनंजय कन्नोजे | अग्निशमन | १४४ | ०४/०६/१३ | ५०,००० |
| ५२ | वैदयकीय अधिकारी | अग्रिम | ३९४ | १०/०७/२०१३ | १५,००० |
| ५३ | आर.एम.परदेशी | झेरॉक्स कामी | ७३९ | ०५/०९/२०१३ | २५,००० |
| ५४ | वैदयकीय अधिकारी | अग्रिम | ९३२ | ०८/१०/२०१३ | १०,००० |
| ५५ | श्री. अनिल राठोड | अग्रिम | १३४७ | १८/१२/२०१३ | ५०,००० |
| ५६ | श्रीम. डेल्सी कोळी | अग्रिम | १४६२ | ०७/०१/२०१४ | ९,३७१ |
| ५७ | श्री. कैलास सातपुते | अग्रिम | १५३७ | २०/०१/२०१४ | २०,००० |
| ५८ | श्री. हेमंत पाटील | अग्रिम | १८७८ | २९/०३/२०१४ | १०,००० |
| ५९ | श्री. अलगुमणी | अग्रिम | १८७९ | २९/०३/२०१४ | २,०६० |
| ६० | श्री. स्वप्नील सावंत | अग्रिम | १४९ | ०२/०६/२०१४ | ५०,००० |
| ६१ | वैद्यकीय अधिकारी | अग्रिम | १९४ | २५/०६/२०१४ | १०,००० |
| ६२ | श्रीम. दिपाली पोवार | अग्रिम | ०३ | ०३/०४/२०१४ | ३०,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | श्री. चंद्रकांत बोरसे | अग्रिम | ८६२ | ०७/०१/१५ | ५०,००० |
| ६४ | श्री. हेमंत पाटील | अग्रिम | ८८७ | १९/०१/२०१५ | १५,००० |
| ६५ | श्री. दयानंद गाडे | अग्रिम | ७५ | २२/०५/२०१५ | १०,०००/- |
| ६६ | श्री. गणेश गोडगे | अग्रिम | ७६ | २२/०५/२०१५ | ५६३५/- |
| ६७ | श्री.प्रमोद पडवळ | अग्रिम | १६५ | ३०/०६/२०१५ | १५०००/- |
| ६८ | श्रीम. दिपाली पोवार | अग्रिम | १६६ | ३०/०६/२०१५ | ५००००/- |
| ६९ | श्री. प्रशांत के पाटील | अग्रिम | २२५ | १६/०७/२०१५ | २५,०००/- |
| ७० | श्री. अविनाश जाधव | अग्रिम | ६०३ | ०७/११/२०१५ | १५०००/- |
| ७१ | श्री. वासुदेव शिरवळकर | अग्रिम | ६०४ | ०७/११/२०१५ | १५०००/- |
| ७२ | श्री.स्वप्नील सावंत | अग्रिम | ६०५ | ०७/११/२०१५ | १५०००/- |
| ७३ | श्री.दिलीप जगदाळे | अग्रिम | ६०६ | ०७/११/२०१५ | १५०००/- |
| ७४ | श्री. डॉसन ढोल्या | अग्निशमन अग्रिम | ४७ | २४/११/२०१५ | १०,०००/- |
| ७५ | श्री. दिलीप रणवरे | अग्निशमन अग्रिम | ४७ | २४/११/२०१५ | १०,०००/ |
| ७६ | श्री. मनवेल डिमेलो | अग्निशमन अग्रिम | ४७ | २४/११/२०१५ | १०,०००/ |
| ७७ | श्री. सदानंद पाटील | अग्निशमन अग्रिम | ४७ | २४/११/२०१५ | १०,०००/ |
| ७८ | श्री. खेमराज गहाणे | अग्निशमन अग्रिम | ४७ | २४/११/२०१५ | १०,०००/ |
| ७९ | श्री. शरद पाटील | अग्रिम | ६४७ | ०४/१२/२०१५ | १२४७/- |
| ८० | श्री. मकरंद फुलझेले | अग्रिम | ७६५ | १२/०१/२०१६ | ५०,०००/- |
| ८१ | श्रीम. शर्मिला गायकर | अग्रिम | ८३५ | २८/०१/२०१६ | ५०००/- |
| ८२ | श्री.दिलीप उघडे | अग्रिम | ८८७ | १२/०२/२०१६' | १५००००/- |
| ८३ | श्री. सु. मो. देशमुख | अग्रिम | १०४३ | ०१/०४/२०१६ | १०,०००/- |
| ८४ | श्री. नरेंद्र चव्हाण | १५ ऑगस्ट अग्रिम | २३६ | ०६/०५/२०१६ | २१,६९०/- |
| ८५ | शहर क्षयरोग अधिकारी | अग्रिम | १८८ | १९/०७/२०१६ | २,६०,६६१/- |
| ८६ | श्री. नितीन मुकणे | आर्ब्रिट्रेशन अग्रिम | ५४२ | २३/११/२०१६ | २०,०००/- |
| ८७ | श्री. सु. मो. देशमुख. | शिक्षण अग्रीम | ६४५ | १७/०१/२०१७ | १००००/- |
| ८८ | श्रीम. स्वाती देशपांडे | स्टेशनरी | | ०६/०३/२०१७ | ४००००/- |
| | **एकुण** | | | | 5488682/- |

परिच्छेद क्र. 6.8:- वित्त वर्ष 2016-2017 दुहेरी पध्दतीने लेखे ठेवणे बाबत.......

नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक लेखासु-102004/71/प्र. क्र. 5/04/नवि - 31 दिनांक 06-07-2005 नुसार महानगरपालिकेने दि. 01-04-2005 पासुन व्दिनोंद पध्दतीने लेखे ठेवणे बाबतचा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा आर्थीक व्यवहारात अचुकता व पारदर्शकता आणण्याची निकड लक्षात घेता, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखे दुहेरी नोंद लेखा पध्दतीने ठेवणे क्रमप्राप्त आहे.

राष्ट्रीय महापालिका लेखा संहीता 2004 (NMAM) मधील तरतुदीनुसार रोखवही लेजर, लेखाशिर्षासह खर्च बिलांचे विहित नमूने, धनादेश विवरण नोंदवही अनामत नोंदवहया बँक ताळमेळ इ. नमूने राष्ट्रीय महापालिका लेखा संहीता (NMAM) प्रकरण 5 मध्ये दिलेले आहेत.

उपरोक्त तरतुदी प्रमाणे लेखापरिक्षण करताना सदरचे लेखे हे व्दिनोंद पध्दतीने ठेवल्याचे आढळून आलेले नाही. तरी या बाबत विभागाने काय कार्यवाही प्रास्तावित केली त्याचा अहवाल सादर करणे बाबत अर्धसमास ज्ञापन क्र.213 दि. 13-08-2021 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

परिच्छेद क्र.6.9 - आमदार निधी , खासदार निधी (16 वी लोकसभा) खासदार निधी (15 वी लोक सभा ), रस्ता निधी, रस्ता सुधारणा निधी , वृक्ष संवर्धन निधी, नागरी दालितवस्ती सुधारणा नोंदवही नमुना क्रमांक 11 बाबत....

लेखा विभागातील आमदार निधी, खासदार निधी (16 वी लोकसभा) खासदार निधी (15 वी लोक सभा), रस्ता निधी, रस्ता सुधारणा निधी, वृक्ष संवर्धन निधी, नागरी दालितवस्ती सुधारणा नोंदवही (नमुना क्रमांक 11 नोंदवही मधील 31 मार्च 2017 अखेरची शिल्लक व बँक खाते मधील शिल्लक या मध्ये खालील प्रमाणे तफावत दिसून येत आहे.

| अनु क्र. | बँकेचे नाव | खाते क्रमांक | रोकडवही प्रमाणे रक्कम | बँक विवरण पत्राप्रमाणे रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| १. | बँक ऑफ इंडिया (आमदार निधी ) | ००८५२०१००६०८०९९ | २२९००६७४ | २६३९०७.५५ | २२६३६७६६.४५ |
| २. | बँक ऑफ महाराष्ट्र (खासदार निधी ) | ६००८८३६१४७९ | ६३७५६८५ | ५६३४२३ | ५८१२२६२ |
| ३. | ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्स | ०९९५१०११०००९९६ | ४३९५३४१०.४९ | २०८१६३.४९ | ४३७४५२४७ |
| ४. | बँक ऑफ इंडिया (रस्ते सुधारणा निधी ) | ००८५२०१००००७३९४ | २७४७६३३.६७ | २२७६८६१४६.११ | २००२१३५१२.४४ |
| ५. | बँक ऑफ इंडिया (वृक्षसंवर्धन निधी) | ००८५२०१००००७३९५ | २०४७०७.१९ | २०९७३७.७६ | ५०३०.५७ |

रोकड वही मध्ये आमदार निधी, खासदार निधी, रस्ते सुधारणा निधी, वृक्षसंवर्धन निधी मधील घेतलेल्या नोंदी नुसार रोकडवही व बँक विवरणपत्रातील केलेल्या रक्कमे मध्ये तफावत दिसून येते याबाबत अर्धसमास पत्र क्र. 205 दि. 26-07-2021 नुसार ताळमेळ बाबत सुचित करण्यात आले होते तथापि याबाबत संबधित विभागामार्फत याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी या तफावतीबाबत ताळमेळ घेवून लेखापरिक्षणास पूर्तता दर्शवावी.

# वाहन विभाग
## (2016-17)

**परिच्छेद क्र. 7.1 :- महापालिकेच्या वाहनाना इंधनपुरवठा करण्याबाबतची मंजूरी कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत...**

1) महानगरपालिकेच्या वाहनांना डिझेल व पेट्रोल पुरवठा करण्यासाठी मे. साई सर्व्हिस यांना दिलेल्या ठेक्यासंबंधीची संपूर्ण मंजूरीत कागदपत्रे लेखापरीक्षणासाठी त्वरीत उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली.

2) या संदर्भात ठेकेदार त्यांच्या बिलामध्ये ठराविक दराने ऑपरेटिंग चार्जेस/सर्विस चार्जेसची आकारणी करत असून, सदर आकारासह, इंधन पुरवठ्याच्या देयकांचे अधिदान केले जात असल्याचे निदर्शनास आले असल्याने सदर आकाराबाबतची संपूर्ण मंजूरीत कागदपत्रे लेखा परीक्षणासाठी त्वरीत देण्याची मागणी, दि. 14/08/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 69 अन्वये करण्यात आली. तथापी, विभागाने सदर कागदपत्रे अद्याप लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याने, इंधन पुरवठादारास अनधिकृतपणे प्रदान झाले किंवा कसे, याची खातरजमा करता आली नाही.

परिच्छेद क्र. 7.2 :- मालमत्तेचे पुस्तक लेखा परीक्षणासाठी उपलब्ध न केल्याबाबत..

महाराष्ट्र लेखा संहिता 1971 मधील नियम 156 नुसार, मनपाच्या मालमत्तांची नोंदणी,संग्रह पुस्तकात करुन, सर्व मालमत्तांची वार्षिक पडताळणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र, संबंधित अधिकाऱ्याने देणे आवश्यक आहे.

वर्ष 2016-17 करीताच्या उपरोक्त नमुद संग्रह पुस्तकांची मागणी अनेक वेळा करुनही वाहन विभागाने सदर पुस्तक लेखा परीक्षणा करीता उपलब्ध करुन दिले नसल्याने वाहन विभागाच्या मालमत्तेच्या पडताळणीची खातरजमा, लेखा परीक्षणास करता आली नाही. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती दि. 01/07/2019 रोजीच्या अर्ध समास क्र.ले.प.वि./34 अन्वये करण्यात आली असुन, याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

# वैद्यकीय विभाग
## (2016-17)

परिच्छेद क्र. 8.1 :- महानगरपालिका प्रशासनाकडून महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अधिनियमांची अंमलबजावणी करताना आढळून आलेल्या गंभीर अनियमितता बाबत.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या तसेच नव्याने स्थापन होणाऱ्या शुश्रुषा गृहे (Nursing Homes) नोंदणी करण्यासाठी व परवाना नूतनीकरणासाठी महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यातील, कलम 2(2) नुसार स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी म्हणून, महानगरपालिकेचे सार्वजनिक आरोग्य अधिकारी यांच्यावर, म्हणजेच, पर्यायाने महापालिका प्रशासनावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने या कायद्यातील कलम 16 अन्वये काही नियम तयार केले असून, या कायद्याची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करणे सोयीस्कर व्हावे म्हणून, स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकाऱ्यास कलम 17 अन्वये काही विशिष्ठ बाबी संबंधी **'पोटनियम'** तयार करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

सदर तरतूदीस अनुसरुन, महापालिका प्रशासनाने दि. 19/06/2003 रोजीचा ठराव क्र. 13 अन्वये, काही **"तरतूदी"** केल्या आहेत. उपरोक्त अधिनियम व नियम, तसेच महापालिकेने संमत केलेल्या **"तरतूदी"** यांचे अवलोकन केले असता असे आढळून आले की, महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट मधील कलम 16, 2 (b) अन्वये, महापालिका क्षेत्रामधील नर्सिंग होमस् ची नोंदणी करणेकरीता अथवा नोंदणीचे नूतनीकरण करणेकरीता, किती फी आकारण्यात यावी, याबाबतचे नियम **करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनास असून**, शासनाने नियमानुसार निर्धारित केलेली फी, संबंधीत संस्थाकडून वसूल करण्याचा अधिकार स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी, पर्यायाने, महापालिकेस देण्यात आला आहे. **सबब सदर ठरावास** शासनाची मंजूरी घेणे आवश्यक असल्याचे लेखा परीक्षणाचे मत आहे.

**परिच्छेद क्र. 8.2 :- सन 2015-16 या वर्षाच्या वापरासाठी वैध असलेल्या पावती पुस्तकांचा वापर 2016-17 मध्ये केल्याबाबत...**

वैद्यकीय विभागाने त्यांच्या वापरासाठी भांडार विभागाकडुन घेतलेली पावती पुस्तके क्र. 7985, 7986, 7987 ही केवळ सन 2015-16 या वर्षामध्येच वापरासाठी वैध असल्याचा शेरा (रबरी स्टॅम्प) या पुस्तकामधील सर्व पावत्यावर ठळकपणे नमुद केला असताना, वैद्यकीय विभागाने सदर पुस्तके सन 2016-17 या वर्षामध्ये रुग्ण वाहिकेचे/शववाहिनेचे भाडे वसुल करण्यासाठी वापरल्याचे व अशा अवैध पावत्या अदाकर्त्यास दिल्याने आढळुन आले आहे.

सबब, अवैध ठरविण्यात आलेल्या पावती पुस्तकांचा वापर करणेकामी विभागाने सक्षम प्राधिका-यांची पुर्व मंजुरी घेतली आहे किंवा कसे याबाबतचा संपुर्ण तपशिल लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती दि. 24/06/2019 रोजीच्या अर्ध समास क्र.ले.प.वि./33 अन्वये करण्यात आली आहे. तथापि, सदर तपशिल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.3 :- रुग्ण वाहिकेच्या भाड्याची रक्कम रुपये ३२०/ कमी वसुली केल्या बाबत.
वसूल पात्र रक्कम रु. 320/-

1) महापालिकेची रुग्ण वाहिका क्रमांक एम एच 04 ई पी 710, दिनांक 10/11/2016 रोजी, श्री. अनिल गावडे यांनी भायंदर ते मुंबई या दरम्यान, रुग्ण वहनांसाठी वापरली. तथापि या 97 किलो मीटर प्रवासा करिता, रुपये 4/- प्रति किलो मीटर या दराने, भाडे रक्कम रुपये 388/- वसूल न करता, दि. 14/01/2017 रोजीच्या पावती क्र. 82,9293 अन्वये केवळ रुपये 68/- वसूल केल्याने, रुपये 320/- इतक्या रकमेची कमी वसुली करण्यात आलेली आहे. सबब, सदर रकमेची वसुली करून त्या बाबतचा अहवाल लेखा परीक्षणासाठी सादर करण्याची विनंती दि. 25/06/2019 रोजीच्या अर्ध समास क्र.ले.प.वि./34 अन्वये करण्यात आला असून याबाबत अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

2) महाराष्ट्र लेखासंहिता 1971 च्या नियम क्र.33(2) ,70(2) ,73(5), 78(3), 97(5) व 107 मधील तरतुदी नुसार , मनपा कोषागार मध्ये पैसे जमा करण्याकरीता नमुना क्र.13 वापरणे आवश्यक आहे. तथापि, याकामी वैद्यकीय विभाग वापरत असलेल्या चलनाचे छापील शीर्षक चुकीने नमुना क्र.03, नियम क्र. 78,84, 86,90,96,106 असे दर्शविण्यात आले आहे

सदर चुकीच्या शीर्षकामध्ये दुरुस्ती करुन त्याबाबतचा अहवाल लेखा परीक्षणास सादर करण्याची विनंती दि. 25/06/2019 रोजीच्या अर्ध समास क्र.ले.प.वि./35 अन्वये करण्यात आली असून याबाबत अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.4 :- महापालिकेच्या सर्वच रुग्ण वाहिका बाबतीत रुग्ण वाहिका भाड्याने दिल्यानंतर भाड्याची वसुली प्रवास संपतेवेळी तात्काळ न करता 6 दिवस ते 580 दिवसापेक्षा जास्त उशिराने केल्या बाबत.

1) वर्ष 2016-17 मधील रुग्ण वाहिकेच्या भाडे वसुली संदर्भातील, रुग्ण वाहिका क्रमांक एम एच 04 इ वाय 1072 व MH04H716 या वाहनांचे लॉग बुक व पावती पुस्तकाचे तुलनात्मक अवलोकन केले असता खाली नमूद केलेल्या नमुना प्रकरणामध्ये, असे आढळून आलेकी रुग्णवाहिका भाड्याने दिल्यानंतर, प्रवास सपंतेवेळी भाडे वसूल न करता, भाड्याच्या दिनांकापासून, 06 दिवसापासून ते 580 दिवस उशिराने भाडे वसुली करण्यात आले आहे. सदर नमुना प्रकरणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

तपशील

रुग्णवाहीका एफ–MH 04 ई वाय 1072

| वाहन भाड्याने दिल्याचा दिनांक | वाहन भाड्याने घेणारी व्यक्ती | वापरलेले किलो मीटर | रक्कम | पावती | पावती दिनांक | वसुलीस विलंब झालेले दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| 6/4/2016 | भारत भाई | 7.00 | 28.00 | 798536 | 23/4/2016 | 17 |
| 7/4/2016 | यशवंत भाई | 81.00 | 324.00 | 798489 | 18/4/2016 | 11 |
| 8/4/2016 | मंदुराम | 71.00 | 284.00 | 798537 | 23/4/2016 | 15 |
| 12/4/2016 | बाबू इंगळे | 144.00 | 576.00 | 798612 | 21/5/2016 | 40 |
| 13/4/2016 | रवी | 10.00 | 40.00 | 798613 | 21/5/2016 | 39 |
| 15/4/2016 | पुनी | 67.00 | 268.00 | 798614 | 21/5/2016 | 37 |
| 17/4/2016 | धर्मेश | 91.00 | 364.00 | 798543 | 23/4/2016 | 12 |
| 18/4/2016 | कल्पेश | 17.00 | 68.00 | 798615 | 21/5/2016 | 34 |
| 18/4/2016 | कल्पेश | 10.00 | 40.00 | 798544 | 23/4/2016 | 06 |
| 18/4/2016 | कल्पेश | 9.00 | 36.00 | 798545 | 23/4/2016 | 06 |
| 22/4/2016 | कल्पेश | 9.00 | 36.00 | 798617 | 21/5/2016 | 30 |
| 22/4/2016 | कल्पेश | 9.00 | 36.00 | 798618 | 21/5/2016 | 30 |
| 22/4/2016 | कल्पेश | 9.00 | 36.00 | 393664 | 21/5/2016 | 30 |
| 7/3/2017 | MH04H716 | 87.00 | 348.00 | 71455 | 30/11/2018 | 580 |
| 14/3/2017 | MH04H716 | 26.00 | 104.00 | 71456 | 30/11/2018 | 573 |
| 19/3/2017 | MH04H716 | 64.00 | 256.00 | 25474 | 13/01/2018 | 301 |

2) या संदर्भात, अन्य 06 रुग्णवाहिकांच्या भाडे वसूलीचे संकृतीदर्शनी अवलोकन केले असता, रुग्णवाहिकांच्या एकाही प्रकरणात भाडे वसुली नियमाप्रमाणे प्रवास संपतेवेळी न करता, ती 5 दिवसापासून ते 580 दिवस उशिराने केल्याचे दिसून आले आहे. उपरोक्त नमूद प्रकरणे ही नमुना प्रकरणे असून, संपूर्ण भाडे वसुली प्रकरणात, थोड्या फार फरकाने अशाच प्रकारच्या आर्थिक अनियमितता असल्याने, सर्वच प्रकरणाचा तपशील न देता उपरोक्त नमुद 16 चाचणी प्रकरणे प्रातिनिधिक स्वरूपात देण्यात आली आहेत. त्यामुळे विभागाने संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेऊन महापालिकेच्या सर्व रुग्ण वाहिकेच्या भाड्याची रक्कम संबंधीतानी वसूल केली आहे का? व वसूल केलेली सर्व रक्कम महापालिकेच्या तिजोरीमध्ये जमा झाली आहे का? याची खातरजमा करणे आवश्यक असल्याने, या बाबत भाडे वसुलीची सद्याची नियमबाह्य पद्दत बंद करून यथोचित कार्यप्रणालीचा अवलंब करणे अनिवार्य आहे, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर अनियमितता दि. 01/07/2019 रोजीच्या अर्ध समास क्र.ले.प.वि./41 अन्वये कळविण्यात आली असुन, याबाबतचा कार्यकृती अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.5 :- वाहन ठेकेदाराने सादर केलेली पी.पी.एफ., ए.एस. इ.एस.आय.सी. व अन्य कागदपत्रे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करण्या बाबत ...

महापालिका आयुक्त यांचे दि. १९/११/२०१६ रोजीचे आदेश क्रमांक सा. प्र./ १३८९/२०१६.

महानगरपालिकेच्या ठेकेदाराची बिले तयार करण्यापूर्वी, ठेकेदाराने सेवा कर, पी.पी.एफ., इ.एस.आय.सी., वर्क्स इन्शुरन्स व अन्य देणी, वैधानिक संस्थेस अदा केल्या बाबतची चलने सादर केल्यानंतरच त्यांची बिले तयार करण्याचे आदेश माननीय महापालिका आयुक्तांनी दि. १९/११/२०१६ रोजीच्या उपरोक्त संदर्भान्वये दिले आहेत. वाहन पुरवठा ठेकेदार, मेसर्स सीताराम ट्रॅव्हल्स यांना वर्ष २०१६-१७ करीता दिलेल्या ठेक्यास अनुसरून सदर ठेकेदाराने सादर केलेली उपरोक्त नमुद कागदपत्रे सत्वर लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्याची विनंती दि. 24/06/2019 रोजीच्या अर्ध समास क्र.31 अन्वये करण्यात आली आहे. तथापि, सदर तपशिल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.6 :- महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यातील तरतूदींची पूर्तता करत नसल्याने, रुग्णालय परवाना नूतनीकरणास पात्र नसल्याचा अभिप्राय वैद्यकीय अधिकाऱ्यानी देवूनही, परवान्याचे नूतनीकरण केल्याबाबत...
रवि सर्जिकल नर्सिंग होम, नोंदणी क्र. एम.एच/ टी.एच.एन./ एम.बी.एम.सी./ 2016-110.

वसूलपात्र रक्कम रु. 6600/-

संदर्भित रुग्णालयाच्या परवान्याचे नूतनीकरणासंबंधीत कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील अनियमितता आढळून आल्या.

1) सदर रुग्णालयाचा परवाना दि. 31/03/2013 रोजी, पुढील 3 वर्षाकरिता म्हणजे दि. 31/03/2016 पर्यंत नूतनीकरण करताना, अग्निशमन विभागाचे 1 वर्षासाठी म्हणजे दि. 31/12/2013 पर्यंत वैध असलेले ना-हरकत प्रमाणपत्र स्वीकारुन सदर नर्सिंग होमच्या परवान्याचे नूतनीकरण दि. 31/03/2016 पर्यंत करण्यात आले. परिणामत: प्रतिवर्षी रु. 1100/- प्रमाणे रु. 3300/- इतक्या दाखला फी महसूलाचे नुकसान झाले.

2) दि. 01/04/2016 पासून पुढील कालावधीकरिता परवाना नूतनीकरणासाठी, सदर रुग्णालयाकडून अर्ज आल्यानंतर, वैद्यकीय अधिकाऱ्यानी रुग्णालयाची तपासणी दि. 29/04/2016 रोजी केली असता, सदर रुग्णालयामध्ये, पात्रताधारक नर्सिंग स्टाफ नसल्याचे आढळून आले. तसेच, अग्निशमन विभागाचा अद्यावत ना-हरकत दाखला नसल्याने, सदर रुग्णालय, कायद्यातील तरतूदीनुसार, नूतनीकरणास अपात्र असल्याचा अभिप्राय वैद्यकीय असधिकाऱ्यानी दिला. तथापी, सदर उणीवांची पूर्तता केल्याची खातरजमा न करताच, परवान्याचे नूतनीकरण दि. 31/03/2019 पर्यंत केल्याने रु. 3300/- इतक्या, अग्निशमन ना-हरकत दाखला फी चे नुकसान झालेले आहे.

सबब, उपरोक्त अनियमितता बाबत योग्य ती कार्यवाही करुन याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणास देण्याबाबत दि. 18/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 88 अन्वये कळविले असून, त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.7 :- अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्र व तपासणी अहवालाशिवाय, रुग्णालयाचा परवाना नूतनीकरण केल्याने, रु. 7425/- इतक्या महसूलाचे नुकसान.
सुश्रुम हॉस्पीटल, नोंदणी क्र. एम.एच/टी.एच.एन./ एम.बी.एम.सी./2016-116.

वसुलपात्र रक्कम रु. 7425/-

संदर्भित रुग्णालयाचा, दि. 01/04/2016 ते दि. 31/03/2019 या कालावधीचा परवाना नूतनीकरण करताना, दि. 01/01/2017 ते दि. 31/12/2019 या कालावधीचा अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला न घेतल्याने दाखला फी रु. 3300/- चे नूकसान झाले आहे. तसेच, अग्निशमन विभागाने, वर्ष-2016 ते 2019 या, 3 वर्षाकरिताची, तपासणी फी रु. 12375/- वसूल न करता, केवळ 2 वर्षाकरिताची रु. 8250/- इतकी फी वसूल केल्याने रु. 4125/- इतक्या महसूली रकमेचे नुकसान झाले आहे.

उपरोक्त अनियमितता बाबत योग्यती कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करणेबाबत दि. 18/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 89 अन्वये कळविले असून, त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.8 :- रुग्णालय परवाना नूतनीकरण थांबविण्याचे आदेश देऊनही, परवान्याचे नियमबाह्य नूतनीकरण.
प्रियांशी हॉस्पीटल-एम.एच./टी.एच.एच./MBMC/2014-66.

वसूलपात्र रक्कम रु. 7425/-

संदर्भित रुग्णालयाच्या परवाना नूतनीकरणासंबंधीत कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील अनियमितता आढळून आल्या.

1) सदर रुग्णालयाच्या परवाना दि. 01/04/2013 ते दि. 31/03/2016 पर्यंत वैध होता. तथापी, दि. 01/04/2016 पासून दि. 31/03/2017 पर्यंत सदर रुग्णालयाने परवाना नूतनीकरण केले नाही. त्यामुळे वर्ष 2016-17 करिता, रुग्णालय परवाना फी तसेच अग्निशमन विभागाची तपासणी फी रु. 4125/- व ना-हरकतर दाखला फी रु. 1100/- या महसूलाचे नुकसान झाले आहे.

2) वैद्यकीय विभागाने नूतनीकरणासंदर्भात रुग्णालयास पत्र पाठविल्यानंतर, वर्ष-2017 पासून नूतनीकरण करण्यासाठी रुग्णालयाकडून अर्ज प्राप्त झाला. त्या अनुषंगाने, वैद्यकीय अधिकारी, लांजेकर यांनी रुग्णालयाची तपासणी दि. 02/06/2017 रोजी केली असता, रुग्णालयामध्ये पात्रताधारक नर्सिंग स्टाफ नसल्याचे, प्रसूतीपूर्व वेदना कक्ष नसल्याचे व रुग्णालय अस्वच्छतापूर्ण असल्याचे आढळून आल्याने, दि. 02/06/2017 रोजीच्या अहवालाअन्वये, परवाना नूतनीकरण थांबविण्याचे आदेश दिले. तथापी, सदर अहवालाचा विचार न करता, दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि. 03/06/2017 रोजी, परवाना नूतनीकरणाचा प्रस्ताव सादर करण्यात आला, व त्यानुसार, परवान्याचे नूतनीकरण दि. 31/03/2017 ते दि. 31/03/2020 पर्यंत करण्यात आले.

3) सदर रुग्णालयाचा परवाना दि. 01/04/2013 ते दि. 31/03/2016 पर्यंत नूतनीकरण करताना, तसेच यानंतर दि. 01/04/2017 ते दि. 31/03/2020 पर्यंत नूतनीकरण करताना, अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला, नियमाप्रमाणे दि. 01/01/2014 ते दि. 31/12/2014 व दि. 01/01/2017 ते दि. 31/12/2017 या कालावधीकरिता घेतला असल्याने, दि. 01/01/2015 ते दि. 31/12/2016 या दोन वर्षाकरिता प्रतिवर्षी रु. 1100/- प्रमाणे रु. 2200/- इतक्या दाखला फी महसूलाचे नुकसान झाले आहे.

उपरोक्त अनियमितता बाबत योग्य ती कार्यवाही करुन, त्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणासाठी सादर करणेबाबत सबंधीत विभागास कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.9 :- रुग्णालयाच्या सद्य:स्थितीचा अहवाल देणे संदर्भात.

डॉ. सुरेश पवार, संचलित, साई जीवन हॉस्पीटल यांनी बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अधिनियमा अंतर्गत रुग्णालयाची नोंदणी करणेकरिता, दि. 28/06/2017 रोजी वैद्यकीय विभागाकडे अर्ज केला असता, वैद्यकीय अधिकारी, नया नगर, मिरारोड यांनी सदर रुग्णालयाची तपासणी करुन दि. 05/02/2017 रोजी तपासणी अहवाल सादर केला.

त्यानुसार, सदर रुग्णालयामध्ये आवश्क ती उपकरणे नसल्याचे, नर्सिंक स्टाफ आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारक नसल्याचे, तसेच, 18 बेड साठी एकच टॉयलेट असल्याचे आढळून आल्यानंतर, सदर बाबी कायद्यातील तरतूदीचा भंग करणाऱ्या असल्याने, परवाना नोंदणी करु नये असे सूचीत करण्यात आले आहे.

सबब, सदर रुग्णालय वर्ष-2017 पासून परवाना न घेताच कार्यान्वीत आहे किंवा कसे? तसेच कार्यान्वीत असल्यास, त्याविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. या बाबतचा अहवाल लेखापरिक्षणास देणेबाबत दि. 18/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 91 अन्वये कळविले असून, त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 8.10 :- मालमत्ता विभागाच्या नोंदीनुसार, निवासी, वापर असलेल्या इमारतीमध्ये रुग्णालयासाठी परवाना दिल्याबाबत.
फातिमा मॅटर्निटी अॅण्ड जनरल हॉस्पिटल, नोंदणी क्रमांक MH/THN/MBMC/2017-140.

बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अॅक्ट अंतर्गत, संदर्भित रुग्णालयाच्या नोंदणी संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील अनियमितता आढळून आल्या.

1) नया नगर, परिसरातील फातिमा महल या इमारती मधील सदनिका क्र. 101 व 102 मध्ये, संदर्भित रुग्णालय चालविण्यासाठी वैद्यकीय विभागाने वर्ष 2017 मध्ये परवानगी दिली आहे. रुग्णालय नोंदणीसाठी सादर केलेल्या कागदपत्रासोबत, मालमत्ता कर विभागाने दिलेले, माहे ऑगस्ट-2016 या महिन्याचे, सदनिका क्रमांक 101 व 102 यांचे देयक क्रमांक, 5041905 व 5041907 दि. 19/08/2016 जोडले आहे. सदर देयकानुसार, सदनिका क्र. 101 चा मालमत्ता क्र. E040030611012 व सदनिका क्र. 102 चा मालमत्ता क्र. E040030611013 असून त्यांचा वापर "निवासी" असा दर्शविला आहे. व "निवासी दराने", कर आकारणी करण्यात आली आहे. सबब, निवासी वापराच्या जागेमध्ये, रुग्णालयास दिलेला परवाना नियमानुसार आहे का? याची खातरजमा **वैद्यकीय विभाग व नगररचना विभागामार्फत** करण्यात यावी.

2) रुग्णालय नोंदीसाठी दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये, सदर रुग्णालयास, दुकाने व आस्थापना विभागाने दिलेले प्रमाणपत्र क्र. 2023/सीई, दि. 30/12/2002 जोडले असून, सदनिका क्र. 101 व 102 मध्ये, फातिमा हॉस्पिटल वर्ष-2002 पासून चालू असल्याचे नमूद केले आहे. सबब, वर्ष-2002 मध्ये चालू असलेल्या रुग्णालयाची नोंदणी 2017 मध्ये केल्याने, सदर रुग्णालय वर्ष-2002 पासून 2017 पर्यंत नोंदणी शिवाय चालू होते का? याची खातरजमा **वैद्यकीय विभागाकडून** करण्यात यावी.

3) वैद्यकीय विभागाने, सदर रुग्णालयाची प्रथमत: वर्ष 2017 ते 2020 या त्रैवार्षिक कालावधीकरिता, नोंदणी करतांना, अग्निशमन विभागाने कॅपिटेशन फी रु. 16500/- वर्ष 2016 मध्ये वसूल केली. तसेच दि. 1/01/2017 ते दि. 31/12/2017 करिताचे तपासणी शुल्क रु. 4125/- (कॅपिटेशनची फी च्या 25%), व दाखला नूतनीकरण शुल्क रु. 1100/-, दि. 03/02/2017 रोजीच्या पावती क्र. 834709 अन्वये वसूल केले. तथापी, दि. 01/01/2018 ते दि. 31/12/2021 या 3 वर्षाचे तपासणी शुल्क रु. 12375 व ना-हरकत दाखला शुल्क रु. 3300/- वसूल न केल्याने सदर रु. 15675/- रकमेची वसूली करण्यासाठी अग्निशमन विभागाने योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) परिच्छेद क्र. 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवासी जागेचा वापर, रुग्णालयासाठी होत असल्याने वाणिज्यिक दराने मालमत्ता कर वसूल करणे आवश्यक असल्याने, प्रस्तुत प्रकरणात होत असलेली महसूलाची गळती थांबविण्यासाठी मालमत्ता कर विभागाने याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

5) परिच्छेद क्र. 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मालमत्ता कर विभागाच्या वर्ष-2016 मधील नोंदी प्रमाणे, फातिमा मॅटर्निटी अॅण्ड जनरल हॉस्पिटल चालू असलेल्या सदनिका क्र. 101 व 102, या जागेचा वापर **"निवासी"** प्रयोजनार्थ असल्याने, सदर जागेचा वापर **"रुग्णालयासाठी"** करणे करीता, उक्त रुग्णालयाने **"जागा वापर बदलासाठी"** (Change of user), नगररचना विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे किंवा कसे, याची

खातरजमा करुन, याबाबत नगररचना विभागाकडून खुलासा मागविला होता. (अर्धसमास क्र. 94, दि. 23/09/2019)

यासंदर्भात नगररचना विभागाने दि. 18/11/2019 रोजीच्या अहवालाद्वारे असे कळविले आहे की, प्रस्तुत रुग्णालय असलेल्या इमारतीमध्ये तळमजल्यावर 4 दुकाने व 2 सदनिका आणि 1 ते 3 मजले रहिवास प्रयोजनार्थ परवानगी दिली असून रुग्णालयासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच जागा वापर बदलासाठी प्रस्ताव सादर केल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे याबाबतची खातरजमा आरोग्य विभागामार्फत करण्याचे त्यांची सूचीत केलेले असून, त्यानुसार वैद्यकीय विभागाकडे सदर बाब संदर्भित केली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये इतर विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.

# अग्निशमन विभाग

(2016-17)

परिच्छेद क्र. 9.1 :- तपासणी फी व दाखला नुतनीकरण फी रु. 11550/- कमी वसुल केल्याबाबत...

2) वसूल करण्यात आलेल्या कॅपिटेशन शुल्क रक्कम रु. 434257/- (43201-8950) ची पावती आढळून आली नाही. यासंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र. 170, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता लेखापरीक्षणास सादर केली नाही. सबब परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे पूर्तता करुन पूर्तता अहवाल अनुपालनासोबत सादर करावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.6,371/-)**

परिच्छेद .क्र. 9.20:- ना-हरकत दाखला नुतनिकरण न केलेबाबत...

मौजे-नवघर, स.क्र. 29/9,12,13,17, 31/2 (नविन)

228/9,12,13,17, 235 (जूना)

शैक्षणिक इमारत बांधकाम - स्टील्ट + 7

तात्पुरता ना-हरकत दाखला - No/ MBMC/FIRE/257/2012-13, दि. 03/07/2012

अंशत: पूर्ण बांधकाम - स्टील्ट + 3 - ना-हरकत दाखला No. MBMC/FIRE/167/2014-15, दि. 06/06/2014

ना-हरकत दाखल्याचे नूतनिकरण क्र. MBMC/FIRE/142/2016-17, दि. 07/06/2016

**अभिप्राय :-**

स्टील्ट + 7 पैकी स्टील्ट + 3 अंशत: पूर्ण बांधकामासाठी ना-हरकत दाखला दि. 06/06/2014 रोजी दिलेला असून, सदरचा दाखला दि. 31/12/2016 पर्यत विधीग्राह्य (Valid) असून दि. 01/01/2017 रोजी नव्याने नुतनिकरण करुन घेणे आवश्यक आहे. तथापी, नस्तीमधील कागदपत्रांची तपासणी केली असता, दि. 01/01/2017 रोजी नुतनिकरण केलेले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे. सबब रक्कम रु. 30608/- (तपासणी शुल्क) आणि नुतनिकरण शुल्क रु. 1100/- असे एकुण रु. 31708/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे. यासंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र. 171, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील लेखापरीक्षणास पुर्तता सादर करण्यांत आली नाही. सबब परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा

**( वसुलपात्र रक्कम रु.31,708/- )**

**परिच्छेद .क्र. 9.21, अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखला वार्षिक नुतनिकरण करणेबाबत...**

मौजे-भाईंदर, स.क्र. 473/3, 474/4 (D) 475, 476, 477 (जुने)

ईमारत "अंबा एंटरप्रायझेस" G+7 (व्यापारी)

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/125/2016-17, दि. 30/05/2016,

कॅपिटेशन शुल्क - 1559.46 चौ.मी. X रु. 44 रु. प्र.चौ.मी. = रु. 68616/-

**<u>अभिप्राय</u> :-**

1) सदरच्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राहयता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे.

2) तथापी, नुतनिकरण केल्याची नस्तीमध्ये आढळून आले नाही. अर्धसमास ज्ञापन क्र. 172, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. तरी सदर नुतनिकरण करण्यात येवून खालील नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु. 18254/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 68616 X 25% = रु. 17154/-
ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-
= रु. 18254/-

परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.18,254/- )**

## परिच्छेद .क्र.9.22. ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत...

मौजे-घोडबंदर, स.क्र. 7/1, निवासी ईमारत "राज एक्सोटिना" विंग D,E,F,

इमारत उंची - 23.95 मिटर (तळ+7), बांधकाम क्षेत्र - 4806.16 मीटर,

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/79/2016-17, दि. 09/05/2016,

कॅपिटेशन शुल्क - 9824.00 पैकी 4806.16 X रु. 22 = 105736/-

**अभिप्राय :-**

1) अग्निशमन विभागाने दिलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे.

2) सदर नस्तीचे अवलोकन केले असता दाखल्याचे नूतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. अर्धसमास ज्ञापन क्र. 173, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. तरी नूतनीकरणासाठी अनुज्ञेय असलेले एकुण शुल्क रु. 11,674/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 105736 X 10% = रु. 10574/-
ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-

रु. 11674/-

परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा

**( वसुलपात्र रक्कम रु.11,674/- )**

**परिच्छेद .क्र. 9.23. ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत...**

मौजे-गोडदेव गांव, स. नं. 327/1, 2, 4 ते 9, 11, 12, 14 ते 19, 21, 22, 24, 25, 328/1 ते 4, 329/1 ते 7, 10, 11,

330/7, 331/4(B), 339/2, 340/1 ते 12, 341/6

निवासी इमारत "सॉलिटेअर हाईट्स" विंग-एफ, तळ+7,

बांधकाम क्षेत्र 2297.78 चौ.मी., उंची 22-80 मीटर,

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/F 1RE/457/2016-17, दि. 02/09/2016,

कॅपिटेशन फि - 2297.78 चौ.मी. X 22 रु.प्र.चौ.मी. = 50551/-

**अभिप्राय :-**

1) कॅपिटेशन शुल्क रु. 50,551/- प्राप्त झाल्याचे नमूद आहे. परंतु सदर रकमेची पावती आणि भरणा चलन नस्ती सोबत आढळून आले नाही.

2) अग्निशमन विभागाने निर्गमित केलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity)दि.31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नुतनिकरण करुन घेणे आवश्यक आहे.

नस्तीचे अवलोकन केले असता, दाखल्याचे नुतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. अर्धसमास ज्ञापन क्र. 174, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. सबब नुतनिकरणासाठी अनुज्ञेय असलेले एकुण शुल्क रु. 6,155/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 50551 X 10% = रु. 5055/-

ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-

रु. 6155/-

परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.6,155/- )**

## परिच्छेद क्र.9.24:- अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत...

मौजे - गोडबंदर, स. न. 77/1, 3
शाळा ईमारत बांधकाम, बांधकाम क्षेत्र - 3618.17 चौ.मी., उंची 15.90 मीटर,
कॅपिटेशन फी 3618.17 चौ.मी. X 33 रु. = 119400/-
अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/117/2016-17,
दि. 20/06/2016

**अभिप्राय** :-

1) कॅपिटेशन फी रक्कम रु. 119400/- पैकी रु. 114640/- वसूलीचा तपशिल (पावती भरणा चलन) तसेच वसूली पावती आणि भरणा चलनाची प्रत नस्तीसोबत आढळून आली नाही.
2) अग्निशमन विभागाने निर्गमित केलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 असून दि. 01/01/2017 रोजी नूतनिकरण करणे आवश्यक आहे. तथापी, नस्तीचे पडताळणी केली असता, दाखल्याचे नुतनिकरण केल्याचे आढळून येत नाही. अर्धसमास ज्ञापन क्र. 175, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. सबब तपासणी शुल्क आणि नुतनिकरण शुल्क असे एकुण रु. 30950/- संबंधितांकडून वसूल करून दाखला नूतनिकरणाची कार्यवाही करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 119400 X 25% | = | 29850/- |
| ii) नुतनिकरण शुल्क | = | 1100/- |
| | | 30950/- |

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा.
**( वसुलपात्र रक्कम रु.30,950/- )**

## परिच्छेद क्रमांक - 9.25. अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत...

मौजे - नवघर, स. न. 225/1,2,3,4,8, 237/5,6, 238/2,3 (जूने), 118/1,2,3,4,8, 186/5,6, 187/2 (नविन)

निवासी व वाणिज्य ईमारत "मिताली राईट्स" (विंग-बी) तळ + 10 मजले बांधकाम क्षेत्र - 6051.59 चौ.मी., उंची

32.20 मीटर

कॅपिटेशन फि 6051.59 चौ.मी. X 22 रु. = 138875/-

2445.00 चौ.मी. X 55 रु. = 134475/-

273350/-

अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/112/2016-17, दि. 26/05/2016

**अभिप्राय :-**

1) उपरोक्त प्रकरणी जमा रक्कम रु. 273350/- ची पावती भरणा चलन नस्तीसोबत आढळून आली नाही. सबब सदरची रक्कम महानगरपालिका खाती प्रत्यक्ष जमा झाली किंवा कसे? याची लेखापरीक्षणात खातरजमा करता आली नाही.

2) अंतिम अग्निशमन विभागाचे ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 असून दि. 01/01/2017 रोजी सदर दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे. मात्र नस्तीचे अवलोकन केले असता, नूतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी नूतनिकरण शुल्क आणि तपासणी शुल्क रक्कम रु. 28435/- संबंधीतांकडून वसूल करुन नूतनिकरण बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 273350 X 10% = 27335/-

ii) नुतनिकरण शुल्क = 1100/-

28435/-

3) ईमारत निवासी आणि वाणिज्य वापरासाठी आहे. परंतु संपूर्ण बांधकाम क्षेत्रावर निवासी दराने कॅपिटेशन शुल्क वसूली करण्यांत आलेली आहे. याबाबत तरतूदीसह खुलासा

लेखापरीक्षणास सादर करावा. अन्यथा निवासी आणि वाणिज्य वापरासाठीच्या क्षेत्रानुसार निवासी क्षेत्रासाठी निवासी दराने आणि वाणिज्य क्षेत्रासाठी वाणिज्य दराने कॅपिटेशन शुल्क वसूल करण्यात करण्यात यावा. यासंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र. 176, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. याबाबत तरतूदीसह खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

उपरोक्त मुद्यांचे संदर्भात पूर्तता अहवाल अनुपालनासोबत सादर करण्यात यावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.28,435/- )**

# जन्म-मृत्यू विभाग
(2016-17)

परिच्छेद क्र. 10.1 जन्मतारखेचे प्रसूतितज्ञांचे प्रमाणपत्र अढळ न झालेबाबत.

जन्म-मृत्यू दाखल्यासंदर्भात सन 2016-17 मधील निवडक महिन्यांच्या अभिलेखाची पडताळणी केली असता, खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

खालील नमूद केलेल्या प्रकरणी बालकाचा जन्म प्रसूतिगृहात झाल्याचे नमूद केले आहे. मात्र, संबंधीत प्रसूतिगृहाच्या डॉक्टरचे प्रमाणपत्र अढळ झाले नाही.

| अ. क्र. | नोंदवहीतील क्रमांक | वडीलांचे/ पालकांचे नांव | मुलगा/मुलगी जन्म दिनांक | निवास पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | 4350/5024 | रवि धर्मराज बैरागी | 25/06/2016 (मुलगी) | मिनाक्षी नगर, काशिगांव, काशिमीरा |
| 2 | 4231 | विकास पाटील | 27/06/2016 (मुलगा) | बंदरआळी, नारंगी गांव, विरार (प.) |
| 3 | 4273 | कृष्णा सुरेश रावते | 10/09/2015 (मुलगा) | घोडबंदर, आर.टी.ओ. जवळ, मिरारोड |
| 4 | 4232 | नरेंद्र पुरोहित | 28/06/2016 (मुलगा) | 201/समर्पेन अर्पा., 60 फुटी रोड, भाईंदर (प.) |
| 5 | 2192 | ईरफान आली शेख | -- | -- |
| 6 | 2193 | समिर सावंत | -- | -- |

उपरोक्त प्रकरणी जन्माचे प्रसूति तज्ञांचे/डॉक्टरांचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करणेबाबत दि. 06/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 75 अन्वये कळविले असून पूर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 10.2 :- मृत्यूची नोंद विलंबाने केलेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधी कलम 368 मध्ये निर्देशित केल्यानुसार मृत व्यक्तीच्या मृत्यू संबंधी नोंदणी करण्यासाठी आवश्यक तपशीलासह माहिती सदर व्यक्ती मृत्यू पावल्यापासून चोवीस तासांच्या आत देणे आवश्यक आहे. तथापी खालील नमूद केलेल्या प्रकरणांची माहिती विहीत केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने दिलेली आहे.

| अ. क्र. | मृत्यू नोंद क्रमांक | मृत्यू दिनांक | मृत्यू नोंद दिनांक | मृत व्यक्तीचे नांव | पत्ता | विलंब कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 939 | 29/01/2016 | 02/04/2016 | सनवर बेगम | | 63 दिवस |
| 2 | 993 | 26/01/2016 | 06/04/2016 | बाळाजीराव भोसले | | 40 दिवस |
| 3 | 994 | 16/05/2015 | 06/04/2016 | हर्षल अनिल पाटील | | 10 महिने 26 दिवस |
| 4 | 1102 | 09/09/2015 | 16/04/2016 | दिगंबर लक्ष्मण साळकर | | 7 महिने 10 दिवस |
| 5 | 1139 | 19/02/2016 | 19/04/2016 | वंश राहुल अग्रवाल | | 60 दिवस |
| 6 | 1197 | 24/03/1992 | 22/04/2016 | दत्तात्रेय केशव पाटील | | 24 वर्ष 28 दिवस |
| 7 | 1198 | 15/05/1986 | 22/04/2016 | रघुनाथ सोनू गुरव | | 29 वर्ष 11 महिने 6 दिवस |
| 8 | 1199 | 15/11/1993 | 22/04/2016 | रमेश केशव पाटील | | 22 वर्ष 5 महिने 7 दिवस |
| 9 | 1235 | 04/01/2016 | 29/04/2016 | फतिमाबाई हायत बशम | | 3 महिने 25 दिवस |
| 10 | 1229 | 28/04/2015 | 26/04/2016 | पुजा विनितकुमार चौधरी | | 11 महिने 3 दिवस |

विभागाने उपरोक्त विलंबाने नोंदणी केलेली प्रकरणे लेखा परीक्षणांस पडताळणीसाठी सादर करणेबाबत दि. 06/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 76 अन्वये कळविले असून, याबाबतचा तपशिल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 10.3 :- जन्म-मृत्यू दाखला शुल्क रक्कम विसंगतीबाबत.

(वसूलपात्र रक्कम रु. 1220/-)

महानगरपालिका अधिनियम - 1949 मधील कलम 363 ते 371 मध्ये निर्देशित केल्यानुसार जन्म-मृत्यू दाखले निर्गमित केले असून, अनुज्ञेय शुल्क जमा रकमेपेक्षा रोख शाखेकडे कमी भरणा केल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

| भरणा दिनांक | जमा रक्कम | प्रत्यक्ष भरणा | कमी भरणा |
|---|---|---|---|
| 07/10/2016 | 580/- | 530/- | 50/- |
| 18/10/2016 | 2940/- | 1770/- | 1170/- |
| एकुण | 3420/- | 2300/- | 1220/- |

1) उपरोक्त प्रत्यक्ष जमा रकमेपेक्षा कमी भरणा रक्कम रु. 1220/- च्या संदर्भात अभिलेखावरुन पडताळणी करुन पूर्तता अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात यावा.
2) मृत्यू दाखले माहे जुलै-2016 व जाने-2017 लेखापरीक्षणास अद्याप अप्राप्त आहेत. सदरचे दाखले तपासणीसाठी सादर करणेबाबत विभागास कळविण्यात आले आहे.
3) जन्म-मृत्यू दाखला शुल्क आणि विलंब शुल्का संदर्भात शासन आदेश आणि समिती ठरावाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करुन विभागास कळविण्यात आले.

उपरोक्त बाबींची पूर्तता करणेकामी दि. 09/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 77 अन्वये विभागास कळविले असून देखील याबाबत अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 10.4 :- जळाऊ लाकुड शुल्क भरणा मधील विसंगतीबाबत.

जन्म-मृत्यू नोंदणी शाखेतील जळाऊ लाकूद शुल्क भरणा संबंधीचे अभिलेखाची पडताळणी केली असता, खालील अनियमितता निदर्शनास आले आहे.

| भरणा दिनांक | पावती क्रमांक | रोख शाखेकडील वर्ग दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 04/10/2016 | 801276 | 05/10/2016 | 1000/- |
| 11/10/2016 | 801277 | 13/10/2016 | 1000/- |
| 12/10/2016 | 801278 | 13/10/2016 | 1000/- |
| 29/10/2016 | 801279 | 02/11/2016 | 1000/- |
| 31/10/2016 | 801280 | 02/11/2016 | 1000/- |
| एकुण | | | 5000/- |

सन 2016-17 मधील माहे ऑक्टोबर-2016 व नोव्हेंबर 2016 च्या रोखवहीवरुन उपरोक्त वसूल रकमांची रुजूवात घेतली असता, दि. 12/10/2016 ते दि. 31/10/2016 दरम्यान वसूल रक्कम रु. 3000/- दि. 13/10/2016 आणि दि. 02/11/2016 रोजी रोख विभागाकडे वर्ग केल्याचे विभागाचे चालन फाईल वरुन समजते. परंतु सदर रकमांची रोखवहीमये त्या-त्या दिनांकास जमानोंद अढळ होत नाही. तरी सदर रु. 3000/- चे जमा रकमेच्या संदर्भातील विसंगतीबाबत तसेच रक्कम नगरपालिका फंडामध्ये प्रत्येक्षात जमा केली किंवा कसे? याचा तपशिल लेखापरीक्षणास सादर करण्यास विभागास कळविले आहे.

तसेच पावती क्र. 801248/- दि. 18/07/2016 अन्वये श्री. जितेंद्र शहा, यांचेकडून प्राप्त रक्कम रु. 1000/- विभागाने चलनाद्वारे दि. 19/07/2016 रोजी रोख शाखेकडे वर्ग केले आहेत. तथापी, सदर रकमेची रोखवहीमध्ये जमा नोंद अढळ होत नाही. याबाबत खातरजमा करुन पूर्तता सादर करणेकामी दि. 09/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 78 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा तपशिल अद्याप अप्राप्त आहे.

# पाणी पुरवठा विभाग
## (2016-17)

**परिच्छेद क्र. 11.1: - पाणी पुरवठा विभागातील मागणी नोंदवही मधील अनियमितता.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेंतर्गत भाईंदर (पूर्व) च्या पाणीपट्टी संबंधीची विहीत नमुन्यामधील मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता, निदर्शनास आलेल्या अनियमितता खालील प्रमाणे -

1) मागणी नोंदवहीमधील प्रत्येक पृष्ठावर कार्यालयाची मुद्रा/सिल उमटून नोंदवहीच्या शेवटच्या पृष्ठावर पृष्ठ क्रमांकासह सिलनोंद प्रमाणपत्र नोंदवून संबंधीत अधिकाऱ्यानी स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे.

2) नोंदवहीमध्ये मिटर क्रमांक नमुद केलेला आहे. परंतु कंपनीचे नांव आणि मीटर जोडल्याची तारीख नमूद करण्यांत आलेली नाही.

3) नळ कनेक्शनचे प्रयोजन घरगूती किंवा बिगर घरगूती तसेच पाणी बिलाचे प्रती 1000 लीटर्स करीताचे दर याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे पाणीपट्टी वसूल रकमेची खातरजमा लेखापरीक्षणात होवू शकत नाही.

4) नळ कनेक्शन मंजूर दिनांक आणि प्रत्यक्ष नळ कनेक्शन दिल्याची तारीख नोंदवहीमध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

5) काही अपवाद वगळता मीटर रिडींग नोंदणाऱ्या संबंधीत कर्मचाऱ्यानी नोंदवही मध्ये स्वाक्षरी केलेली नाही.

6) पाणी वापरासंबंधात नोंदविलेले मीटर रिडींग आणि आकारण्यांत आलेले शुल्क याची पडताळणी करुन नोंदवहीमध्ये संबंधीत अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमिततांची पूर्तता करुन लेखापरीक्षणास पूर्तता अहवाल सादर करण्यांत यावा.

परिच्छेद क्र. 11.2 :- पाणी पुरवठा विभागातील अनियमितता मिटर रिडींगमध्ये मागील महिन्याचे रिडींग चलु महिन्यामध्ये दर्शविण्यात तफावत...

पाणी पुरवठा विभाग, भाईंदर (पूर्व) चे 2016-17 वर्षाचे मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता, खालील नमुद केलेल्या ग्राहकांचे नोंदीची पडताळणी केली असतांना मिटर पूर्ण वर्षभर चालू स्थितीत असतांना देखील मिटर रिडींगमध्ये मागील वापर नोंदीमध्ये तफावत असल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आली आहे.

(रिडींग हजारात)

| अ. क्र. | ग्राहकाचे नांव | ग्राहक क्रमांक | नोंदीचा दिनांक | प्रत्यक्ष मागील रिडींग | दर्शविलेले मागील रिडींग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सोनम प्रेरणा को.ऑ.हौ.सो. | MKN-0201386 | 05/01/2017 | 10356 | 1000 |
| 2 | | MKN-0201387 | 05/01/2017 | 10441 | 1000 |
| 3 | | MKN-0201388 | 09/01/2017 | 10047 | 1000 |
| 4 | | MKN-0201385 | 05/01/2017 | 10342 | 1000 |

नविन मिटर बसविण्यांत आलेले नसतांना प्रत्यक्ष मागील मिटर रिडींग नमुद न करता, परिगणना कोणत्या निकषानुसार केली? याबाबतचा खुलासा लेखा परीक्षणास सादर करण्यात यावा. तसेच सदरची पडताळणी चाचणी पद्धतीने निवडक प्रकरणांची केलेली असल्यामुळे उर्वरित प्रकरणांचा आढावा घेवून निदर्शनास येणाऱ्या अशा प्रकारच्या अनियमिततांचे निराकरण करण्याचे दि. 19/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 93 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.3 :- पाणी पुरवठा विभागातील अनियमितता.

पाणी पुरवठा विभाग, भाईंदर (पूर्व) चे 2016-17 वर्षाचे मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता, त्यामध्ये नमूद केलेल्या मिटर रिडींगमध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे-

ग्राहकाचे नांव - सोनम प्रेरणा को.ऑ.हौ.सो.,

ग्राहक क्र. - M02/MKN-02013188

मिटर क्र. 90126 / निवासी

(रिडींग हजारात)

| अ. क्र. | मिटर रिडींग दिनांक | सध्याचे रिडींग | पूर्वीचे रिडींग | पाण्याचा वापर (2-3) | पाणीपट्टी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 07/05/2016 | 9985 | 9540 | 445 | 4450 |
| 2 | 09/09/2016 | 7095 | 9985 | (-) 2890 | 4100 |
| 3 | 05/01/2017 | 7568 | 7095 | 473 | 4730 |

उपरोक्त प्रकरणी दि. 09/09/2016 रोजी पूर्वीचे रिडींग 9985 असून रिडींच्या तारखेला सध्याचे रिडींग 7095 असे नोंदविलेले आहे. वास्तविक पूर्वीचे रिडींग पेक्षा (Previous Reading) सध्याचे रिडींग (Current Reading) जास्त असणे आवश्यक आहे. तथापी, सदर प्रकरणात चालू रिडींग, पूर्वीचे रिडींग पेक्षा कमी नोंद केली केलेली आहे. असे असतांना पाण्याचा वापर (Current Reading-Previous Reading) 410000 लिटर दर्शवून आकारणी केलेली आहे. त्यामुळे 05/01/2017 रोजीचे पाणी वापर नोंदीबाबत देखील खातरजमा करण्यांत यावी.

उपरोक्त विसंगतीबाबत पडताळणी करुन पूर्तता लेखापरीक्षणास सादर करावी. सदरची पडताळणी चाचणी पद्धतीने निवडक प्रकरणांची केलेली असल्यामुळे उर्वरित प्रकरणांचा आढावा घेवून निदर्शनास येणाऱ्या अशा प्रकारचे प्रकरणांचे निकारण करण्याचे दि. 19/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 92 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.4 :- पाणी पुरवठा विभागामधील अनियमिततांची पूर्तता सादर करणेबाबत...

पाणी पुरवठा वसूली बाबतचे दैनिक वसूलीचा तपशिल दर्शविणारे नमुना-3 पत्रक (Online Challan) जोडलेले नाही. दि. 27/01/2017 रोजी एकुण रक्कम रु. 136662/- वसूलीचा एकत्रित विवरण पत्रानुसार तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पाणी शुल्क | 130895 |
| पाणी उपकर | 365 |
| विलंब शुल्क | 5402 |
| **एकुण** | 136662 |
| (-) धनादेशाने प्राप्त | (-) 69160 |
| रोख भरणा | 67502 |

माहे जाने-2017 या महिन्याचा पाणी पुरवठा विभागाच्या पाणीपट्टी महसुलाची तपासणी करतेवेळी दि. 27/01/2017 रोजीच्या भाईदर काशी, मिरागांव, मिरारोड या 4 उपकेंद्रामध्ये एकुण संकलित झालेल्या रक्कम रु. 136662/- या रकमेचा धनादेश निहाय तपशिल तसेच भरणा रकमांची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

1) भाईंदर 2) काशी 3) मिरागांव 4) मिरारोड या उपकेंद्रांची वसूली असून सदर सर्व उपकेंद्रांमधुन विहीत नमुन्यामधील विवरण 3 आणि धनादेशाने वसूल रकमांचा धनादेशनिहाय तपशिल लेखा परीक्षणास उपलब्ध झालेला नाही. सबब सदरचा तपशिल उपलब्ध करुन त्वरीत लेखापरीक्षणास सादर करण्यात यावा. जेणेकरुन प्राप्त रकमांचा बँक आणि रोखवहीवरुन ताळमेळ घेणे लेखा परीक्षणास शक्य होईल.

दि. 30/01/2017 एकत्रित वसूली विवरणपत्रानुसार धनादेश भरणा आणि रोखीने भरणा अनुक्रमे रु. 263890/- व रु. 102370/- असा एकूण रु. 366260/- च्या वसूली संदर्भात नवघर व मिरारोड उपकेंद्राकडून विहीत नमुना 3 (Online Challan) प्रकरणासोबत अढळ होत नाही. सदरची चलने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबीची पूर्तता करणेबाबत दि. 24/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 96 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.5 :- पाणी पुरवठा विभागामधील अनियमिततांची पूर्तता सादर करणेबाबत...

केंद्रनिहाय धनादेशाद्वारे वसूल रकमांच्या संदर्भात चलन फाईलमध्ये धनादेश यादी सादर न केल्याबाबत.

सन 2016-17 या वर्षातील निवडक महिन्यांचा पाणी पुरवठा विभागातील केंद्र निहाय पाणी पट्टी वसूलीचा आढावा घेतला असता, चलन फाईलमध्ये धनादेशाद्वारे प्राप्त रकमांचे बाबतीत धनादेश निहाय रकमांचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडलेले नाही. त्यामुळे सदर वसुल रकमांचा बँक विवरण पत्रकातील जमा रकमा ताळमेळ घेणे शक्य होत नाही. तरी 2016-17 वर्षाचे लेखा परीक्षणासाठी निवड करण्यांत आलेल्या माहे एप्रिल-16, जुलै-16, ऑक्टोबर-16 आणि जाने-17 या चार महामध्ये धनादेशाद्वारे प्राप्त रकमांचा केंद्र निहाय आणि धनादेशनिहाय तपशिल त्वरीत लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती दि. 30/09/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 97 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे. तसेच याबाबत इतर महिन्यांमध्येही जमा खर्चाचा ताळमेळ घेतलेचे दिसून येत नाही.

परिच्छेद क्र. 11.6 :- धनादेशाद्वारे प्राप्त झालेल्या पाणीपट्टी रकमेची नोंद, विभागाच्या संकलन वही मध्ये तसेच लेखा विभागाच्या रोकड वही मध्ये नसल्याबाबत...

पाणी पुरवठा विभागाच्या माहे जुलै-2016 या चाचणी महिन्याची पाणीपट्टी वसूली संदर्भातील चलने, संकलन वही व लेखा विभागाची रोकड वही, यामधील नोंदीचे अवलोकन केले असता असे आढळून आले की, दि. 27/07/2016 रोजीच्या चलनाप्रमाणे मिरागांव क्षेत्राची एकुण पाणीपट्टी वसूली रु. 50200/- इतकी असून, त्यामध्ये धनादेश रक्कम रु 49960/- व रोकड रक्कम रु. 241/- असा समावेश आहे. सदर रकमेची नोंद, संकलन वही (नमुना 50) व रोकड वही मध्ये घेताना, केवळ रोकड रक्कम रु. 241/- इतकीच नोंद घेण्यात आली. तथापी, धनादेश रक्कम रु. 49960/- ची नोंद संकलन व रोखड वहीमध्ये घेतल्याचे आढळून आले नाही.

उपरोक्त बाबीची खातरजमा करुन याबाबत योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल लेखा परीक्षणास सादर करणेबाबत दि. 03/10/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 98 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.7 :- धनादेशाद्वारे पाणीपट्टी वसुलीबाबत...

पाणीपटटी विभागातील 2016-17 या वर्षाचे निवडक महिन्यांचे जमेची पडताळणी केली असता दि. 27/07/2016 रोजीचे लेखा शाखेमधील एकत्रित चलन आणि पाणीपुरवठा उपकेंद्रावरुन प्राप्त चलनामध्ये दर्शविलेल्या धनादेश आणि रोखीनी जमा रकमाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| उपकेंद्र | धनादेश | रोख | एकुण |
|---|---|---|---|
| भाईंदर (प.) | 65342 | 24199 | 89541 |
| मिरा गांव | 49997 | 241 | 50238 |
| | 115339 | 24440 | 139779 |

सदरचे चलनांवरुन उपकेंद्र पोटकिर्दची पडताळणी केली असता जमा रकमा बरोबर आहेत मात्र मिरागांव उपकेंद्रामध्ये धनादेशाद्वारे प्राप्त वसुली एकुण रक्कम रु. 49,997/- दि.29/07/2019 रोजी बँक विवरणपत्रामध्ये जमा नोंद आहे. परंतु सदरची नोंद एकत्रित चलन आणि रोखवही मध्ये घेण्यांत आलेली नाही. रोखवही, पोटकिर्द आणि एकत्रित पोटकिर्द मध्ये रक्कम न दर्शविल्यामुळे महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यामध्ये दर्शविण्यांत आलेली जमा व प्रत्यक्ष जमा यामध्ये तफावत येवु शकते.

धनादेशाचा तपशिल (पाणी पुरवठा विभाग मिरा गांव)

| अ.क्र. | धनादेश | बँकेचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 7200 | ओरिएंटल बँक | 9327 |
| 2 | 510770 | आय डी बी आय बँक | 400 |
| 3 | 248571 | पंजाब नॅशनल बँक | 5284 |
| 4 | 175777 | ॲक्सिस बँक | 29742 |
| 5 | 302258 | स्टेट बँक | 5244 |
| | | एकुण | 49997 |

सदर प्रकरणी अर्धसमास क्र. 129, दि. 22/01/2020 अन्वये पाणी पुरवठा विभागाकडून खुलासा मागविण्यात आला. मात्र, खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.8 :- पाणी पुरवठा विभागामधील अनियमितता...

पाणी पुरवठा विभागाचे 2016-17 वर्षाचे निवडक महिन्यांची जमा रक्कमांची बँक विवरण पत्रावरुन पडताळणी केली असता विभागाचे धनादेश नोंदवहीनुसार दि. 30/07/2016 रोजी भाईंदर (प.) केंद्रांतर्गत धनादेशाची रक्कम व प्रत्यक्ष बँकेत जमा नोंद यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | ग्राहक क्र. | ग्राहकाचे नांव | पावती क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | HKM-0303929 | सरस्वती सदन | 65/1019589 | 8746/- |
| 2 | HKS-030930 | सरस्वती सदन | 65/1019591 | 8746/- |
| 3 | HKM-2203783 | सरस्वती सदन सहकारी गृह | 65/1019585 | 8746/- |
| | | | एकुण | 26238/- |

पाणीपटटीची उपरोक्त नमुद एकुण रक्कम रु. 26238/- सरस्वती सदन यांचेकडुन धनादेशाद्वारे ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक (प.) या बँकेच्या धनादेश क्र. 865644/30/07/2016 अन्वये प्राप्त झालेली आहे. परंतु धनादेशाची बँक विवरणावरुन पडताळणी/ताळमेळ घेतला असता बँक विवरणपत्रामध्ये दि. 2.8.2016 रोजी सदर धनादेशाद्वारे रक्कम रु. 8746/- प्रत्यक्षात जमा नोंद आहे.

कार्यालयीन धनादेश नोंदवहीनुसार सदरचा धनादेश रक्कम रु. 26238/- या रकमेचा असतांना बँक खात्यामध्ये रु.8746/-एवढीच जमा रक्क्म म्हणजे (26238-8746) रु. 17492/- एवढी कमी जमा झाल्याचे निदर्शनास आले आहे. या सदंर्भात अर्धसमास क्र. 130, दि. 22/01/2020 अन्वये खुलासा, तथापि, सदर अनियमिततेबाबत पुर्तता सादर करणेबाबत कळविले आहे. परंतु सदर प्रकरणी पुर्तता अहवाल/खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.9 :- पाणी पुरवठा विभागातील धनादेशाद्वारे वसूलीचे धनादेश अनादरीत झालेबाबत...

पाणी पुरवठा विभागाचे 2016-17 या वर्षाचे वसूली/जमा संदर्भातील अभिलेखाची तपासणी केली असता, पाणीपट्टी वसूलीचे बँकेद्वारे अनादरीत झालेल्या धनादेशांचा केंद्र निहाय तपशिल खालील प्रमाणे -

| अ.क्र. | पाणी पुरवठा केंद्राचे नांव | अनादरीत धनादेश संख्या | रक्कम | अनादरीत धनादेश शुल्क आकारणी रु. 114.50/- प्र. धनादेश |
|---|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.) | 148 | 25,64,971 | 16,946.00 |
| 2. | भाईंदर (पूर्व) | 161 | 30,87,688 | 18,434.50 |
| 3. | मिरारोड | 201 | 42,98,811 | 23,014.50 |
| 4. | मिरागांव | 045 | 5,82,950 | 5,152.50 |
| 5. | काशी | 020 | 1,42,109 | 2,290.00 |
| 6. | घोडबंदर | 021 | 6,82,490 | 2,404.50 |
| 7. | चेणा | 5 | 55,654 | 572.50 |
| 8. | डोंगरी | 5 | 18,042 | 572.50 |
| 9. | उत्तन | 6 | 70,878 | 687.00 |
| | एकुण | 612 | 1,15,03,493 | 70,074.00 |

धनादेशाद्वारे वसूल पाणीपट्टीचे अभिलेखाची पडताळणी केली असता, 2016-17 मध्ये प्राप्त धनादेशांपैकी एकुण रक्कम रु. 1,15,03,493/- चे 612 धनादेश खातेदाराच्या खात्यामध्ये पुरेशी शिल्लक नसल्यामुळे बँकेने अनादरीत (Dishouner) केलेले आहे. सदर धनादेशांकरीताचे प्रति धनादेश रु. 114.50/- प्रमाणे रु. 70,074/- एवढे शुल्क आकारुन सदरची रक्कम महानगरपालिकेच्या बँक खात्यामधून कपात केलेली आहे.

अनादरीत धनादेश नोंदवहीचे अवलोकन केले असता, सदर नोंदवहीत धनादेश परत आल्यानंतर पाणीपट्टी वसूली आणि दंडनिय रक्कम बाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल नमुद केलेला नाही. त्यामुळे अनादरित धनादेशापोटी थकित राहिलेली वसूलीची रक्कम रु. 1,15,03,493/- आणि बँकेने आकारलेले दंडनिय शुल्क प्रती धनादेश रु. 114.50/- प्रमाणे रु. 70,074/- वसूल झाले किंवा कसे? याची लेखापरीक्षणात खातरजमा करता आलेली नाही.

उपरोक्त नमुद धनादेशांचे संदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या नोंदीसह नोंदवही विभाग प्रमुखांच्या साक्षांकनासह अद्यावत करुन पूर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 144, दि. 24/02/2020 अन्वये कळविण्यात येवूनही अद्याप पूर्तता अहवाल अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.10 :- पाणी पुरवठा विभागांतर्गत टँकर पाणीपुरवठा केंद्रामधील धनाकर्षाद्वारे जमा रकमेची रोखडवहीतील नोंद तफावतीबाबत...

पाणी पुरवठा विभागांतर्गत टँकरद्वारे पुरवठा केंद्रातील वसुलीबाबतचे अभिलेखाची 2016-17 मधील एप्रिल, जुलै, जाने महाचे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता निदर्शनास आली आहे.

दि. 23/01/2017 रोजी टँकर पाणी पुरवठ्याची धनाकर्षाद्वारे रक्कम रु. 413100/- प्राप्त झाली असून, त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | पावतीचा क्र. | धनाकर्ष क्र. | बँकेचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 169007 | 031654 | ओरिएंटल बँक | 26350/- |
| 2. | 169008 | 000098 | पीएमएस बँक | 25500/- |
| 3. | 169009 | 031655 | ओरिएंटल बँक | 8500/- |
| 4. | 169010 | 088746 | न्यू इंडिया को.ऑप.बँक | 8500/- |
| 5. | 169011 | 230587 | दि. कर्नाटक बँक | 25500/- |
| 6. | 169012 | 712012 | इंड्सईड बँक | 25500/- |
| 7. | 169013 | 230586 | दि. कर्नाटक बँक | 25500/- |
| 8. | 169014 | 069610 | भारतीय स्टेट बँक | 76500/- |
| 9. | 169015 | 045273 | बॅसिन कॅथलिक बँक | 42500/- |
| 10. | 169016 | 045272 | बॅसिन कॅथलिक बँक | 42500/- |
| 11. | 169017 | 045274 | बॅसिन कॅथलिक बँक | 42500/- |
| 12. | 169018 | 018631 | शामराव विठ्ठल को.ऑप.बँक | 8500/- |
| 13. | 169019 | 018628 | शामराव विठ्ठल को.ऑप.बँक | 12750/- |
| 14. | 169020 | 017224 | आयडीबीआय बँक | 8500/- |
| 15. | 169021 | 017221 | आयडीबीआय बँक | 8500/- |
| 16. | 169022 | 017222 | आयडीबीआय बँक | 8500/- |
| 17. | 169023 | 017223 | आयडीबीआय बँक | 8500/- |
| 18. | 169024 | 017225 | आयडीबीआय बँक | 8500/- |
| | | | एकुण | 413100/- |

सदर रकमेचा लेखा विभागाने ठेवलेल्या रोखडवही नमूना-11 बरोबर ताळमेळ घेतला असता, उपरोक्त धनाकर्षांची प्राप्त रक्कम रु. 413100/- ची पोटकिर्द प्रमाणे असतांना रोखडवहीमध्ये रु. 413400/-अशी रु. 300/- नी जास्तीची जमा नोंद केलेली आहे.

सदर बाबीची खातरजमा करुन बँक विवरणपत्रामधील नोंदीसह अनुपालन अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 142, दि. 11/02/2020 अन्वये कळविले आहे. परंतु पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.11 :- टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या फेऱ्यांचा धनाकर्षाद्वारे संकलीत केलेला महसूल रु. 251600/- बाबत...

पाणी पुरवठा विभागांतर्गत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या केंद्राचे 2016-17 वर्षाचे एप्रिल-जुलै-ऑक्टोबर-जानेवारी-2017 या महिन्यांचे वसूलीच्या अभिलेखाची तपासणी केली असता, खालील अनियमीतता आढळून आली.

दि. 11/01/2017 रोजी धनाकर्षाद्वारे रक्कम रु. 251600/- विभागाकडे प्राप्त झाली असून त्याचा धनाकर्ष निहाय तपशिल खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | पावतीचा क्र. | धनाकर्ष क्र. | बँकेचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 168647 | 271089 | UCO बँक | 39100/- |
| 2. | 168648 | 001287 | बँक ऑफ इंडिया | 51000/- |
| 3. | 168649 | 015442 | ICICI बँक | 17000/- |
| 4. | 168650 | 015443 | ICICI बँक | 17000/- |
| 5. | 168651 | 015449 | ICICI बँक | 17000/- |
| 6. | 168652 | 015444 | ICICI बँक | 17000/- |
| 7. | 168653 | 015445 | ICICI बँक | 17000/- |
| 8. | 168654 | 015446 | ICICI बँक | 17000/- |
| 9. | 168655 | 015447 | ICICI बँक | 17000/- |
| 10. | 168656 | 015448 | ICICI बँक | 17000/- |
| 11. | 168657 | 001289 | बँक ऑफ इंडिया | 25500/- |
| | | | एकुण | 251600/- |

सदर रकमेचा लेखा विभागाने ठेवलेल्या रोखडवही नमूना-11 बरोबर ताळमेळ घेतला असता, उपरोक्त नमुद 11 धनाकर्षांची एकूण रक्कम रु. 251600/- ची नोंद रोकडवहीमध्ये घेतल्याचे माहे जाने-2017 अखेरपर्यंत आढळून आले नाही.

सदर रकमेच्या नोंदीची खातरजमा करुन बँक विवरणपत्रामध्ये सदर रक्कम जमा झालेल्या नोंदीच्या तपशीलासह अनुपालन अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 140, दि. 11/02/2020 अन्वये कळविणेत आले आहे. तथापि सदरची पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.12 :- पाणी पुरवठा विभागामधील जमा रकमांची बँक विरणावरुन पडताळणी - 2016-17.

पाणी पुरवठा विभागातील सन 2016-17 या वर्षातील निवडक महिन्यांच्या जमा रकमांची बँक विवरणावरुन पडताळणी केली असता, अभिप्राय खालील प्रमाणे.

प्राप्त धनादेशांच्या रकमांच्या बँक विवरणामध्ये जमा नोंदी बँक विवरणामध्ये अढळ झाल्या नाहीत, त्याचा तपशील.

| अ.क्र. | दिनांक | धनादेश क्रमांक/दिनांक | बँकेचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 12/04/2016 | 00001/31/03/2016 | एच.डी.एफ.सी. | 1445/- |
| 2. | 12/04/2016 | 15/31/03/2016 | एच.डी.एफ.सी. | 3089/- |
| 3. | 12/04/2016 | 290215/01/04/2016 | शामराव विठ्ठल सह.बँक | 17360/- |
| 4. | 12/04/2016 | 12/6921/04/04/2016 | ग्रेटर बँक | 51445/- |
| 5. | 27/04/2016 | 48217/10/04/2016 | युनियन बँक | 19822/- |
| 6. | 26/07/2016 | 903718/26/07/2016 | द. ठाणे बँक | 4463/- |
| 7. | 03/10/2016 | 947/03/10/2016 | एच.डी.एफ.सी. | 4363/- |
| 8. | 03/10/2016 | 969/03/10/2016 | एच.डी.एफ.सी. | 873/- |
| 9. | 04/10/2016 | 570691/04/10/2016 | रिझर्व बँक ऑफ इंडिया | 133949/- |
| 10. | 04/10/2016 | 000411/04/10/2016 | एच.डी.एफ.सी. | 3397/- |
| 11. | 05/10/2016 | 832945/05/10/2016 | ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक | 1245/- |
| 12. | 14/10/2016 | 00829/04/10/2016 | बँक ऑफ बडोदा | 32043/- |
| 13. | 17/10/2016 | 18549/17/10/2016 | भारत सह. बँक, दहिसर | 5478/- |
| 14. | 27/10/2016 | 742265/27/10/2016 | स्टेट बँक, भाईंदर | 542/- |
| 15. | 14/10/2016 | 19222/14/10/2016 | बँक ऑफ महाराष्ट्र | 16132/- |
| 16. | 11/04/2016 | 100001/11/04/2016 | कॅथलिक सह. बँक | 10918/- |
| 17. | 26/10/2016 | 357/22/10/2016 | युनियन बँक, मिरारोड | 33969/- |
| 18. | 28/10/2016 | 96941/08/08/2016 | शामराव विठ्ठल सह.बँक | 2486/- |
| 19. | 28/10/2016 | 96942/08/08/2016 | शामराव विठ्ठल सह.बँक | 844/- |
| 20. | 28/10/2016 | 313367/26/10/2016 | बँक ऑफ महाराष्ट्र, बोरीवली | 4265/- |
| 21. | 28/10/2016 | 100370/20/10/2016 | वसई जनहा सह. बँक | 23570/- |
| 22. | 28/10/2016 | 916037/15/10/2016 | ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक | 25486/- |
| 23. | 05/01/2017 | 106186/05/01/2017 | स्टेट बँक, भाईंदर | 5000/- |
| 24. | 05/01/2017 | 000134/04/01/2017 | एच.डी.एफ.सी. | 10260/- |
| 25. | 06/01/2017 | 100134/06/01/2017 | कॅथलिक सह. बँक | 2168/- |
| 26. | 12/01/2017 | 133601/12/01/2017 | न्यु इंडिया सह. बँक ठाणे | 17112/- |
| | | | एकुण | 4,31,724/- |

सन 2016-17 मध्ये निवडक महिन्यांच्या प्राप्त धनादेशांचा बँक विवरण पत्रावरुन पडताळणी केली असता, उपरोक्त विवरणामध्ये नमुद केलेले धनादेश रक्कम रु. 4,31,724/- च्या जमा नोंदी अढळ होत नाहीत. सदरचे प्राप्त धनादेशांची रक्कम महानगरपालिका खात्यामध्ये जमा झाली किंवा कसे? याचा जमा दिनांकाच्या तपशिलासह अनुपालन सादर करणेबाबत तसेच प्राप्त धनादेश नोंदवहीमध्ये धनादेश प्राप्त दिनांकासह बँकेत जमा नोंद दिनांक नमूद करुन आणि दरमहा बँक खात्यामधील जमा नोंदींची प्राप्त धनादेशांशी ताळमेळ घेण्यात येवून तसा पुर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 131, दि. 22/01/2020 अन्वये कळविले आहे. परंतु सदर प्रमाणे कार्यवाही केलेबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.13 :- महानगरपालिकेद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या खाजगी टँकर ठेकेदाराने टँकरच्या प्रत्यक्ष फेऱ्यापेक्षा जास्त फेऱ्यांची देयके सादर केल्याबाबत...

संदर्भ :- स्थायी समिती प्रकरण क्र. 27, सभा मंजूरी दि. 29/06/2016.

1) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये, जलवाहिनी नसलेल्या इमारती, जलवाहिनीच्या अंतिम टप्प्यातील कमी दाबाने पाणीपुरवठा होणाऱ्या इमारती व खाजगी वापरासाठी पाणी मागणाऱ्या नागरिकांना, त्यांच्या खर्चाने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची योजना महानगरपालिका राबवित असून, त्यानुसार खाजगी ठेकेदार, मे. सागर वॉटर सप्लायर्स यांची, स्थायी समितीच्या दि. 29/06/2016 रोजीच्या प्रकरण 27 अन्वये नेमणूक करण्यात आली आहे. सदर ठेक्याच्या शर्ती व अटीनुसार, नागरिकाकडून टँकरच्या प्रती फेऱ्यासाठी पाणी आकार रु. 164/- अधिक टँकर वाहतूक भाडे रु. 666/- अशी एकूण रक्कम रु. 850/- प्रती टँकर फेऱ्यासाठी, आगावू वसूली केली जाते व उर्वरित रु. 666/- ठेकेदारास त्यांनी केलेल्या टँकरच्या फेऱ्याच्या देयकानुसार अदा केली जाते.

2) या संदर्भात पाणी पुरवठा विभागाने वर्ष-2016-17 मध्ये टँकरद्वारे सशुल्क पुरवठा केलेल्या फेऱ्यांच्या महसूलाचे व त्यासमोर त्याच कालावधीमध्ये संबंधित ठेकेदारास टँकर पुरवठ्याबाबत केलेल्या अधिदानाचे, जानेवारी ते मार्च-2017 या कालावधीचे तुलनात्मक अवलोकन केले असता, ठेकेदाराने प्रत्यक्ष फेऱ्यापेक्षा जास्त फेऱ्याची देयके सादर केल्याचे आढळून आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

<u>टँकर वितरण फेरे</u>

जानेवारी-2017

| अ. क्र. | दिनांक | पावत्यांचे फेरे | पोटकिर्द वसूल | ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे | अधिदान करताना दाखविलेली वसूली | ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर | ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | 01-01-2017 | 46 | 39100 | 18 | 15300 | | |
| | | 2 | 250 | 0 | 0 | | |
| 2 | 02-01-2017 | 57 | 48450 | 235 | 199750 | | |
| 3 | 03-01-2017 | 306.41 | 260448.5 | 218 | 185300 | | |
| 4 | 04-01-2017 | 306 | 260100 | 231 | 196350 | | |
| 5 | 05-01-2017 | 159 | 135150 | 247 | 209950 | | |
| 6 | 06-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 7 | 07-01-2017 | 211.53 | 179800.5 | 263 | 223550 | | |
| 8 | 08-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 9 | 09-01-2017 | 291 | 247350 | 244 | 207400 | | |
| 10 | 10-01-2017 | 146 | 124100 | 220 | 187000 | | |
| 11 | 11-01-2017 | 313 | 266050 | 237 | 201450 | | |

| अ. क्र. | दिनांक | पावत्यांचे फेरे | पोटकिर्द वसूल | ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे | अधिदान करताना दाखविलेली वसूली | ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर | ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 12 | 12-01-2017 | 120 | 102000 | 250 | 212500 | | |
| 13 | 13-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 14 | 14-01-2017 | 200 | 170000 | 258 | 219300 | | |
| 15 | 15-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 16 | 16-01-2017 | 157 | 133450 | 242 | 205700 | | |
| 17 | 17-01-2017 | 284 | 241400 | 225 | 191250 | | |
| 18 | 18-01-2017 | 272 | 231200 | 230 | 195500 | | |
| 19 | 19-01-2017 | 157 | 133450 | 235 | 199750 | | |
| 20 | 20-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 21 | 21-01-2017 | 172 | 146200 | 251 | 213750 | | |
| 22 | 22-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 23 | 23-01-2017 | 504 | 428400 | 241 | 204850 | | |
| 24 | 24-01-2017 | 255 | 216750 | 227 | 192950 | | |
| 25 | 25-01-2017 | 200 | 170000 | 236 | 200600 | | |
| 26 | 26-01-2017 | 55 | 46750 | 227 | 192950 | | |
| 27 | 27-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 28 | 28-01-2017 | 218 | 185300 | 242 | 205700 | | |
| 29 | 29-01-2017 | | | 0 | 0 | | |
| 30 | 30-01-2017 | 399 | 339150 | 221 | 187850 | | |
| 31 | 31-01-2017 | 343.53 | 292000.5 | 223 | 189550 | | |
| | TOTAL | 5174.47 | 4396849.5 | 5221 | 4438250 | 47 | 31302 |

## फेब्रुवारी-2017

| अ. क्र. | दिनांक | पावत्यांचे फेरे | पोटकिर्द वसूल (3x4=5) | ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे | अधिदान करताना दाखविलेली वसूली | ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर | ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | 01-02-2017 | 314 | 266900 | 230 | 195500 | | |
| 2 | 02-02-2017 | 17 | 14450 | 234 | 198900 | | |
| 3 | 03-02-2017 | | 0 | 0 | 0 | | |
| 4 | 04-02-2017 | 230 | 195500 | 255 | 216750 | | |
| 5 | 05-02-2017 | | 0 | 0 | 0 | | |
| 6 | 06-02-2017 | 166 | 141100 | 242 | 205700 | | |
| 7 | 07-02-2017 | 243 | 206550 | 234 | 198900 | | |
| 8 | 08-02-2017 | 157 | 133450 | 235 | 199750 | | |
| 9 | 09-02-2017 | 101 | 85850 | 241 | 204850 | | |
| 10 | 10-02-2017 | | 0 | 0 | 0 | | |
| 11 | 11-02-2017 | 283 | 240550 | 256 | 217600 | | |
| 12 | 12-02-2017 | | 0 | 0 | 0 | | |

| अ. क्र. | दिनांक | पावत्यांचे फेरे | पोटकिर्द वसूल (3x4=5) | ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे | अधिदान करताना दाखविलेली वसूली | ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर | ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 13 | 13-02-2017 | 290 | 246500 | 210 | 178500 | | |
| 14 | 14-02-2017 | 230 | 195500 | 234 | 198900 | | |
| 15 | 15-02-2017 | 334 | 283900 | 245 | 208250 | | |
| 16 | 16-02-2017 | 128 | 108800 | 258 | 219300 | | |
| 17 | 17-02-2017 | | 0 | 0 | 0 | | |
| 18 | 18-02-2017 | 211 | 179350 | 208 | 176800 | | |
| 19 | 19-02-2017 | | 0 | 2 | 1700 | | |
| 20 | 20-02-2017 | 199 | 169150 | 276 | 234600 | | |
| 21 | 21-02-2017 | 138 | 117300 | 240 | 204000 | | |
| 22 | 22-02-2017 | 229.41 | 194998.5 | 244 | 207400 | | |
| 23 | 23-02-2017 | 386 | 328100 | 255 | 216750 | | |
| 24 | 24-02-2017 | | 0 | 0 | 0 | | |
| 25 | 25-02-2017 | 51 | 43350 | 259 | 220150 | | |
| 26 | 26-02-2017 | | 0 | 0 | 0 | | |
| 27 | 27-02-2017 | 341.53 | 290300.5 | 248 | 210800 | | |
| 28 | 28-02-2017 | 156 | 132600 | 235 | 199750 | | |
| | TOTAL | 4204.94 | 3574199 | 4841 | 4114850 | 637 | 424242 |

मार्च-2017

| अ. क्र. | दिनांक | पावत्यांचे फेरे | पोटकिर्द वसूल (3x4=5) | ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे | अधिदान करताना दाखविलेली वसूली | ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर | ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | 01-03-2017 | 477 | 405450 | 226 | 183600 | | |
| 2 | 02-03-2017 | 319 | 271150 | 269 | 228650 | | |
| 3 | 03-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 4 | 04-03-2017 | 293.22 | 249235 | 266 | 226100 | | |
| 5 | 05-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 6 | 06-03-2017 | 401.22 | 341035 | 264 | 224400 | | |
| 7 | 07-03-2017 | 335.22 | 284935 | 236 | 200600 | | |
| 8 | 08-03-2017 | 222.22 | 188885 | 233 | 198050 | | |
| 9 | 09-03-2017 | 275.22 | 233935 | 255 | 216750 | | |
| 10 | 10-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 11 | 11-03-2017 | 132.22 | 112385 | 260 | 221000 | | |
| 12 | 12-03-2017 | 29.21 | 24835 | 235 | 199750 | | |
| 13 | 13-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 14 | 14-03-2017 | 158.21 | 134485 | 247 | 209950 | | |
| 15 | 15-03-2017 | 215 | 182750 | 236 | 200600 | | |
| 16 | 16-03-2017 | 290.22 | 246685 | 245 | 208250 | | |

| अ. क्र. | दिनांक | पावत्यांचे फेरे | पोटकिर्द वसूल (3x4=5) | ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे | अधिदान करताना दाखविलेली वसूली | ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर | ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 17 | 17-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 18 | 18-03-2017 | 354.22 | 301085 | 262 | 222700 | | |
| 19 | 19-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 20 | 20-03-2017 | 150 | 127500 | 252 | 214200 | | |
| 21 | 21-03-2017 | 316.03 | 268623 | 242 | 205700 | | |
| 22 | 22-03-2017 | 138.27 | 117535 | 239 | 203150 | | |
| 23 | 23-03-2017 | 89.22 | 75835 | 251 | 213350 | | |
| 24 | 24-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 25 | 25-03-2017 | 313.22 | 266235 | 271 | 230350 | | |
| 26 | 26-03-2017 | 0 | 0 | 0 | 0 | | |
| 27 | 27-03-2017 | 181.22 | 154035 | 260 | 221000 | | |
| 28 | 28-03-2017 | 35.85 | 29935 | 239 | 203150 | | |
| 29 | 29-03-2017 | 359.29 | 305393 | 253 | 215050 | | |
| 30 | 30-03-2017 | 326.22 | 277285 | 264 | 224400 | | |
| 31 | 31-03-2017 | 0 | 850 | 0 | | | |
| | TOTAL | 5411.5 | 4600076 | 5505 | 4670750 | 94 | 62604 |

उपरोक्त तपशिलाबाबत स्पष्ट होते की, ठेकेदाराने सादर केलेल्या देयकाच्या आधारे, विभागाने अधिदान केले असल्याने, प्रत्यक्ष फेरे व ठेकेदाराने त्याच्या देयकामध्ये दर्शविलेले फेरे, यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत का येते, याची पडताळणी करुन योग्य ती कार्यवाही करणेकामी विभागास, दि. 09/03/2020 रोजीच्या अर्धसमास क्र. 148 अन्वये कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.14 :- पाणी पुरवठा विभागाने वर्ष 2016-17 वर्षामध्ये संकलित केलेला पाणीपट्टी महसूल व लेखाविभागाने वार्षिक जमाखर्चामध्ये दर्शविलेला प्रत्यक्ष महसूल यामध्ये तफावत असल्याबाबत.

पाणी पुरवठा विभागाच्या वर्ष 2016-17 च्या एकत्रित पोटकिर्द मधील नोंदीनुसार, वर्ष 2016-17 चा पाणी पट्टीचा महसूल, (पाणीपट्टी + उपकर) रु. 4322.26 लाख इतका दर्शविण्यात आला आहे. तथापी, लेखा विभागाने, वर्ष 2016-17 करिताच्या जमाखर्चामध्ये, सदर महसूल रु. 4500.49 लाख असा दर्शविला असून, दोन्ही रकमामध्ये रु. 178.23 लाख इतका फरक असल्याचे दिसून येते.

सबब, सदर फरक रकमेचा ताळमेळ घेऊन याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करणेकामी अ.स.क्र. 137, दि. 29/01/2020 अन्वये विभागास कळविले असून, विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.15 :- महापालिकेच्या विविध पाणीटाकी हाऊसना वाणिज्यिक दराने वीज आकारणी असल्याबाबत...

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केस नं.34/2016 मध्ये दिलेल्या आदेशनुसार मे. रिलायन्स इन्फ्रा.लि., यांच्या विद्युत दरामध्ये दि. 01/10/2016 पासुन सुधारणा करण्याचे आदेशित केले. त्यानुसार, स्थानिक स्वराज्य संस्था,सार्वजनिक पाणीपुरवठा करण्यासाठी 13 पंपिग स्टेशन व 10 मलनिस्:रण केंद्राकरीता वापरत असलेल्या वीजेची आकारणी LT IV, सार्वजनिक पाणीपुरवठा, या शिर्षाखाली नमुद केलेल्या दराने देयके तयार करणे अनिर्वाय होते.

तथापि, खाली नमुद केलेल्या पाणी टाकी हाऊसच्या जोडणीची वाणिज्य दराने वीज आकरणी केली जात आहे.

| अ.क्र | पाणीटाकीचे नाव | ग्राहक /खाते क्रमांक | विद्युत आकारणी |
|---|---|---|---|
| 1 | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग | 151218958 | LT II A कमर्शियल |
| 2 | उत्तन पाणी टाकी | 151219399 | LT II A कमर्शियल |
| 3 | दहीसर चेक नाका | 151212979 | LT II A कमर्शियल |
| 4 | सुभाषचंद्र बोस मैदान | 151177453 | LT II A कमर्शियल |

वाणिज्यिक दर हे सार्वजनिक पाणी पुरवठा या शिर्षाखालील दरापेक्षा तुलनेने जास्त आहेत. महानगरपालिका सार्वजनिक सेवा देत असल्याने पाण्याच्या टाकीस दिलेल्या जोडणीची विद्युत दर आकारणी सार्वजनिक पाणीपुरवठा LT IV या शिर्षाखालील दराने करणे उचित होईल, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सबब, योग्य विद्युत दराने विद्युत पुरवठा करणे कामी सदर विद्युत वितरकाकडे पाठपुरावा करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 108 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.16 :- विद्युत देयकांचे अधिदान विलंबाने होत असल्याने विलंब आकार देय होत असल्याबाबत...

1) वर्ष 2016-17 मधील आपल्या विभागाशी संबंधीत काही विद्युत देयकांचे चाचणी लेखापरीक्षण केले असता असे आढळुन आले कि, विद्युत देयकांचे अधिदान देय दिनांकापुर्वी न केल्याने मोठया प्रमाणात विलंब आकाराचे अधिदान करावे लागत आहे, त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| पंपिग स्टेशन | बिल दिनांक | देय दिनांक | देयक अधिदान दिनांक | विलंब आकार |
|---|---|---|---|---|
| कापुर बावडी | 5/08/2016 | 19/08/2016 | 9/09/2016 | 15741 |
| शांती नगर | 6/08/2016 | 19/08/2016 | 9/09/2016 | 11625 |
| कनकिया | 8/08/2016 | 23/08/2016 | 29/05/2016 | 11895 |
| एकुण | | | | 39261 |

उपरोक्त बाबी या नमुना दाखल नमुद केल्या असुन अन्य देयकाबाबत सुध्दा अशाच प्रकारे विलंब आकाराची आकारणी करण्यात आलेली आहे.

2) या संदर्भात असे नमुद करावेसे वाटते कि, सर्व विद्युत देयके तयार झाल्यानंतर विद्युत वितरकांच्या संकेत स्थळावर देयके उपलब्ध होत असल्याने, विद्युत देयके वितरकाकडुन प्राप्त होण्याची वाट न बघता संकेत स्थळावरुन देयके डाऊनलोड केल्यास, विहित कालावधीमध्ये देयकांचे अधिदान करता येईल. एवढेच नव्हे तर देय दिनांकापुर्वी अधिदान केल्यास वितरकाने देवु केलेली सवलत सुध्दा घेता येईल.

उपरोक्त बाबीसंबंधी योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास सादर करणेबाबत दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 106 अन्वये विभागास कळविले असून, याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सबब वेळेत प्रदान न केल्यामुळे मनपा निधीतील रक्कम रु. 39261/- अतिप्रदान झालेले आहे.

परिच्छेद क्र. 11.17 :- विद्युत वापरामध्ये असाधारण वाढ झाल्याबाबत...

वर्ष 2016-17 मधील विद्युत देयकांचे चाचणी लेखापरीक्षण करताना, असे निदर्शनास आले कि, STP zone iv पंपिग स्टेशनच्या Account no 151823261 नोव्हे. 2015 ते एप्रि ल 2016 या कालावधीच्या मासिक विद्युत वापर कमीत कमी 672 युनिट तर जास्तीत जास्त 973 युनिट असा होता. तथापि माहे मे 2016 ते सप्टे 2016 कालावधीमध्ये सदर पंपिग स्टेशनचा मासिक विद्युत वापर कमीत कमी 6096 युनिट तर जास्तीत जास्त 43734 युनिट असा असल्याचे विद्युत देयकावरील नोंदी नुसार दिसुन येते. तुलनात्मक दृष्टया मे 2016 ते सप्टे.2016 या कालावधीचा विद्युत वापर अत्यंत असाधारण दिसुन येत असल्याने सदर वापराची खातरजमा करुन याबाबत अभिप्राय देण्यास दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 106 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.18 :- विद्युत मापके दिर्घ काळापासुन बंद असल्याबाबत...

1) वर्ष 2016-17 कालावधीमधील काही चाचणी प्रकरणामध्ये विद्युत देयकांचे अवलोकन केले असता खाली नमुद केलेली विद्युत मापक दीर्घ काळापासुन बंद असल्याचे आढळुन आले आहे.

| अ.क्र | ग्राहक खाते क्रमांक | विद्युत कंपनीचा शेरा | बंद दिनांक/महिना |
|---|---|---|---|
| 1. | 102689284 | Meter showing no consumption | एप्रिल 2016 |
| 2. | 102689059 | Meter showing no consumption | एप्रिल 2016 |
| 3. | 152144043 | Meter showing no consumption | मे 2016 |
| 4. | 151759582 | Meter showing no consumption | मे 2016 |
| 5. | 151759525 | Meter showing no consumption | नमुद नाही |

2) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने प्रसृत केलेल्या विद्युत पुरवठा संहिता (SUPPLY CODE) मधील संहिता क्र. 14.4 नुसार वितरण परवानाधारक सर्व ग्राहकांच्या विद्युत मापकांच्या देखभालीस जबाबदार असल्याने बंद मापकाची तपासणी विद्युत वितरकाकडुन त्वरीत घेण्याची व्यवस्था करावी.

3) मीटरमध्ये नोदी होणे थांबले असल्यास ज्या महीन्यात नोंदी होणे थांबले असेल त्याच्या मागील जास्तीत जास्त 3 महीन्या पर्यंत, ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येणार आहे. त्या महिन्या मागील 12 महिन्यात मीटरवर नोंदवीलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारीत ग्राहकाचे देयक तयार करण्याची तरतुद संहिता 15 (4) मध्ये असल्याने 3 महीन्यापेक्षा जास्त कालावधी करीता सरासरी वापरावर देण्यात आलेली देयके सदर तरतुदीनुसार अग्राहय होत असल्याने उपरोक्त प्रकरणाचा पाठपुरावा विद्युत वितरकाकडे करुन अशा देयकामधील रक्कमांचा परतावा/समायोजन मागणी वितरकाकडे करुन याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करणेबाबत दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्रमांक अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

| अ | एकूण | 119 | ब | एकूण | 771 |
| | एकूण अ+ब= 890 | | | | |

उपरोक्त आक्षेपीत मुद्या बाबत विभागात अर्धसमास ज्ञापन क्र 214 दि. 26-08-2021 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याचे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

# क्रिडा विभाग

## सन 2016-17

परिच्छेद क्र. 16.1 :- 2016-17 या अर्थिक वर्षाचे अभिलेख लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत...

आपल्या विभागाचे 2016-17 या वर्षाचे संपूर्ण अभिलेख लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. याबाबत अर्धसमास ज्ञापनाद्वारे क्रिडा विभागास कळविण्यात आले होते. तथापी, सदरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

# शिक्षण विभाग

**परिच्छेद क्र. 17.1:- वेतन अनुदान नोंद वही बाबत...**

मिरा भाईदर महानगर पालिकेच्या शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक प्रवर्गाच्या वेतनासाठी 50% अनुदान रक्कम शासनाकडुन 50% अनुदान रक्कम महानगरपालिकेमार्फत वितरीत केली जाते

वित्त वर्ष 2016-17 हया आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणात शासना कडुन वेतनाकरीता रक्कम रु.7,75,62040/- इतके अनुदान प्राप्त झालेले आहे. या बाबत खालील अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62,315,317,450 अन्वये नमुना नंबर 26 मध्ये अनुदान नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याने प्राप्त झालेली अनुदानातील रक्कम ही 50% वेतन अनुदानाची असल्याबाबत व सदर रक्कम वित्त वर्ष 2016-17 हया आर्थिक वर्षाच्या मागणी प्रमाणेच असल्याची पडताळणी करता आलेली नाही

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 317 अन्वये अनुदान मंजूरी आदेश / वित्त् प्रेषण आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नसल्याने अनुदान जमा रक्कम व मंजूरी आदेश (वित्त् प्रेषण) प्रमाणे मंजूरी रक्कम हया बाबत ताळमेळ घेता आलेला नाही.

**परिच्छेद क्र. 17.2, भाविष्य निर्वाह निधी अभिलेख मधिल अनियमित्ता**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण खात्याच्या शिक्षक प्रवर्गाच्या भविष्य निधी लेख्यासाठी महाराष्ट्र सर्वसामान्य भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 6(1) अन्वये वर्गणीदाराचे लेखे प्रत्येक वर्गणी दाराच्या नावे खाते उघडुन नियम 12 प्रमाणे त्यावरील व्याज रक्कमेची परिगणना करुन लेजर अकांऊट प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर लेखे परिपूर्ण करणे आवश्यक असताना बहुतांश लेख्यांची परिपूरण नोंदी घेतलेल्या नाहीत त्यामुळे व्याजाची परिगणना जमा रक्कम हया बाबत पडताळणी करता आलेली नाही.

2. अभिलेखे परिपूर्ण करण्यासंदर्भात महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466(5) परिशिष्ट - 5 अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि यानुसार कार्यवाही करण्यांत येत नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

3. बृहत पत्राप्रमाणे एकूण 31 मार्च 2017 अखेर जमा/खर्चाचा लेखा अदयावत करण्यांत आलेला नाही. त्यामुळे बँक खाते आणि रोखवहीप्रमाणे 31 मार्च 2017 अखेर जमा/खर्च रकमांचा ताळमेळ घेता आलेला नाही. सबब बृहत पत्राप्रमाणे अखेरीची शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक रक्कमेत किती रक्कमेची तफावत आहे. या बाबतची खातरजमा लेखापरीक्षणात करता आली नाही.

उपरोक्ता नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येवून पूर्तता अहवाल सादर करण्यांत यावा.

**परिच्छेद क्र. 17.3:- भविष्य निर्वाह निधी वर्गणी दाराला वार्षिक हिशोबाचे विवरण पत्रक देणे बाबतची अनियमितता**

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील (1) नियम 36(1) नुसार प्रत्येक वर्षाच्या 31 मार्च अखेरीस प्रत्येक भविष्य निर्वाह निधीच्या खातेदारास त्याच्या निधीचे लेख्याचे विवरण पत्र देणे बंधनकारक आहें. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466(5) परिशिष्ट 5 ख प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहें तथपि अशी कार्यवाही मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या शिक्षण विभागाकडुन अंमलात आणली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

2. भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 36(1) प्रमाणे खातेदारास भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र दिलेले नाही. नियम 1998/36 (2) मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र प्राप्ता झाल्यापासून तीन महिन्यात विसंगतीबाबत खातेदाराने कळविणेचे आहे. मात्र भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र न दिल्यामुळे कर्मचा-यांना त्यांनी वर्षभरात भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा केलेली व प्रत्यक्ष लेख्यामध्ये दर्शविलेल्या जमा/खर्च रकमांचा ताळमेळ घेणे शक्य झालेले नाही.

तरी सर्व शिक्षण प्रवर्गाचे भविष्य निर्वाह निधिचे लेखे(लेजर अकाऊंट) पूर्ण करुन व्याजाची रक्कम परिगणित करुन पूर्तता दर्शवावी. तसेच सर्व कर्मचा-यांना प्रति वर्षी मार्च अखेरचे विवरणपत्र 31 मे पूर्वी देण्यांत येईल याची दक्षता घेण्यांत यावी.

**परिच्छेद क्र. 17.4:- थकीत शाळा गृह भाडे बाबत...**

शासन परिपत्रक क्र. प्रा.शा.भा.मंत्रालय दि. 21/01/2001 नुसार मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1947 मधील नियम 15 (अ) (3) अन्वये नगरपालिका शिक्षण मंडळाने प्राथमिक शिक्षणाकरीता भाडयाने घेतलेल्या इमारतीचे भाडे पोटी 50% अनुदान रक्कम अनुज्ञेय आहे. त्यानुसार सदर भाडे रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थाना देय आहे.

कार्यकारी अभियंता सार्व. बांधकाम विभाग ठाणे यांचे प्रमाणपत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील 17 म. न.पा. शाळेच्या इमारतीचे भाडे 50% अनुदान रक्कमप्रमाणे 19,34,136/- शाळा गृह भाडयांस शासना कडुन मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार शि.उ.स/प्राथ/प्रशिम/ अनु/08-09/42336/43 दि. 14/11/2006 अन्वये 1993-94 ते 1997-98 पर्यंतच्या 5 वर्ष कालावधी करिता इमारत भाडे 50% अनुदान रक्कमप्रमाणे 87,91,380/- इतकी रक्कम भाडे पोटी प्राप्त झालेली आहे. तसेच 1998-99 ते 03/04 पर्यंत 50% अनुदान रक्कम प्रमाणे 1,05,49,956/- भाडे रक्कम शासनाकडुन प्राप्त झालेली आहे.

वित्त वर्ष 2004-05 ते 2015-16 हया 13 वर्षाचे शाळागृह भाडे रक्कम 50% प्रमाणे 2,28,57,288 /- इतकी रक्कम शाळागृह भाडे पोटी थकीत आहे. तरी सदर थकीतभाडे रक्कम शासनाकडुन मागणी करुन पूर्तता दर्शवावी

मागणी क्र. ई. - 2 लेखाशिर्षा 22002 सर्व साधारण शिक्षण

01 प्राथमिक शिक्षण

103 प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थाता अर्थसहाय्य्

03 इतर स्थानिक संस्थाना अनुदाने

(2202028) 31

शासनाकडून थकित भाडे अनुदान रक्कम - 2,28,57,288/-

मत्ता - 2,28,57288

**आक्षेप क्र. 17.5:- सेवा पुस्तक नोदी व दुय्यम सेवा पुस्तक बाबत**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 36 अन्वये सेवा पुस्तक अभिलेख अदयावत ठेवण्यात येवून सदर सेवा पुस्तकांची दुय्यम प्रत कर्मचा-यास घ्यावी अशी तरतुद आहे. तथापि शिक्षक प्रवर्गाची सेवा पुस्तके अभिलेख अदयावत नसल्याचे व त्यांना सेवा पुस्तकांची दुय्यम प्रत दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 चे नियम 25 ते 49 मधील तरतूदीचे काटेकोर पालन करुन पूर्तता दर्शवावी

## परिच्छेद क्र. 17.6:- आयकर रक्कम शासन भरणा बाबतचे चलन लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्या बाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागातील 181 शिक्षक पदाच्या प्रवर्गाच्या माहे फ्रेबु. 2017 अदा माहे. मार्च 2017 च्या वेतनातुन आयकर कायदा 1961 मधील TDS संदर्भित तरतुद कलम 192 नुसार वेतनातून कपात केलेली आयकर रक्कम 72,80241/- धनादेश क्र. 722006 दि. 08-03-2017 नुसार SBI खाती वटलेला असल्याचे बँक पासबुक नुसार दिसून येते. तथापि हया बाबतचे चलन लेखापरिक्षणास पडताळणी साठी उपलब्ध झालेले नाही. तसेच सदरची रक्कम कोषागार कार्यालयाने महालेखाकार कार्यालयाकडे लेखे सादर करतांना आयकर विभागाच्या जमेच्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत आली असल्याबाबत कोषागार ताळमेळ घेण्यांत आलेला नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे. यामुळे आयकराची रक्कम शासनाच्या लेख्यामध्ये प्रत्यक्ष जमा झाली किंवा कसे? हया बाबतची खातरजमा करता आली नाही. सदर प्रकरणी अर्थसमास पत्र क्र. 179 दिनांक 09-02-2021 नुसार खुलासा मागण्यात येवूनदेखील हया बाबतची माहिती लेखापरिक्षणास अवगत करण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र. 17.7:- जादा प्रदान वेतनाबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागातील शिक्षक हया पदावरील कार्यरत शिक्षकांचे माहे. मे. 2016 (प्रत्यक्ष वेतन अदा जुन 2016) करिता 864000/- रु. रक्कमेचे देय्यक पारित केलेले आहे. त्या बाबतची अनियमियता खालील प्रमाणे आहे.

1. शिक्षण विभागातील शिक्षण प्रवर्ग दिर्घ सुट्टी रजा नियम म.ना.से (रजा) नियम 1981 अन्वये दिर्घ सुट्टी हया प्रकारात समावेश होतो .मे. माहिन्यात पूर्णत: शाळा 31 दिवस बंद असल्याने शिक्षक या प्रवर्गाच्या पदाला माहे. मे महिन्याच्या वेतनात प्रवास भत्ता रक्कम शाळा बंद असल्याने देय नसतो असे असताना त्यांना नियमाबाहय पणे वेतनात प्रवास भत्ता रक्कम रु. 86,400/- अदा केलेली आहे. सदरची रक्कम लेखापरिक्षणांस मान्य करता येत नाही.

2. 86,400 /- वेतन रक्कम पैकी 50% रक्कम शासन अनुदान व 50% रक्कम महानगर पालिका अनुदान नुसार अनुक्रमे 43,200/- शासन अनुदान सदर रक्कम कायम स्वरुपी असामान्य करण्यात येत असून सदर रक्कम संबधितांनाकडुन वसुल करुन शासन जमा करुन पूर्तता दर्शवावी.

3. 86,400 /- वेतन रक्कम पैकी 50% अनुदान रक्कम महानगरपालिका खर्च रक्कम 43200/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत असून सदर रक्कम संबधिताकडुन महानगरपालिकेच्या निधीत जमा करुन पूर्तता दर्शवावी.

एकुण वसुल पात्र रक्कम (43200+43200)86400/-

**परिच्छेद क्र.17.8:- जादा अनुदान रक्कम जमा बाबत..**

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाच्या शिक्षक हया प्रवर्गाच्या कार्यरत पदाच्या वेतनापोटी अनुदान व सेवा निवृत्ती वेतन अनुदान / कुटुंब निवृत्ती वेतन अनुदान करिता 50% रक्कम वेतन अनुदान रक्कम शासनाकडुन मागणीनुसार देय आहे. त्यानुसार 2016-17 करिता खालील प्रमाणे वेतनाच्या 50% अनुदान रक्कम मागणी केलेली आहे.

वर्ष 2016-17 मागणी अनुदान रक्कम

1. मंजूर पदानिहाय कार्यरत पदांच्या वेतना करिता 50% वेतन अनुदान रक्कम 59,32,359/-

2. सेवा निवृत्ती वेतन कुंटूंब निवृत्ती वेतनाकरिता 50% वेतन अनुदान रक्कम 1,58,03,837/-

अशी एकूण 7,51,26,896/- इतकी रक्कम 50% वेतन अनुदानकरिता मागणी केलेली आहे. तथापि वित्त वर्ष 2016-17 करिता शासनाकडुन 7,75,62,040/- इतकी रक्कम वेतन अनुदान म्हणुन प्राप्त झालेली आहे. त्यानुसार जादा प्राप्त अनुदान रक्कम 24,36,144/- बाबत खुलासा करावा अन्यथा सदर रक्कम शासन जमा करुन पूर्तता दर्शवावी. 2016-17 या वर्षात शासनाकडून प्राप्ता झालेल्या अनुदानाचे मार्च,2017 अखेर प्रत्यक्ष खर्चाचे तपशिलासह उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. तथापि सदरचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

परिच्छेद क्र.17.9, ताळमेळ बाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील वेतन अनुदान कॅश बुक नोंद नुसार दि. 31/03/2017 अखेर 27,25,359/- इतकी रक्कम शिल्लक दिसून येते व दि. 31/03/2017 अखेर बँक पास बुक नुसार 50,32,012/- इतकी रक्कम शिल्लक दिसून येते.प्रत्यक्ष फरक रक्कम रु. 23,09,653/- इतकी जादा रक्कम बँक खाती दिसून येते तथापि 31/03/2017 अखेरे खर्च प्रमाणकानुसार खालील धनादेश 31/03/2017 नंतर प्रत्यक्ष बँक खात्यामधून वटवलेले आहेत

| अनु. क्र. | धनादेश क्रमांक | रककम |
|---|---|---|
| 1 | 722014 | 3,42,760 |
| 2 | 722013 | 10,24,520 |
| 3 | 722009 | 9,35,423 |
| 4 | 721993 | 6,990 |
| | एकूण | 23,09,693 |

त्यानुसार निव्वळ फरक रक्कम रु 40/- बँक खाती कॅशबूक जमा रक्कमेपेक्षा कमी दिसून येतात तरी याबाबत पूर्तता दर्शवावी.

परिच्छेद क्र. 17.10, जमा रक्कमे बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागाचे वित्त वर्ष - 2016-17 करिता निवडक माहिन्यांचे पडताळणी केली असता दि. 26/07/2016 रोजी रक्कम रु 23,0000/- व दिनांक 26-06-2016 रोजी रक्कम रु 37,396/- प्राप्त झालेली असुन त्यांची नोंद कॅश बुकात घेण्यात आलेली आहे. हया बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 75 अन्वये प्राप्त झालेल्या सर्व रक्कमेची पावतीने पोच देणे आवश्यक आहे त्यानुसार अर्धसमास पत्र क्र. 190 दिनांक 24/02/2021 अन्वये पडताळणी साठी पावतीची मागणी करुनही लेखापरिक्षणास पावती उपलब्ध करुन दिलेली नसल्याने जमा रक्कमे बाबत पडताळणी करता आलेली नाही.

2. सदर रक्कम जमा बाबतचे आदेश तसेच जमा रक्कमेचे स्वरूप (रोख / धनाकर्ष /धनादेश) हया बाबतची माहती वरील नमुद अर्धसमास पत्राव्दारे मागणी करुनही माहिती अप्राप्त असल्याने पडताळणी करता आलेली नाही.

3. जमा रक्कम बाबत महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 नियम 84 अन्वये दिवसाअखेर पूर्वी जमा रक्कमेचे प्राधिकृत अधिकाऱ्याकडुन चलन तयार करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

## परिच्छेद क्र. 17.11, व्यवसाय कर रक्कम शासन भरणा न केल्याबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागाचे शिक्षक हया प्रवर्गाचे वित्त वर्ष 2016-17 मधील निवडक माहिन्याचे वेतन देयक आणि वेतनपट नोंदवहीची पडताळणी केली असता असे निर्देशनास येते की, एकूण वेतनन रक्कमेतून शासकीय कपाती नुसार व्यवसाय कर रक्कम वजाती केलेली आहे तथापि सदर रक्कम शासन भरणा केलेली दिसून येत नाही तरी रू. 7,02,500/- रक्कम व्यवसाय कर लेखाशिर्षाखाली भरणा करुन लेखापरिषणास चलन व कोषागर ताळमेळ सह पूर्तता दर्शवावी. प्रति कर्मचारी 2500/- रु. वार्षिक प्रमाणे 281 पदांकरिता कपात करण्यात आलेली व्यवसाय कर रककम पुढिलप्रमाणे कपात करण्यात आलेली व्यवसाय कर रक्कम परिगणना खालील प्रमाणे आहे.

2500रु. x 281 पदे = 7,02,500/-

शासन भरणा करावयाची रक्कम रु. 7,02,500/-

परिच्छेद क्र.17.12:- प्रयोग शाळा तपासणी शुल्क अदा बाबत...

मिरा भाईंदर पालिका शिक्षण विभागामार्फत वित्त वर्षा 2016-2017 मध्ये विद्यार्थीकरिता गणवेश व दफ्तर /वॉटर बॅग या साहित्याचे नमुने खालील नमूद केलेल्या प्रयोग शाळेत पाठविण्यात आलेले होते. त्या तपासणी शुल्काची देयकाची रक्कम शिक्षण विभागाने अदा केलेली आहे. सदर देयकातील अनियमिकता बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

| अनु.क्र. | प्रमाण क्र. | दिनांक | धनादेश | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1. | -- | 03-08-2016 | 967086 | 20240 | संचालक व्ही.जे. आय.टी कॉलेज लॅब, मुंबई (शालेय दफ्तर / वॉटर बॅग तपासणी शुल्क ) |
| 2. | -- | 05-10-2016 | 967093 | 199295 | शिवमल्हार टेक प्रोव्ह.लि. प्रयोग शाळा नागपूर (गणवेश नमुने तपासणी अहवाल ) |
| | | | एकूण रक्कम | 2,19,532/- | |

1. सदर देयक कोणत्या निधिच्या तरतुदी मधून अदा केलेला आहे. हया बाबतचे खर्च मंजुरी आदेश लेखपरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

2. सदरच्या देयकातुन शासकीय कपातींची वजावटी करुन शासन भरणा केल्याचे दिसून येत नाही.

3. शिक्षण विभागातुन देयक पारित करुन त्यांच्या कडील खात्यामधून देय्यक रक्कम अदा केलेली आहे हया बाबतचे प्राधिकार लेखा पारिक्षणास प्राप्त करुन देण्यात आलेले नाहीत हया बाबतची पूर्तता बाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 190 दि.24/02/2021 नुसार खुलासा मागवूनही माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.सबब सदरील खर्च रक्कम बाबत पडताळणी करता आलेली नाही

परिच्छेद क्र. 17.13, जमा रकमांच्या तपशिलाची कॅश बूकामध्ये नोंद न केल्याबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण खात्याचे वित्त वर्ष 2016-2017 हया आर्थिक वर्षाचे शिक्षण् विभागातील निवडक माहिन्यातील कॅश बुकाप्रमाणे जमा नोंदीची तपासणी केली असता खालील नमूद जमा रक्कमेबाबत तपशिल नोंदविण्यात आलेला नाही. तसेच सदर रक्कमेस महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता - 2011 मधील नियम 75 अन्वये नमुना 54 नुसार पोच पावती दिल्याबाबत व नियम 84 प्रमाणे नमुना नं. 56 प्रमाणे भरणा चलन लेखापरिक्षणात उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. सबब सदरच्या रक्कमा कोणत्या लेखाशिर्षाखाली जमा केल्याबाबत लेखापरिक्षणास खातरजमा करता आलेली नाही. या बाबत अर्धसामासिक ज्ञापन क्र. 190 दि. 24/02/2021 नुसार मागणी करुनही अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

परिच्छेद क्र. 17.14:- जमा रकमेच्या तपशिला बाबत कॅश बुकात नोंद न केल्याबाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाचे वित्त वर्ष 2016-2017 हया आर्थिक वर्षाचे शिक्षण विभागातील कॅश बूकाची निवडक महिन्याची पडताळणी केली असता खालील जमा रकमेबाबत तपशिल नोदविण्यात आलेला नाही. तसेच सदर रक्कम पावती क्रमांकाने / चलनाव्दारे जमा केली त्याच प्रमाणे सदर रक्कम कोणत्या स्वरुपात (उदा. रोख/ धानदेश/धनाकर्ष) व्दारे प्राप्त झाली या बाबतच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत हया बाबत अर्धसमासिक पत्र क्र. 190 दि. 24/02/2021 व्दारे माहिती मागवुन ही लेखापरिक्षणास माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे या बाबत पडताळणी करुन खात्री करता आलेली नाही.

जमा रकमेचा तपशिल खालील प्रमाणे

| अनु क्र. | दिनांक | जमा रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 1. | 26-02-2016 | 2,30,000/- | नोंद नाही. |
| 2. | 26-02-2016 | 37396/- | नोंद नाही. |
| | एकूण | 2,67,396/- | |

हया बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 75 अन्वये नमुना नं. 54 मध्ये जमा रकमेची पावती देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 मधील नियम 84 प्रमाणे नमुना नं.56 प्रमाणे प्राधिकृत अधिका-या मार्फत जमा केलेल्या रकमेचे भरणा चलन लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे सदर रक्कम कोणत्या लेखाशिर्ष खाली जमा आहेत हयाबाबत लेखापरिक्षणास खातरजमा करता आलेली नाही.

# पशुसंवर्धन विभाग

**परिच्छेद क्र.18.1:- भटक्या कुत्राच्या निर्बिजिकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण योजनेच्या थकित अनुदानाबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपलिका पशुसवंर्धन विभागातील वित्त वर्ष 2016-2017 हया वित्त वर्षात 1033 श्वानांवर निर्बिजिकरण शस्त्रक्रिया व रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण केलेले आहे.

ॲनिमल वेंल्फेर बोर्ड ऑफ इंडिया पर्यावरण व वन मंत्रालय भारत सरकार कडुन भटक्या कुत्रयांच्या जन्म नियंत्रण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण योजनेकरिता 50 % लक्षांकासाठी प्रति भटक्या श्वानांना पकडणे करिता 75/- रु व निर्विजीकरण शस्त्रक्रिया / औषधउपचार / लसीकरण करिता प्रति श्वान 370 रु. असे एकूण प्रतिश्वान 445/- रु अनुदान दिले जाते.

वित्त वर्ष 2016-2017 करिता 1033 भटक्या श्वानांवर सदर योजने अंतर्गत निर्बिजिकरण शस्त्रक्रिया व लसीकरण केलेले आहे. त्यानुसार योजनेच्या मार्गदर्शन तत्वानुसार 50% लक्षांक उपचार 517 भटक्या श्वानांच्या करिता 445/- रु प्रति श्वान प्रमाणे 2,30065/- अनुदान रक्कम महानगरपालिकेस केंद्र शासनाकडुन प्राप्त होणे गरजेचे आहे. तथापि अजून पर्यंत सदर अनुदनित रक्कम महानगर पालिकेस प्राप्त झालेली नाही.

तरी सदर अनुदानीत रक्कम प्राप्त करुन घेणे करिता संबधित विभागाने पाठपुरावा करुन थकित अनुदानीत रक्कम प्राप्त करुन लेखापरिक्षणास अनुपालन दर्शवावे.

**थकित अनुदानित रक्कम 2,30065 /-**
**मत्ता 2,30065 /-**

# समाजकल्याण विभाग

**परिच्छेद क्र.19.1:-क्रिडा विभागाचे अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नसलेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि.01/07/2015 ठराव क्र.14 प्रकरण क्र.35 नुसार बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करण्याबाबत निश्चिती करण्यात आलेले आहेत. त्यानुसार वित्त वर्ष -2016-17 करीता खालील बाबनिहाय किती महसुल प्राप्त झाला याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.178 दि.02/02/2021 अन्वये लेखापरीक्षणा करीता माहीती मागविण्यात आलेली होती. तथापि याबाबतचे अनुषंगाने अभिलेख लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने प्राप्त महसुलाबाबत पडताळणी करता आलेली नाही.

**महसुल जमा बाबतचे बाबनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे**

| अ.क्र | बाब |
|---|---|
| 1 | मोकळी जागा |
| 2 | जलतरण तलाव |
| 3 | बॅडमिंटन हॉल |
| 4 | विविध क्रिडा सुविधा |
| 5 | व्यायाम शाळा |

# अतिक्रमण विभाग

**परिच्छेद क्र. 20.1:- प्रभाग-3 मधील अनाधिकृत बांधकाम निष्कासन शुल्क थकबाकी बाबत...**

वित्त वर्ष 2016-17 मधील प्रभाग क्र. 3 मध्ये अनाधिकृत बांधकाम निष्कासन नोंद वहीची लेखापरीक्षणात पडताळणी केली असता, वित्त वर्ष 2014-15 ते 2016-17 हया कालावधीत अनाधिकृत बांधकाम निष्कासन शुल्क एकुण रक्कम रु.202400/- संबधिताकडुन वसुल झाली नसल्याने सदर शुल्क थकित असल्याचे निर्देशनास येते. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे .

| | विकासकाचे नाव व पत्ता | निष्कासन कार्यवाही दिनांक | देय्य निष्कासन शुल्क |
|---|---|---|---|
| 1 | श्रीम. शालिनी सिनकर.गाळा नं-7 साई चरण सो. भाईंदर (पू.) | 29/03/2014 | 6200/- |
| 2 | श्रीम. नसरीन इजाज.गाळा नं-8 साई चरण सो. भाईंदर (पू.) | 29/03/2014 | 6200/- |
| 3 | श्री. सुदंर देवडीका. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 23/05/2014 | 19800/- |
| 4 | सचिन ओम रिद्दी सिद्दी सो. भाईंदर (पू.) | 05/07/2014 | 8200/- |
| 5 | अब्दुल मंडळ, रु.नं 48, ओसवाल पार्क भाईंदर (पू.) | 26/11/2014 | 10200/- |
| 6 | श्री. के.सी घोष. ओसवाल पार्क भाईंदर (पू.) | 26/11/2014 | 10200/- |
| 7 | श्री. कल्पेश / चेतन जैन. स्वाती इंड इस्टेट, भाईंदर (पू.) | 03/02/2015 | 13500/- |
| 8 | संदिप किरण इस्टेट, साई बाबा मंदिर जवळ, भाईंदर (पू.) | 12/02/2015 | 13500/- |
| 9 | श्रीम. मनिषा जोशी. ओसवाल पार्क भाईंदर (पू.) | 26/11/2014 | 10200/- |
| 10 | श्री. विनोद पाल सिहं, दुलगर्ज, काशीबाई चाळ भाईंदर (पू.) | 16/03/2015 | 13800/- |
| 11 | श्री. ओमप्रकाश यादव. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 16/03/2015 | 14300/- |
| 12 | श्री. संतोष चौरसिया. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 16/03/2015 | 14300/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | श्री. अजय श्रीवास्तव. भुमिका चाळ. भाईंदर (पू.) | 16/03/2015 | 13800/- |
| 14 | श्री. मनोज कुमार सिंग. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 22/04/2015 | 11300/- |
| 15 | श्री. सुदंर देवकिया. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 22/04/2015 | 9200/- |
| 16 | श्री. सुदंर देवकिया. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 31/08/2015 | 14000/- |
| 17 | श्री. परमेश्वर चौधरी. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 31/08/2015 | 8100/- |
| 18 | श्री. मणीराम निशाद. शिवशक्ती नगर भाईंदर (पू.) | 11/04/2016 | 5600/- |
| | एकुण | | 202400/- |

तरी सदर थकीत बाकी वसुल करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आले त्याची माहिती अर्धसमास क्र. 196 दि. 28-05-2021 मागविण्यात आली होती.

अनुपालन अप्राप्त

**परिच्छेद क्र.20.2:- जप्त करण्यात आलेल्या साहित्यांचे लिलाव पोटी जमा रक्कमेच्या अनियमिता बाबत...**

वित्त वर्ष 2016-2017 मध्ये अतिक्रमण विभागाच्या कारवाई नुसार जप्त करण्यात आलेल्या मालाच्या लिलावापोटी खालील नमूद केल्या प्रमाणे रक्कम जमा झालेले छायांकित पावत्या प्रमाणे आढळून आलेले आहे. सदर रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे

| अनु क्र. | धनादेश | दिनांक | बँकेचे नाव | जमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 66004 | 09-07-2016 | डिसी.बी बँक | 4,50,000.00 |
| 2. | 660019 | 29-07-2016 | डिसी.बी बँक | 2,75,000.00 |
| 3. | 010805 | 21-07-2016 | जावळी सहकारी बँक | 1,50,000.00 |
| 4. | 010803 | 20-07-2016 | जावळी सहकारी बँक | 1,00,000.00 |
| 5. | 010804 | 20-07-2016 | जावळी सहकारी बँक | 50,000.00 |
| 6. | 010829 | 22-09-2016 | जावळी सहकारी बँक | 1,30,000.00 |

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत .

1. अर्धसमास पत्र क्र. 191 दि. 16-04-2021 व अर्धसमास क्र. 194 दि. 25-05-2021 व्दारे मागणी करुनही जप्त केलेल्या साहित्यांच्या लिलावाच्या नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत त्यामुळेजप्त केलेले साहित्याचे मोजमाप व सविस्तर माहिती याबाबत पडताळणी करता आलेली नाही. हयाबाबत अर्धसमास क्र. 194 दि. 25-05-2021 नुसार मागणी करुनही माहिती / अभिलेख उपलब्ध झालेले नाहीत.

2. सदर जप्त साहित्यांची अपसेट व्हेल्यू बाबत नस्ती अभावी निश्चिती करता न आल्याने प्राप्त रक्कम लिलाव बोली रक्कम हया बाबत पडताळणी करता आलेली नाही.

परिच्छेद क्र. 20.3 :- निष्कासन शुल्क वसुलीचीकार्यवाही न केल्याबाबत....

वित्त वर्ष 2016-2017 मध्ये एकूण 58 अतिक्रमण बांधकामावर अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली असून त्यापैकी 20 प्रकरणमध्ये बांधकाम धारकाचे नांव उपलब्ध होवू न शकल्यामुळे निष्कासनाच्या खर्चाची वसुली दर्शविण्यात आलेली नाही.

उर्वरित 38 अतिक्रमण प्रकरणामध्ये निष्काषन अनुज्ञेय रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि वरिल प्रकरणांची 31 मार्च 2017 अखेर वसुली झालेली नसल्याने निष्काषन रक्कम थकित आहे. तरी संबधिताकडुन थकित निष्काषन अनुज्ञेय रक्कम वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीत भरणा करुन पूर्तता दर्शवावी.

**थकबाकी विवरण पत्रक**

| अनु क्र. | विकासकाचे नाव | निष्कासन कार्यवाही दिनांक | देय निष्कासन शुल्क | वसुल झालेली शुल्क | थकीत निष्कासन रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. सायमन | 10-05-2016 | 425.00 | निरंक | 425.00 |
| 2 | श्री. विनोद चव्हाण | 11-05-2016 | 245.00 | निरंक | 245.00 |
| 3 | श्री. देवानंद माच्छी | 22-06-2016 | 488.00 | निरंक | 488.00 |
| 4 | श्री. अनंत पाटील | 23-06-2016 | 513.00 | निरंक | 513.00 |
| 5 | श्री. कानसीन नसवत | 23-06-2016 | 513.00 | निरंक | 513.00 |
| 6 | श्री.सुरेंद्र पाल | 23-06-2016 | 513.00 | निरंक | 513.00 |
| 7 | श्री. विजय तिवारी | 23-06-2016 | 513.00 | निरंक | 513.00 |
| 8 | श्री. अमृत माच्छी | 10-07-2016 | 245.00 | निरंक | 245.00 |
| 9 | श्री. मयाराम सहानी | 10-07-2016 | 245.00 | निरंक | 245.00 |
| 10 | श्री. महेंद्र प्रजापती | 10-07-2016 | 488.00 | निरंक | 488.00 |
| 11 | श्री. महेंद्र प्रजापती | 10-07-2016 | 488.00 | निरंक | 488.00 |
| 12 | श्री. रविंद्र गुना | 10-07-2016 | 488.00 | निरंक | 488.00 |
| 13 | श्री. महेंद्र सिंग प्रजापती | 13-07-2016 | 488.00 | निरंक | 488.00 |
| 14 | श्री. गौतम गणेश | 13-07-2016 | 245.00 | निरंक | 245.00 |
| 15 | श्री. सुनित रॉय | 13-07-2016 | 245.00 | निरंक | 245.00 |
| 16 | श्री. मारवाडी | 13-07-2016 | 245.00 | निरंक | 245.00 |
| 17 | श्री. लालचंद यादव | 13-07-2016 | 245.00 | निरंक | 245.00 |
| 18 | श्री. सुरेश भारी | 02-08-2016 | 740.00 | निरंक | 740.00 |
| 19 | श्री. इरफान पठाण | 02-08-2016 | 740.00 | निरंक | 740.00 |
| 20 | श्री. मनोज सिंग | 02-08-2016 | 740.00 | निरंक | 740.00 |
| 21 | श्री. रमानंद चौधरी | 24-08-2016 | 363.00 | निरंक | 363.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 22 | श्री. जेम्स पाटील | 26-08-2016 | 182.00 | निरंक | 182.00 |
| 23 | श्री. ज्युट बोटे-या | 26-08-2016 | 182.00 | निरंक | 182.00 |
| 24 | श्री. जसिन फर्नांडीस | 03-09-2016 | 182.00 | निरंक | 182.00 |
| 25 | श्री. सदानंद ठाकूर पाटील | 03-09-2016 | 182.00 | निरंक | 182.00 |
| 26 | श्री. आरिफ दिन | 21-10-2016 | 3486.00 | निरंक | 3486.00 |
| 27 | चेअरमन विजय होम कॉम्पलेक्स | 14-12-2016 | 1709.00 | निरंक | 1709.00 |
| 28 | श्री. विजय म्हात्रे | 21-12-2016 | 4686.00 | निरंक | 4686.00 |
| 29 | श्रीम. मंजुळा चव्हाण | 20-01-2017 | 9435.00 | निरंक | 9435.00 |
| 30 | श्री.मोहम्मद सलिम | 01-02-2017 | 5406.00 | निरंक | 5406.00 |
| 31 | श्री. चंचल जैन | 01-02-2017 | 812.00 | निरंक | 812.00 |
| 32 | श्री. किशोर वानखडे | 02-02-2017 | 812.00 | निरंक | 812.00 |
| 33 | श्री. मोहम्मद सलिम | 02-02-2017 | 6834.00 | निरंक | 6834.00 |
| 34 | श्री. अमित पाटील | 06-02-2017 | 10383.00 | निरंक | 10383.00 |
| 35 | श्री. नसीम एंटप्रायझेस | 10-02-2017 | 2879.00 | निरंक | 2879.00 |
| 36 | श्रीम. प्रितीपाल पाटील | 23-02-2017 | 902.00 | निरंक | 902.00 |
| 37 | श्री. विनस रकवी | 09-06-2017 | 1573.00 | निरंक | 1573.00 |
| 38 | चेअरमन हयान राईस को. ऑ. हौ. सो. | 24-03-2017 | 7010.00 | निरंक | 7010.00 |
| | **एकुण** | | **65870.00** | **निरंक** | **65870.00** |

तरी सदर थकीत बाकी वसुल करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आले त्याची माहिती अर्धसमास क्र. 198 दि. 28-05-2021 मागविण्यात आली होती.
अनुपालन अप्राप्त

**थकित रक्कम रु. 65825/-**
**मालमत्ता रक्कम रु. 65825/-**
**वसुली पात्र रक्कम रु. 65825/-**

**परिच्छेद क्र. 20.4:- प्रभाग - 4 मधील अनधिकृत बाधकाम निष्कासन शुल्क थकबाकी बाबत.**

वित्त वर्ष 2016-2017 मधील प्रभाग क्र. 4 मध्ये अनधिकृत बांधकाम निष्कासन नोंद वहीची लेखापरिक्षणास पडताळणी केली असता अनधिकृत बांधकाम निष्कासन शुल्क एकूण रक्कम रु. 1,58,300/- संबधिताकडुन वसुल करुन महानगरपालिका निधीत भरणा केलेली नाही. सदर निष्कान शुल्क थकित असल्याचे निर्देशनास येते तरी सदर थकित निष्कासन शुल्क रक्कमेची वसुली करुन महानगरपालिका निधीत भरणा करुन पूर्तता दर्शवावी.

| .अनु क्र. | विकासकाचे नाव / पत्ता | निष्कासन कार्यवाही दिनांक | देय निष्कासन शुल्क |
|---|---|---|---|
| 1 | श्री. खेमजी पठाडिया मस्तान इंडइस्टेट गोडदेव भाईदर(पू) | 01-04-2016 /04-04-2016 | 12800.00 |
| 2 | श्री. गिरिश शिसोदय अमित इंडइस्टेट गोडदेव भाईदर(पू) | 01-04-2016 | 6400.00 |
| 3 | श्री. निहपल खान कस्तुरी इंड इस्टेट गोडदेव भाईदर(पू) | 05-04-2016 | 6400.00 |
| 4 | श्री. सावळाराम देवाशी एम. आय. उद्योग नगर भा.पू. | 26-12-2016 | 17800.00 |
| 5 | श्रीम. हिंमत भाई दावडा एम.आय उद्योग नगर भाईदर(पू) | 26-12-2016 | 17800.00 |
| 6 | सचिव, इंडिया हाईट, भाईदर(पू) | 27-12-2016 | 5700.00 |
| 7 | श्री. गिरिश शिसोदय अमित इंडइस्टेट गोडदेव भाईदर(पू) | 09-12-2016 | 10500.00 |
| 8 | कन्नुभाई पटेल विकास इंडइस्टेट, भाईदर(पू) | 26-12-2016 | 5700.00 |
| 9 | श्री. अशोक कुमार शुक्ला स्वास्तिक इड इस्टेट भाईदर(पू) | 08-12-2016/15-12-2016 | 19500.00 |
| 10 | श्री. रजिव कुमार स्वास्तिक इड इस्टेट भाईदर(पू) | 15-12-2016 | 18300.00 |
| 11 | श्री. इंद्रमल जैन गाळा क्र. 4 भाईदर(पू | 08-12-2016 | 17200.00 |
| 12 | श्री. अमरचंद जैन जय अंबे इंड इस्टेट , भाईदर(पू) | 08-12-2016 | 20200.00 |
| | ए कु ण | | 1,58,300.00 |

तरी सदर थकीत बाकी वसुल करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आले त्याची माहिती अर्धसमास क्र. 197 दि. 28-05-2021 मागविण्यात आली होती.

अनुपालन अप्राप्त

**मालमत्ता रक्कम रु. 1,58,300/-**

**वसुलपात्र 1,58,300/-**

## परिच्छेद क्र.. 20.5 :- वित्त वर्ष 2016-17 चे लेखापरीक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करुन देणे बाबत.

प्रभाग क्र.3 मधील अतिक्रमण विभागातील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अतिक्रमण बांधकाम नोंदवही तपासताना एकुण13 प्रकरणात काय कार्यवाही केली त्याची नोंद घेण्यात आली नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र | जागा मालक /बांधकाम करण्याच्या व्यक्तीचे नाव पत्ता | जागेचा बांधकामाचा तपशिल | भेट देऊन तपासणी केल्याचा दिनांक | नोटीस दिलेला क्र. दिनांक | सुनावणी घेतल्याची दिनांक | निर्णय पारीत केल्याचा दिनांक | पोलिस तक्रार दाखल दिनांक | मा. न्यायालय दावा दाखल केलेला तपशिल /दावा क्र. /स्थगिती दि. /स्थगिती 31 दि. | निष्कासक दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | श्री. हंसकुमार पांडे नगरसेवक ,वरदान बंगला ,जैसलपार्क चौपाटी, भाईंदर(पू) | तळ+ 1 मजल्याचे बंगल्यामधील वाढीव बांधकाम | 15-06-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/660 /2016 दि. 08-07-2016 | निरंक | | | | |
| 2 | श्री. वडाके कट्टी व्हि.मॅथ्यू, बी. 715/7 वा बंगला ओसवाल ऑर्नेट इमारत नं. 2 जेसलपार्क, भाईंदर(पू) | टेरेस वरील 1230x3.60 मी चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/1620 /2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 3 | श्री. शिजॉय व्हि. मॅथ्यु, बी.715/7वा बंगला ओसवाल ऑर्नेट इमारत नं. 2 जेसलपार्क , भाईंदर(पू) | शॉप क्र. 28 चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/1621 /2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 4 | श्रीम. शामनी व्हि. मॅथ्यू बी. 715/7 वा बंगला ओसवाल ऑर्नेट इमारत नं. 2 जेसलपार्क , भाईंदर(पू) | शॉप क्र. 13 चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/1622 /2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 5 | मे. सेक्रेटरी / चेअरमन ओसवाल ऑर्नेट इमारत नं.2, जेसल पार्क, भाईंदर(पू) | सोसा. पंप रूम व केबीनचे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/1623/2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 6 | श्री. रमेश के. आचार्य, शॉप नं. 27 | शॉप क्र. 27 चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. 1624 /2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 7 | श्रीमती. जयश्री गणपत, शॉप नं. 50 | शॉप नं. 50 चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/1625/2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 8 | श्रीमती. शोकादेवी उपाध्याय , शॉप नं. 17 | शॉप नं. 17 चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/1626/2016 दि. 24-10-2016 | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | श्री. किशोर वालजी भाई, शॉप नं. 16ए | शॉप नं. 16ए चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/16 27/2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 10 | श्रीमती. एलियामा . व्ही. मॅथ्यु | शॉप क्र. 32 ए चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/16 28/2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 11 | श्री. उमराव सिंग ओसवाल / मॅनेजर , कर्नाटक बँक, शॉप नं. 12 | शॉप क्र. 12 चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/16 29 /2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 12 | श्रीम. रुसी सुतार , शॉप नं. 50 | शॉप क्र. 50 च बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/16 30/2016 दि. 24-10-2016 | | | | | |
| 13 | श्री. शायम केमका , शॉप नं.29 ए | शॉप क्र. 29 ए चे बांधकाम | 06-10-2016 | जा.क्र. मिभा/मनपा/प्र. क्र.3/सा.बां/16 31/2016 दि. 24-10-2016 | | | | | |

उपरोक्त यादीप्रमाणे सदर 13 प्रकरणी कार्यवाही पूर्ण होऊन किती महसूल महानगरपालिकेला प्राप्त झाला याची माहिती लेखा परीक्षणास अर्धसमास क्र. 195 दि. 28-05-2021 व्दारे उपलब्ध करुन देण्यासाठी मागणी करण्यात आली होती.

अनुपालन अप्राप्त

# विवाह नोंदणी विभाग

**परिच्छेद क्र.21.1 :- विवाह नोंदणी शुल्क रक्कम जमा नसल्या बाबत...**

मिरा भाईदंर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती-1, मधील वित्त वर्ष - 2016-17 या कालावधीच्या लेखापरीक्षणात नमुद केलेल्या पावती प्रमाणे संकलन झालेली रक्कम पोटकिर्द मध्ये जमा नोंद आढळून आलेली नाही.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अअ.क्र. | पावती बूक क्रमांक | पावती क्रमांक | दिनांक | संकलन रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 11. | 8303 | 830235 | 21/01/17 | 1000/- | रुक्साना इब्राईन शेख |
| 22. | | 830236 | 21/01/17 | 1000/- | रंजीना नसीम |
| 33. | | 830237 | 21/01/17 | 1000/- | मोह.शफीक आरिफ |
| | | | एकुण | 3000/- | |

त्या बाबत अर्ध समास ज्ञापन क्र.190 दि.01/04/2021, द्वारे खुलासा मागूनही माहिती दिलेली नाही. तरी लेखात समाविष्ठ न केलेली रक्कम चलनाव्दारे लेखाविभागात जमा केल्याची खातरजमा करण्यात यावी. व चलनाव्दारे जमा नसल्यास महाराष्ट्र लेखासंहिता 2011 मधील नियम - 90 प्रमाणे शुल्क वसुली बाबत कार्यवाही करण्यात यावी.

लेख्यात जमा नसलेली रक्कम- 3000/-
वसुलपात्र रक्कम - 3000/-

# पे ॲण्ड पार्क

**परिच्छेद क्र.22.1:- अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत बाबत...**

मिरा भाईदंर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती-1, मधील अतिक्रमण विभागाचे वित्त वर्ष - 2016-2017, या वित्तीय वर्षाच्या खालील नमुद अभिलेखे लेखापरीक्षणास प्राप्त झालेले नाहीत. या बाबत अर्धसमास ज्ञापन क्र.190, दि.01/04/2021 नुसार मागणी करुनही अभिलेखे लेखापरीक्षणास अप्राप्त आहेत.

1. संकलन वापर पावत्या माहे मार्च.2017
2. चलन नस्ती.
3. सुभाषचंद्र बोस मैदान / शुटींग शुल्क / मैदान भाडे / मंडप भाडे बाबतचे स्थायी आदेश नस्ती.

**परिच्छेद क्र. 22.2:- पे ॲन्ड पार्क वाहन तळाची थकित रक्कमे बाबत...**

मे. एन वन केअर टेकर पे ॲन्ड पार्क ठेकेदाराकडुन वित्त वर्ष-2016-17 करिता खालील प्रमाणे वाहन तळ ठेक्यापोटी रक्कम रु.294044/- मागणी होती. त्यापैकी मार्च 2017 अखेर पर्यंत रु.263092/- इतकी रक्कम वर्ष 2016-17 करिता ठेकेदारांनी मिरा भाईदर महानगरपालिकेत भरणा केलेली आहे. 31 मार्च 2017 अखेर वित्त वर्ष 2016-17 करिता रक्कम रु. 30952/- थकितआहे. एकुण मागणी प्रमाणे रककम वसुली होणे आवश्यक असताना रक्कम रु.30952/- वर्षा अखेर थकबाकी दिसुन येते.

मत्ता रु. 30952/-
वसुलपात्र रक्कम रु.30952/-

**परिच्छेद क्र.22.3:- आरक्षण क्र. 264 ओ येथील वाहन तळ पे ॲन्ड पार्क ठेक्याबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे नवघर स.क्र.387/2,7 व स.क्र.158/2,7, आरक्षण क्र.264-ओ, पे ॲन्ड पार्किंग (वाहन तळ) साठी 3 वर्षा करिता माहे. मार्च2016 मध्ये जाहिर निविदा प्रसिध्द केल्या प्रमाणे 3 निविदा दि.12/03/2016 ते 19/03/2016 या कालावधीत प्राप्त झालेल्या आहेत. तथापि अपसेट व्हॅल्यू पेक्षा न्युनतम दराच्या निविदा आल्याने सदर निविदा रद्द करुन फेर निविदा मागविण्यात आल्या, त्या नुसार फेर निविदा धारकांपैकी ओम साई सिध्दी ह्या निविदा धारकाची अधिक दराची निविदा (निविदा रक्कम) रु.1598726/- ह्या समवेत वाटाघाटी करुन वाटाघटी अंती 3 वर्षाकरिता रु.1623726/- इतक्या रक्कमेवर निविदा मंजुर करुन त्यांना कार्यादेश क्रमांक .40/2016-17 दि.01/08/2016 नुसार ठेका दि.01/08/2016 ते दि.30/7/2019 ह्या कालावधी करिता देण्यात आलेला आहेत. त्याकरिता वर्ष निहाय रक्कम तपशिल खलील प्रमाणे.

| वर्ष | रक्कम |
|---|---|
| 2016-17 | 436000/- |
| 2017-18 | 533820 |
| 2018-19 | 653906 |
| एकुण | 1623726 |

ह्या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 मधील नियम 134 तसेच मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार महाराष्ट्र शासन राजपत्र दि.24/04/2015 मधील सुधारणा नुसार कार्यकंत्राट करत असताना कंत्राट दारांकडून रक्कम रु. 10 लाखापर्यंत रु500/- व त्या पुढिल प्रति रु.1 लाखा करिता रु. 100/- असे करारनामा करताना मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. त्यानुसार रु.1200/- मुद्रांक मुल्यांवर करारनामा घेणे आवश्यक असताना करारनामा रु.700/- मुद्रांक मुल्यांवर केलेले आहे. कमी मुद्रांक रक्कम रु.500/- मक्तेदाराकडुन भरणा करुन घेवून शासन खाती मुद्रांक शुल्क रक्कम जमा करुन पूर्तता दर्शवावी.
2. करार पत्रातील अट क्र.34 अन्वये करारनाम्यावर होणारी स्टॅम्प डयुटी रक्कम भरणा पावती मक्तेदारांनी सादर केली नसल्याने मक्तेदारांनी अट क्र.34 अन्वये स्टॅपं डयुटी भरणा केली किंवा कसे या बाबत पडताळणी करता आलेली नाही.
3. सदर मक्ता करिता वार्षिक मुल्यधिकारी रक्कम (अपसेट व्हॅल्यू) पार्किंग क्षमता अंदाजे 100 वाहना करिता 3 वर्षाकरिता प्रतिवर्ष अनुक्रमे रु.418000, रु.459800, रु.505780 एकुण रु.1383580/- (प्रति वर्ष 10% वाढ) निश्चित केलेली आहे. तथापि वाहन तळाची जागा किती चौ.मीटर आहे. व प्रत्येक वाहना नुसार किमान

किती जागा आवश्यक आहे. त्या बाबतचे मार्गदर्शक तत्वे अथवा मानके (नॉर्म्स) नमुद केलेले नसल्याने त्या जागेवर सरासरी 100 वाहने पार्किंग क्षमता गृहित धरुन वार्षिक मुल्यधिकारी रक्कम निश्चित केलेली असल्याने प्राप्त निविदा रक्कमे सोबत लेखापरीक्षणास अचूक ताळमेळ घेता आलेला नाही.

# मिळकत विभाग

**परिच्छेद क्र.23.1:- नमुदा नंबर 81 नोंद वही (मिळकत नोंद वही) मधील अनियमितता बाबत...**

वित्त वर्ष 2016-17 मध्ये मिळकत विभागातील नमुना नबंर 81 मिळकत नोंद वहीची पडताळणी केली असता मिळकत नोंद वहीतील पृष्ठ क्र. 35 अनु.क्र. 10, M.B.M.C. अपार्टमेंन्ट मधील सदनिका क्र. 10 श्रीम. पारुबाई केशव घरत यांचे कडून मागणी नुसार वसुली केलेली आहे.

वसुली

| | मागणी वर्ष | मागील थकबाकी रक्कम | चालु मागणी रक्कम | एकुण मागणी रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 2016-17 | 1200/- | 1200/- | 2400/- |

| | वसुली वर्ष | पावती क्रमांक | दिनांक | वसुली रक्कम |
|---|---|---|---|---|
| | 2016-17 | 808017 | 04/05/16 | 1200/- (मागिल वसुली) |
| | 20/06/2017 | 820397 | 12/01/17 | 1200/- (चालु मागणी रक्कम) |

एकुण मागणी रु.2400/- व एकुण वसुली रु.2400/- केलेली असल्याने 31 मार्च 2017 अखेर शिल्लक निरंक असताना नमुना नबंर 81 मध्ये वसुल रक्कम पावती क्र.820397 दि.12/01/17 ची नोंद न घेतल्याने 31 मार्च 2017 अखेर रु.1200/- थकबाकी दर्शविलेली आहे. याबाबत अर्धसमास क्र. 188 व्दारे दि. 30-03-2021 व्दारे खुलासा मागविण्यात आला होता त्यानुसार विभागाने याबाबत मागणी नोंदवहीत वसुली नोंद नोंदविणे नजर चुकीने राहिल्याचे मान्य केले आहे. तथापि सदरील अभिलेख्यात दोष दुरुस्ती करुन अभिलेखे लेखापरिक्षणास तपासण्यास सादर करण्यात आले नाही.

**परिच्छेद क्र. 23.2 मिळकती पासून मिळणा-या उत्पन्नाच्या मागणी / वसुली बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतर्गत मिळती सदनिका/गाळा/समाज मंदिर/आरक्षण/ भुईभाडे इत्यादी मिळकतीच्या भाडे पोटी वित्त वर्ष 2016-2017 करिता मागणी / वसुली/ थकबाकी बाबतचे विवरण पत्रक मागणी नमुना नं. 81 नुसार खालील प्रमाणे आहे.

| मागणी | | | वसुली (01-04-2016 ते 31-03-2017 | | | 31 मार्च 2017 अखेर थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागिल थकीत मागणी | चालु मागणी | एकूण मागणी | मागिल थकीत मागणी | चालु मागणी | एकूण मागणी | मागिल थकीत मागणी | चालु मागणी | एकूण मागणी |
| 1,24,64,331 | 1,12,58,376 | 2,37,22,707 | 4,59,632 | 30,54,517 | 34,14,149( 14.8%) | 112004699 | 8203859 | 20208558 (85.2%) |

या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत. ..

1. मिरा भाईंदर महानगरपालिका हयाचे वित्त वर्ष 2016-2017 च्या वार्षिक जमा/ खर्च नमुना नं. 27 नुसार महानगरपालिका मालमत्ते भाडे हया लेखाशिर्षाखाली ( कोड नं. 1423) तरतुद 40 लाख व प्रत्यक्ष जमा 35.43 लाख रु. अशी दर्शविलेली आहे. तथापि जमिनी आणि इमारत भाडे बाबत मागणी नोंद वही नुसार (नमुना नं. 81) एकूण मागणी व वसुली बाबत विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे रक्कम दिसुन येते हया विसंगती बाबत खुलासा करावा.

2. वित्त वर्ष 2016-2017 मध्ये मागणीनुसार वसुली बाबत व त्याच प्रमाणे थकीत वसुली बाबत महानगरपालिका अधिनियम 1959 मधील कलम 140 अन्वये येणे रक्कम बाबत कलम 128 (1) )(3) (4) (7) प्रमाणे कारवाई केलेली दिसुन येत नाही. त्यामुळे वित्त वर्ष 2016-2017हया कालावधील फक्त 14.8 % इतकी अल्पप्रमाणात वसुली झाल्याचे दिसुन येते. परिणामी थकबाकी वाढत जात आहे.

तरी या बाबत नमूद कलम प्रमाणे कारवाई करून पूर्ण थकबाकी येणे रक्कम वसुल करुन पूर्तता दर्शवावी

(अर्धसमास क्र. 188 दि. 30-03-2021)

**मत्ता - 20208558/-**

**वसुलपात्र रक्कम रुपये - 20208558/-**

**परिच्छेद क्र. 23.3:- थकित मिळकत भाडे रक्कमेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या मिळकती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -1959 मधील नियम 59 प्रमाणे महानगरपालिकेने मिळकती भाडे तत्वावर दिलेल्या आहेत.

वित्त वर्ष 2016-17 हया आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात सदर मिळकती पैकी काही मिळकतीचे भाडे रक्कमेचे 5 वर्षापेक्षा अधिक कालावधी करिता अथवा रु.50000/- पेक्षा अधिक रक्कमेची थकबाकीचे विवरण पत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | मिळकत भाडे धारकाचे नाव व मिळकत क्र. | थकबाकी रक्कम (31 मार्च 2017 अखेर) | थकित कालावधी |
|---|---|---|---|
| 11. | ज्ञानु नरहरी सुयंवशी. गाळा नं.06, (भाईंदर (प.) नविन इमारत, शॉपिंग सेंटर | 58176/- | 5 वर्ष |
| 22. | मिस्त्रीलाल वैष्णवगाळा नं.12, (भाईंदर (प.)नविन इमारत, शॉपिंग सेंटर | 56688/- | 4 वर्ष |
| 33. | सलिम खान.उत्तन विभाग (भाईंदर (प.) फूल मार्केट | 93600/- | 13 वर्ष |
| 44. | शफि शेख. उत्तर विभाग (भाईंदर (प.) फूल मार्केट | 93600/- | 13 वर्ष |
| 55. | जितेंद्र रमेश आयदणे.उत्तन विभाग (भाईंदर (प.)फूल मार्केट | 72000/- | 10 वर्ष |
| 66. | फरिदा मुन्शी कुरेशी. (मदिना चिकन शॉप) | 50600/- | 7 वर्ष |
| 77. | मटणवाला मोर्वा मार्केट मुर्धा-राई मोर्वा विभाग नविन-भुई भाडे | 93600/- | 13 वर्ष |
| 88. | आरक्षण क्र. 262 टाऊन पार्क BOT, मे. वर्धमान डेव्हलपर्स, शिवाजी गार्डन, मिरा भाईंदर रोड. | 9733850/- | 2 वर्ष |
| 99. | श्री. तन्वीर कुरेशी शब्बीर. भाईंदर(प.), जून कार्यलय प्रभाग समिती-9 गाळा क्र.6 | 50400/- | 2 वर्ष |
| 110. | श्री. अल्माल अ. कुरेशी भाईंदर समिती कार्यालय, भाईंदर(प.) जून, प्रभाग समिती-1 गाळा क्र.7 | 63000/- | 2 वर्ष |
| 111. | शासकीय कार्यालयास भाडे. तत्वावर दिलेली जागा तलाठी कार्यालय नगरभवन, | 1678048/- | 17 वर्ष |
| 112. | शासकीय कार्यालयास भाडे. तत्वावर दिलेली जागा नियंत्रक, राज्य परिवहन ठाणे. | 1400256/- | 16 वर्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| 113. | उड्डान पुलाखालील जागा (भाईंदर (पु.), नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालय (रेशनिंग ऑफीस) | 1535058/- | - |
| 114. | सहा.दुय्यम निबंधक ठाणे. | 2757946/- | - |
| 115. | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे कार्यालय | 419796/- | - |
| एकुण थकित भाडे | | 1,81,65,618/- | - |

<u>या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.</u>

1. महानगरपालिकेस येणे असलेल्या भाडे रक्कमेबाबत महानगरपालिका अधिनियम 1959 मधील कराधान नियम 52 मधील तरतुद 52/3 अन्वये भोगवटादाराने देय्य असलेले किंवा देय् होणारे भाडे महानगरपालिकेस देण्यास त्याने कसुर केली तर महानगरपालिकेस अशा भाडयाची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1959 मधील कलम 140 अन्वये इतर येणे रक्कम बाबत मालमत्ता कराची थकबाकी आहे. असे समजुन थकबाकी रक्कम वसुली बाबत कलम 128(1)(3)(4)(7), प्रमाणे उचित कार्यवाही करुन थकित रक्कम वसुली करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्याने 31 मार्च 2017, अखेर मोठ्या प्रमाणात थकबाकी रक्कम दिसुन येते. व पर्यायाने प्रतिवर्ष थकबाकीत वाढ होत आहे. असे निर्देशनास येते.

   तरी वरिल कलमा प्रमाणे कार्यवाही करुन त्वरित थकबाकी रक्कम व्याज व दंडासहीत आकारणी करुन वसुली करुन पूर्तता दर्शवावी

2. सदर भाडे धारकांचे करारनामे लेखापरीक्षणास अवगत झालेले नसल्याने त्या भाडे कराराबाबत अटी / शर्ती बाबत पडताळणी करता आलेली नाही.
3. थकित भाडेधारकांना भाडेपट्टीने दिलेली मिळकती / ... काढुन घेवून भाडे करार रद्द करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

येणे

**मत्ता** 1816561

**वसुली पात्र रक्कम** 1816561

उपरोक्त प्रमाणे लेखापरिक्षण विभागाने सन 2016-2017 या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समितीचा पटलावर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

( मंजिरी डिमेलो )
प्र. मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानरपालिका

प्रत:-

1) मा. सभापती, स्थायी समिती, मिभामनपा

2) मा. आयुक्त , मिभामनपा